साप्ताहिक
माणूस

२३ जुलै ८३ / दोन रुपये.



पाऊस

आनंदाचे अनुभव



साप्ताहिक

# माणूस

¤

**वर्ष : तेविसावे**

**अंक : आठवा**

¤

२३ जुलै १९८३

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**: पत्ता :**

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

संजय पवार


# मुंबापुरी....

दस्तुरखुद्द थॉमसअण्णा अेडिसनने आपल्या महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या अधिकाऱ्यावरून धूप–दिवे ओवाळले पाहिजेत राज्यातली वीज एकदम कशी गेली याचा एमएसईबीत अद्याप शोध चालू आहे. कोणाच्याच डोक्यात टयूब पेटत नाहीये. कारभाराच्या नावाने काळोख असलेल्या या इलेक्ट्रिसिटी बोर्डाला अकलेचे दिवे पाजळणारे अधिकारी लाभले आहेत. एडिसनअण्णा, एकदा याची दृष्ट काढाच !

योगायोग पहा, दिवे बरोबर चार वाजून वीस मिनिटांनी गेले आता यामागे चारशेविशी नेमकी कोणाची आहे, हे एकदा कळायला हवं गुजरात आणि महाराष्ट्र वीजमहामंडळ हातच राखून सागताहेत. वर्तमानपत्रवाले हातात शौरी अँड शौरी कपनीची विजेरी घेऊन महामंडळातला काळोख उपसून काढताहेत. मडळ अर्थातच कोणाला दाद लागू देणार नाही.

नेहमीच्या १२० मेगॅवॅटऐवजी गुजरातने ३०० मेगॅवॅट वीज कशी काय काटली ? त्या वेळी महाराष्ट्र वीजवाले काय करत होते ? गुजरात वीजमहामंडळाने नरसी मेथांच्या वैष्णवजनांचा आव आणला आहे. त्यानी काळोख–प्रकरणात कानावर हात ठेवले आहेत. महाराष्ट्राची एकूण जनरेशन-क्षमता ३,००० मेगॅवॅट असताना गुजरातने घेतलेले १८० मेगॅवॅट डोईजड कसे काय झाले ? विशेष म्हणजे, एरवी कार्यक्षमतेच्या नावाने घसाफोड करणारे टाटावालेसुद्धा कसे एकदम गचकले ? तारापूरच्या डॉ. श्रीनिवासनसाहेबानी महाराष्ट्र आणि गुजरातच्या वीजमडळाना दम भरला आहे, त्यात अजिबात तथ्य नाही असं म्हणता येणार नाही. असं असताना, विधानसभेत डॉ. बळीराम हिऱ्यानी चौकशीसमितीचा विरोधी पक्षाचा आग्रह का मानला नाही ? चौकशीच्या निमित्ताने महाराष्ट्र वीज मडळाला निदान झडझडून जाब विचारता आला असता.

निवडुगासारखी फोफावत गेलेली मुबापुरी वीवपुरवठ्यावर किती अवलबून आहे हे गेल्या बुधवारी कळून आलं जसजशी हपिसं सुटायला लागली तसतसा सार्वत्रिक गोधळ वाढत गेला. मिळेल त्या वाहनानं घरी पोचायचा एकच ध्यास ज्याला त्याला होता. चर्चगेट–व्ही. टी. ही स्टेशनं छावण्यांसारखी भासत होती. बसस्टॉपवर तर अक्षरश: 'बळी तो बस करी खिळखिळी'चा मामला होता. काही महाभाग प्रायव्हेट गाड्यांच्या टपावर आणि डिकीत बसून गेले टॅक्सीवाल्याना तर जॅकपॉटच लागला होता. त्यातल्या त्यात समाधानाचा भाग म्हणजे पोलीस आणि बेस्टवाले मदतीचा हात द्यायला तत्परतेने पुढे येत होते. हॉटेलं दुथडी भरून वाहात होती. थेटरं आधी बंद होती; पण साडे-सातला वीज आल्यावर तिकिटखिडक्या पुन्हा उघडल्या. रात्रीच्या खेळाला तुडुंब गर्दी होती नेहमीप्रमाणे.

¤

## फक्त पत्रकारांसाठी

हुतात्माचौकात लोक तबू ठोकून उपोषणाला बसले आणि जहांगीर आर्ट गॅलरी-जवळ पोलिसांनी मोर्चेबदी केली म्हणजे पावसाळी अधिवेशन सुरू झाले असे समजायचे. तरी ह्या अधिवेशनात मोर्चांचा जोर नाही हुतात्माचौकातही 'रायरग जाती को अनुसूचित जातीमे समाविष्ट करो.' असा बोर्ड लावून धुळ्याजवळच्या दोडाई या गावचे सात-आठ लोक तबू ठोकून बसलेले आहेत हे सोडले तर कोणीही अन्यायग्रस्त लोक अजून सत्याग्रहाला बसलेले नाहीत !

विधानसभेत, विधानपरिषदेत दुष्काळी परिस्थितीवर चर्चा होणार हे आमजनतेला, विरोधी पक्षाना आणि सत्ताधारी पक्षालाही ठाऊक होते कोणतीही गोष्ट आधी ठाऊक असली की, मग ती करण्यातला उत्साह निघून जातो, तसा काहीसा प्रकार विरोधी आणि सत्ताधारी पक्षाना झाला असावा. कारण निम्म्याहून अधिक सदस्य सभागृहातच नाहीत. जे यायचे ते त्याच्या भाषणापुरते आणि उरलेले बाहेर उकाडा म्हणून आत बसलेले. सारे सोपस्कार पत्रकारासाठी !

विधानपरिषदेत राजारामबापू पाटलांनी हसतखेळत पाणीपुरवठायोजनेतील भ्रष्टाचारावर टीका केली. औरंगाबादकडील एका दोन गावाचा उल्लेख करून बाकी सर्व

ठिकाणी भ्रष्टाचार चालू असल्याचे ठोक विधान केले. आर. एस गवई तर सभापतीपेक्षा पत्रकारांकडे पाहातच बोलतात. उगाच दुसऱ्या दिवशी आपण दुष्काळाविषयी चिंता व्यक्त केली नाही असं लोकानी म्हणायला नको ! एक ना. धो. महानोर पोटतिडकीने बोलले. बाकी सारी चर्चा मजेत पार पडली. दोन पाने मजकूर मिळाल्यावर पत्रकारानाही चर्चेत फारसे स्वारस्य नव्हते.

गेल्या आठवड्यातच उपराष्ट्रपती हिदायतुल्ला गुजराती पत्रकार सघाच्या कार्यक्रमासाठी मुबईला आले होते राज्यसभेचे माजी खासदार वीरेन शहा प्रमुख पाहुणे होते. राज्यसभेतील व लोकसभेतील भाषणाबद्दल बोलताना हिदायतुल्ला म्हणाले, ' आज-काल हे नेते लोकांना उद्देशून भाषण करीत नाहीत. ते केवळ पत्रकाराना उद्देशून बोलतात. ' आणि मग वीरेन शहांच्या पाठीवर थाप मारून म्हणाले, ' एकदा शहा कांद्याची माळ गळयात घालून राज्यसभेत आले. त्याना कादे किती महाग झालेत ते दाखवावयाचे होते. असले स्टंट पत्रकारानाही आवडतात मी ( हिदायतुल्ला ) त्याना म्हणालो, 'वीरेन, चपला सुद्धा महाग झाल्या आहेत !'

¤

## टेनिसन आणि मुल्ला

मुबई हायकोर्टाचे प्रमुख न्यायाधीश मादन ह्यांची सुप्रीम कोर्टाचे जज्ज म्हणून नेमणूक झाली, त्या निमित्ताने पारशी पंचायतीने पाटकर हॉलमध्ये त्याचा सत्कार केला. अतुले फेम न्यायमूर्ती लेंटिन, नानी पालखीवाला, शेरिफ एस. पी. गोदरेज वगैरे प्रमुख पारशी त्याला हजर होते. सुप्रीम कोर्टामध्ये नेमणूक झालेले मादन हे दुसरे पारशी. पहिले सर दिनशा मुल्ला. सुप्रीम कोर्टात त्याची नेमणूक स्वातत्र्यपूर्वकाळातच झाली होती. सर मुल्ला वकील कसे झाले ह्याबद्दल एक मजेशीर किस्सा समारभात ऐकायला मिळाला.

कॉलेजमध्ये असताना मुल्ला कविता करीत असत पदवीपरीक्षा पास झाल्यावर त्यानी त्यांचा कवितासंग्रह इंग्लंडमध्ये लॉर्ड टेनिसनला पाठवून दिला आणि विचारले, ' घरचे लोक मला कायद्याचा अभ्यास करायला सागत आहेत, मला साहित्याची आवड आहे. आपला सल्ला काय आहे ? '

टेनिसनने एका महिन्यात कवितासग्रह परत केला आणि लिहून कळविले, ' तुम्ही कायद्याचा अभ्यास करा !'

—विष्णू जयदेव

# मुक्ताफळे

## अंतिम निर्णय

डोळयात पाणी घेऊन माझ्याकडे येण्याची बाबुरावची ती सातवी–आठवी वेळ असेल. बाबुराव म्हणजे नानासाहेबाचा मुलगा. इतके दिवस आम्ही त्याला बाबूच म्हणत असू गेली ३–४ वर्षे तो लग्नाला उभा झाल्यापासून बाबुराव म्हणतो.

' काय झालं –?'

' फिसकटलं –'

' कशावरून या वेळी ?'

' तिचे–नाक टोचलेले नाही–आणि टोचून घ्यायला ती तयार नाही !'

' नाक नसलं टोचलेलं तर एवढं काय बिघडलं ?

' हो ना. मी सागून पाहिलं; पण माझ्या आजीची नथ आहे ती नव्या येणाऱ्या मुलीच्या नाकात घालून गृहप्रवेश करण्याची चाल आहे आमच्या घरी. नथ घालता येणार नाही म्हणून नानांनी नकार कळवला काल–

' नथीला चाप बसवता येईल– '

' आईच्या नथीत कसलाही बदल नानाना मान्य नाही– '

¤

मला पुन: एकदा वाईट वाटलं. नानासाहेब म्हणजे केव्हढी जबर असामी ! क्रियाशील कार्यकर्ते. मुलाला मुली सागून येऊ लागल्या की, मुलाच्या बापाचे काही सुरुवातीला कळतच नाही. गुलाब देशपांडे अशीच धडपडी मुलगी. म्हणून मी तिच्या वडलाना स्थळ सुचवलं. म्हटलं सासरे क्रियाशील–सून क्रियाशील, जमेल. गुलाबला घेऊन मीच नानासाहेबाना भेटायला गेलो. कारण मुलगी दाखवणं गुलाबला पसंत नव्हतं. त्या वेळी गुलाब आणि नानासाहेबाची झालेली खडाजंगी मला आठवत होती–

' मी प्रथमच सांगते माझं कार्यक्षेत्र घराबाहेर राहील. स्त्री–मुक्तिकार्यासाठी मला सतत परगावी जावं लागेल– '

' अधून–मधून घरी असाल की नाही ?'

' असेन–पण त्या वेळी माझ्याकडून कुणी घरकामाची अपेक्षा करू नये– '

' घरकाम कुणी करायचे ?'

' सून आणल्यावर मोलकरणीची मुक्ती करण्याचा आपला मानस आहे– '

' ते जमणार नाही– '

' तसं असेल तर तुम्ही तुमच्या क्षेत्रातच वयाने मोठ्या मोठ्या व्हा. आमच्या क्षेत्रात हा गुलाब वाढू शकत नाही– '

¤

तरी या घटनेला आता चार वर्षं झाली. बाबुराव अजून मुलगी पहातोच आहे.

यानंतर आठवडाभरानं म्हणजे काल सकाळी बाबुराव आला. म्हणाला– ' काका, या वेळी सगळं जमत आलय. मुलगी गृहकृत्यदक्ष आहे मुलीला भाऊ आहेत– '

' भाऊ असले नाही तर नसले– '

' तसं नाही आहे. नानांची अट आहे मुलीला भाऊ हवेत. नाही तर माहेरी नेता–आणताना सगळा आपल्यालाच त्रास होतो– '

' बरं, आहेत ना भाऊ–जमवून टाका– '

' पण काल मुलीनं घोटाळा करून ठेवलाय हो !'

' काय केलंन ?'

' बॉब केलान ! चागले लाब केस होते तर खांद्यापर्यंत कापून टाकलेत–आता नाना नकार देणार !– '

' अरे, पुन्हा वाढतील म्हणावं त्याना– '

' नाना ऐकायचे नाहीत. तुम्ही सागून पहा. '

नाइलाजानं मी नानासाहेबाकडे गेलो. प्रथम त्याच्या आडमुठेपणानं आतापर्यंत बाबुरावच लग्न होऊ शकलेलं नाही, हे मी आडवळणानं सूचित केलं. नानासाहेबानी जवळच वृत्तपत्र माझ्यापुढं टाकीत म्हटल–

' वाचा– '

मी नजर फिरवली– 'अंतिम निर्णय शासनाचाच– '

'या घरात शासन माझं आहे. माझा निर्णय हाच अंतिम रहाणार. ज्ञानेश्वरमाउलींनी म्हटलय– ' रावो तेथें कटक। राजा म्हटला की त्याची इच्छा महत्त्वाची. '

'नानासाहेब, राजेलोकांचा जमाना गेला राजे स्वत. पराक्रम करायचे. जीव धोक्यात घालून युद्ध करायचे. हल्लीचे टिनपाट राजे कसलाही पराक्रम न करता राज्यावर येतात– '

'तरी शासन ते शासनच. शिवाय जे वयाने मोठे आहेत, त्यांच्या सत्राने चालावे असे तुकाराममहाराजही सांगतात, 'पुढे गाती त्याचे धरावे ध्रुपद। चित्ती शुद्धभाव ठेवोनिया।।' आम्ही लग्न केले. संसार केला. आमच्या मनाप्रमाणे गोष्टी होऊ देण्यातच बाबूरावाचं कल्याण आहे.'

'नाही पण काही तडजोड करावी असं मला वाटत. घरात येणारी मुलगी चांगल्या चालीरीतीची असावी,दिसायला सुंदर असावी, शिकलेली असावी, गृहकृत्यदक्ष असावी या अपेक्षा ठीक आहेत– '

'आम्ही सर्व अपेक्षा पुऱ्या करणाऱ्या मुलीशीच बाबुरावच लग्न लावणार ! मुलीन घराबाहेर किती वेळ रहायचं, दागिने कोणते घालायचे, कपडे कसे करायचे, केसाचा पंखा करायचा की नाही हे सर्व आम्ही ठरवणार ! आपले शिक्षणमंत्री सुधाकरराव नाईक फार हुशार माणूस हं–त्यांनी एका वाक्यात छान सांगितलंय– 'अंतिम निर्णय शासनाचाच रहाणार !'

'अहो, ते निराळया संदर्भात आहे शासनानं असा आडमुठेपणा चालवला तर निवडसमितीवर चांगले साहित्यिक जायलासुद्धा नकार देतील.'

'भ्रम आहे तुमचा ! जगात गरजवंताना तुटवडा नसतो आणि जो गरजू असतो तो आपली अक्कल, मान-अपमान गुंडाळून ठेवतो. वधुपिते काय आणि साहित्यिक काय ?'

जास्ती वाद घालण्यात अर्थ नव्हता. मी नानासाहेबांचा निरोप घेऊन घरी आलो. आज–उद्या बाबुराव येईल, पुन: रडवेला होईल. मी त्याला सांगणार आहे– 'घर सोडल्याशिवाय तुझे लग्न शक्य नाही !'

—ग्यानबा

# पावसाच्या आठवणी

अरुण खोरे

पाऊस थांबलेला असतो. बराच वेळपर्यंत घरात नुसता बसून मी तगून गेलेला असतो. भूक लागलेली असते आणि घर तर मलाच खायला उठलेले असते. माझ्यासमोर दुसरा कुठलाही पर्याय नसतो. रात्रीचे आठ वाजून गेलेले असतात. नेहरूचौकातली जुनी भांड्याची दुकाने बंद होण्यापूर्वीच तिथे जर पोहोचलो, तरच भूक भागू शकली असती; पण पुन्हा पत्र्यावर टपटप आवाज सुरू झालेला असतो. मी बाहेर येऊन पाहतो तर पाऊस थेंबाथेंबानेच पडत असतो; पण घरात गेल्यावर पत्र्यावरून होणारा त्याचा आवाज मला धडकी भरवीत असतो

मी घरातल्या मोजक्या भांड्यांवरून नजर फिरविली आणि माझ्या लक्षात आले ते एवढेच की, जुन्या भांडीबाजारात विकण्यासाठी पोळयाचा बिनझाकणाचा डबा तेवढा उरला आहे ! त्याचे झाकण आमच्या शेजारच्या भांडी घासणाऱ्या बाईंनी केव्हा हरवले कुणास ठाऊक !

आता वेळ घालवणे म्हणजे सहनही करता न येणाऱ्या उपासाला आमंत्रण देण्यासारखेच. मी लगबगीने डबा पिशवीत भरला आणि सायकल घेऊन जोराने नेहरूचौकाकडे निघालो

त्या परिसरात शिरताशिरता मला दिसले की, दुकाने बंद होऊ लागली आहेत म्हणून जोराने मी पुढे निघालो आणि एकदम दोनचारजणांनी मला एका दुकानाच्या कट्टयावरून जोराने बोलावले. मी घाबरलो. तसा भीतभीतच मी त्यांच्याकडे गेलो. तिघेजण उभे होते. पांढरे कपडे त्यांच्या अंगावर होते आणि चेहऱ्यावर पोलिसी तपासाचा रंग होता.

'काय आहे रे त्या पिशवीत?' एक दरडावणारा प्रश्न मला विचारण्यात आला.

'डबा आहे तो विकायचा आहे ' मी माझ्या मनातल्या भेदरलेपणाची छटा काबूत ठेवून म्हटले

पण पुढे मला त्यांनी नाना प्रकारांनी छेडायला सुरुवात केली आणि मला पटवून देत होते की, तो डबा मी चोरून विकायला आणला आहे ! मी त्याचा जोरदार इन्कार करत होतो आणि ते पुन्हा डब्याचे झाकण कुठे आहे याची विचारणा करीत होते. माझे वय २१ आहे आणि मला हा डबा विकण्याचा अधिकार आहे हे मी त्यांना कायद्याच्या आधारे पटवून देत होतो; पण ते ऐकायलाच तयार नव्हते त्या तिघांनी 'याला आता रस्त्यावर घेऊन झोडपू' असाही पवित्रा शेवटी घेतला. हा पवित्रा त्यांनी खरेच अंमलात आणला असता तर ओरडण्याचेच केवळ माझ्या हाती होते मी अत्यंत सजग राहून त्यांना उत्तरे देत होतो आणि ते माझा 'बळी' करण्यासाठी आतुर झाले होते. माझ्या घशाला कोरड पडली होती आणि मी जवळपासची किती दुकाने उघडी आहेत हे पहात होतो.

एकदम शर्टाच्या खिशात माझा हात गेला आणि माझ्या लक्षात आले. मी त्या वेळी एफ. वाय. बी. ए ला शिकत होतो. कॉलेजचे आय-कार्ड त्यात होते. माझी ओळख म्हणून ते आय-कार्ड मी त्या तिघासमोर धरले आणि जादू झाली ! ते तिघेही मला सोडायला राजी झाले.

मी धावतच निघालो. डबा दुकानात विकला. पैसे घेतले आणि सिटी-पोस्टाजवळच्या एका हॉटेलात जेवण करून निघालो. पाऊस पुन्हा सुरू झाला होता आणि गुलटेकडीच्या घरी मी पोहोचेपर्यंत त्याने मला चांगलेच भिजवलेले असते !

□

माझ्या ऑफिसात मी बसलेलो असतो. पाऊस जोरात कोसळत असतो. धुवाधार वृष्टी होत असते. पहिले काही क्षण मला त्या पावसाचं काहीच वाटत नाही आणि मग एकदम मी घरघरून जातो मला आठवत माझं घर. मग समोर येतात त्या घराचे गळके पत्रे आणि भिजणाऱ्या भिंती आणि

डोकं सुन्न करून टाकणारा पावसाच्या पाण्याचा आवाज !

हा असा कोसळणारा पाऊस नेहमीच घाबरवून सोडतो. मी कुठेही असलो, घरी कोणीही नसलं तरी असा पाऊस कोसळायला लागला की, मनात येतं, आपण घरी नसलो तरी हा पाऊस घराची फरशी ओली करेलच, पण काही पाघरुणंही भिजवेलच ! भिंती ओल्या झाल्याशिवाय रहाणारच नाहीत आणि मग घराची ओढ लागते.

घरी बायको आणि दोन चिवचिवणाऱ्या पाखरांसारख्या दोन मुली. घर त्यांच्या सहवासातलं नव्हतं तेव्हाही पाऊस यायचाच. नेहमीप्रमाणे कोसळून जायचा. आपण या पावसाबरोबरच वाहात का गेलो नाही असा एक सलणारा प्रश्न मनात ठेवून तो पाऊस जायचा. गुलटेकडीच्या घरी पावसाने असे अनेक प्रश्न मनाला भडावण्यासाठी निर्माण केले.

¤

गुलटेकडीच्या झोपडपट्टीतल्या तीन वर्षांच्या वास्तव्यात अशाच एका [काळघाकभिन्न पावसाळी दुपारची गोष्ट. चार-पाच दिवस पाऊस थाबला नव्हता आणि पाणी सगळ्याच्या घरासमोरून वाहात होतं. माझ्या घरासमोर असलेल्या खोल्याची राग या पावसाने भिजत होती. गुलटेकडीच्या चढावरून आमच्या सगळ्याच्या घराकडे उताराकडे पाणी धावत येत होते. आमच्या खोल्या म्हणजे उबरठे वर आणि पाय खाली टाकून घरात यायचं अशा स्वरूपाच्या.

माझ्यासमोरच्या घरात असते एक ओली बाळंतीण आणि पाणी घुसखोरासारखं त्या बाईच्या घरात शिरू लागलेलं असतं. कॉटवर बाळाला घेऊन ती बसलेली असते. बाहेर पावसामुळं येणं शक्य नसतं. आम्ही दुपारच्या पोटपुजेत रमलेलो असतो स्टोव्हवर धाकटा भाऊ लापशी तयार करीत असतो. स्टोव्ह विझवून ती गार झाल्यावर तिचा फडशा उडवण्याचा आमचा बेत असतो.

आणि इतक्यात समोरच्या घराच्या मागच्या भिंतीला भगदाड पाडून पाणी माझ्या घरात शिरू लागत. आमची तारांबळ उडते. पाणी घरात येतं आणि आम्ही घाबरतो; पण शेजारचे चार-दोन मित्र सहकार्याला धावतात. घराच्या मागच्या भिंतीला भगदाड पाडून पाण्याला वाट करून दिली जाते. मधल्या खोलगट भागात साचलेले पाणी सगळेजण सहकार्याने उपसू लागतात. त्यासाठी मोजकी असलेली भांडी बाहेर निघतात.

आणि पाणी उपसून संपते तेव्हा लक्षात येते, भाडी जी पाणी उपसण्यासाठी दिली होती ती परत आलेली नाहीत ! ती परत येणार नसतात हेच खरे !

लापशीला धक्का बसलेला नसतो. ओल्या जमिनीवर बूड टेकवून आम्ही लापशी फस्त करतो. या सगळ्या पार्श्वभूमीवर लापशी फारच चवदार लागते. घरातला सगळा बिछाना भिजलेला असतो. दोन कपड्यांच्या, कागदपत्रांच्या पेट्याही पाण्याने भिजलेल्या असतात. दोन दिवसांनी लक्षात येते, एस. एस. सी. चे प्रमाणपत्र आणि मार्कलिस्ट या पाण्याने लगदा करून टाकला असल्याचंही ! वडलांचे दोन-तीन त्यांच्याच साहेबानी दिलेले भारी कापडाचे कोट खराब झालेले असतात. मागच्या छोट्या खिडकीतून सूर कानावर येत असतात...

कही दीप जले कही दिल...

मनात येत, आपलं काय काय जळून गेलंय ?

¤

गुलटेकडीच्या घरी अशाच त्रस्त करणाऱ्या पावसाळ्यात रद्दी विकून जवळच्याच 'अप्सरा'त पाहिलेला 'दाग' आठवतो. राजेश खन्ना आणि शर्मिला टागोरची आणि राजेश–राखीची प्रणयदृश्ये पहाताना भिजलेल्या कपड्यामधल्या आमच्या त्वचेवर शहारे उभे राहिले होते आणि रजतपटावर आपणही साम्राज्य गाजवायच्या स्वप्नांचे महालही तेव्हा बांधले होते मी.

पावसाळा म्हणजे नरक वाटणारा अनुभव येणार तो झोपडपट्टीतच. गुलटेकडीच्या जवळून वाहणारा कॅनॉल चहाच्या रंगासारखं पाणी वाहून न्यायचा. कॅनॉलच्या दोन्ही काठावर बायका–पुरुषाच्या आघोळी, कपडे धुणी, भाडी धुणी आणि थोडीशी मागे सरकून बसलेली लहान मुलाची राग. वाटेतच कुणी कुणी घाण करून ठेवलेली असल्याने अंघोळीसाठी कॅनॉलला जाण्याचा मार्ग म्हणजे साक्षात नरकाचीच वाट ! कारण पुन्हा येताना याच वाटेवरून घरी परतायचे. सारा संडास-मुताचा चिखल आणि दुर्गंधीचे नाक फोडणारे रान चहूकडे !

वाटायचं, हे कधी सपणार आहे का ? रस्त्याच्या पलीकडील उंच इमारतीतला एखादा फ्लॅट आपण घेणार आहोत का ? जिथे प्रचंड पाऊस पडत असूनही त्याचा धडकी भरवणारा आवाज येणार नाही, भिंतीना ओल येणार नाही आणि भाड्यावर गळणाऱ्या पाण्याचे थेंबही पडणार नाहीत !

¤

दरवर्षी पाऊस येतच असतो आणि सतत कोसळणाऱ्या पावसाच्या हिमशुभ्र भिंती मी पाहात बसतो. लहानपणी पाहिलेल्या 'दोस्ती' चित्रपटातले एक दृश्य समोर येऊ लागते...

अपंग मित्राच्या आठवणीने व्याकुळ झालेला आंधळा मोहन मुंबईच्या पावसाच्या पाण्याने भरलेल्या फुटपाथवरून गाणे गात चाललेला असतो. घोंघावणारे वादळी वारे, पलीकडच्या अरबी समुद्रात चाललेला लाटांचा गजर आणि उभ्या, आडव्या तिरप्या चालीने सपासप पर्जन्यधारांचे वार त्या आंधळ्या मोहनवर होत असतात. तो मित्राला स्मरत गातच असतो....रफीच्या गाण्यातून उमटलेले ते स्वर आजही माझ्या काळजाचा ठाव घेतात....

मेरा तो जो भी कदम है
वो तेरी राह में है ..
के तू कही भी रहे तू मेरी निगा में है...

अंधारलेली रात्र आणि विजाचा लखलखाट; पण हा आंधळा मोहन आपल्या प्रिय दोस्ताला तरीही पाहून गातो आहे....

जुडा है दर्द से रिश्ता
तो फिर जुदाई क्या ?
जुदा तो होते है वो
खोट जिनकी चाहत में है...मेरा तो...

आणि मग समोर येते आमची आणि रफीची झालेली ताटातूट ! अशाच एका पावसाळ्यात तो गेल्याची बातमी आली आणि दुसऱ्या–तिसऱ्या दिवशी त्याच्या अंत्ययात्रेची बातमी वाचली. फोटो बघितला. प्रचंड पाऊस कोसळत असूनही हजारोनी रफीचे रसिक डोक्यावर छत्र्या धरून आपल्या काळजाच्या भग्न झालेल्या गायकाला 'अलविदा' करण्यासाठी अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. पुढे रफीवरचा एक लेख वाचला. त्यात रफीने निनावी स्वरूपात

दरमहा शेकडोना नियमित मदत केल्याचा उल्लेख होता. सु-मधुर आवाजासारखीच नीती असलेला हा गायक मला फार मोठा वाटला !

रफी जाऊन किती वर्षे झाली आहेत; पण वाटत, या माणसाशी आपलं नातं आहे. याच्याशी आपण बोललो आहोत. पुण्यात झालेल्या एका नाइटमध्ये मी त्याला अगदी जवळून पाहिला होता त्याचा हसरा चेहरा आजही त्या ओळखीची खूण सागतोय....

□

लग्नानतरचा पहिला पाऊस जोरात झाला. घरी आलो तेव्हा शोभा पाण्याने भरलेली फरशी पुसत होतो. रात्रीदेखील कॉटवरच्या गाद्या आखडून झोपावे लागले आणि अशाच किती तरी रात्री आणि दिवस. ..

खर म्हणजे याला अत नाही घरात आता दोन चिमणे जीव जमा झाले आहेत; पण पाऊस कोसळताना थोडाच विचार करणार की, अरे नको या लहानग्याचे कपडे भिजतील, त्याना थडी वाजेल. तो बेगुमानपणे कोसळतच रहाणार !

तुम्हाला रफीच गाण ऐकायचं असो, बाहेर लहानग्यानी शूने भरलेली गादी वाळत टाकायची असो, गरम पाण्याने छोट्याना अंघोळ घालायची असो किंवा फार दिवसानी बाहेर फिरायला निघायची गोष्ट असो, नाही तर रविवारचा दिवस बघून चागले नाटक बघायचे असो......तो पाऊस येतच रहाणार! निसर्गाचे चक्र आणि तुमचे जीवन याचा संबध दोन्ही स्वरूपाचा आहे. परस्पर पूरक आणि परस्परविरोधीही !

शात मनाने कितीही विचार केला तरी एखादा क्षण असा सुसाटत सुटतो आणि मुठीएवढ्या हृदयाला बेलगाम आवळतो. मी माझ्या ऑफिसमध्ये बसलेला असतो. बाहेरच्या रौद्ररूपी पर्जन्याचा थेंबही ऐकू येत नसतो आणि मी कामात असतो. हळूच खिडकी उघडली जाते. पावसाचे खरे रूप लक्षात येते. मी कामात असतो; पण मन लागत नाही. माझी चुळबूळ सुरू होते. वेळ सपतेय कधी ते मी पाहू लागतो. पुन्हा त्या वेळी पाऊस थाबला तर !

ऑफिस सपते. पाऊस झिमझिमत असतो. रस्ते पाण्याने वाहात असतात. मला पोचण्याची घाई असते. रफीचे गाणे माझी वाट जवळजवळ करत असते

घरी येतो. बाहेर साचलेल्या पाण्यात दोन्ही मुली पाय उडवून नाचत असतात शोभा शबनम घेते आणि घराच्या पत्र्याकडे बोट दाखवून म्हणते, 'अहो, एखादा प्लॅस्टिकचा कागद आणा ना पत्र्यावर टाकायला. म्हणजे मधोमध तरी पाणी पडणार नाही !'

मी कपडे बदलून बसतो. मुली खेळू लागतात. त्याना 'ये रे ये रे पावसा...' गायला सागतो, पाऊस पुन्हा जोरदार सर घेऊन येतो.

आणि मी शोभासह पत्र्याकडे पाहू लागतो नेमक कुठून गळतंय याचा अंदाज घेत दोन–चार भाडी गळणारे थेब गिळण्यासाठी ठेवली जातात आणि सारे सुरळीत सुरू होते. रेडिओवरच्या रफीच्या गाण्याला त्या थेबाचा आवाज साथ देत असतो !

□

# असंख्य सरीतला एक थेंब

संजय पवार

नक्की आठवत नाही; पण असाच केव्हा तरी पाऊस आतन, बाहेरनं 'भिजवून' गेला आणि मग दर पावसात त्या आठवणीच्या सरीवर सरी कोसळू लागतात.

पाऊस तसा ओळखीचा, अगदी जुना म्हणजे 'तो खूप खूप यावा आणि शाळा बुडून जावी' अशा कल्पना करण्याच्या वयापासूनची ओळख. दरवर्षीच्या शालेय निबंधातून त्याची हजेरी चुकली नाही 'पावसाळ्यातील एक दिवस' प्रत्येक वर्षी 'एक दिवस' तरी असायचाच.

त्याला असाच अगाखाद्यावर घेत वाढत गेलो.

साचलेल्या पाण्यात सोडलेल्या होड्या, पाय आपटून उडवलेल पाणी, अती भिजून सू, सू करत खाल्लेले धपाटे या सर्व आठवणी कधी काळी कामाच्या व्यापातून पावसाची एखादी सर येऊन गेल्यावर आकाश उघडावं तशा उलगडत जातात

परवाच पुन एकदा पावसात चिंब भिजलो. अगदी मुक्त. आजूबाजूला हिरवी लुसलुशीत गवती पखरण आणि डोक्यावर मोकळं आभाळ. सर्वांग ओथबून टाकणाऱ्या त्या सरीत आपल इवलसं अस्तित्व विरघळवून टाकावं इतकी लाघवी बरसात एक मात्र नेहमी जाणवतं.

पावसाचं आणि 'वयाच' काही नक्की नातं असाव 'भिजण्याचे' पण एक वय असते. उगाच नाही एखादा गझलकार स्पष्ट कबुली देत की– 'पावसात भिजण्याचे वय निघून गेले !'

तर 'तारुण्य' वगैरे जी काही भानगड आहे ना त्यातला 'पाऊस' हा खरा पाऊस ..

म्हणजे शाळेत-बिळेत असताना पाऊस 'निरागस' किंवा 'खट्याळ' असतो, तर अगदी उतारवयात तो कटकटीचा असतो; पण मधल्या काळात मात्र पावसाच खरं ओलेपण, बरसण, गदगदण, भिजवण याचा 'फील' अगदी ओरिजिनल असतो

हुरहूर, गदगदून येण आणि सतत बरसणं या सगळ्या स्थितीशी तारुण्याचा खळाळ किती तरी मिळता जुळता आयुष्याच विभाजन ऋतुचक्रात करायच ठरवल तर तारुण्याच्या वाट्याला निश्चितच पाऊस येईल

पाऊस आला की, पावसाची गाणी येतात, कविता येतात, पाऊस रगात भिजतो, भिजवतो. एखादी अशीच 'कुणी' आणि ओलेती होऊन थरथरत्या अधरानी कॅनव्हास विरघळतो डोळ्यात अशा किती तरी बहकवून टाकणाऱ्या गोष्टी पाऊस घेऊन येतो

पाऊस घेऊन येतो मोराचे पख, इद्रधनुष्याचे रग, नदीच मस्तावणं, सृष्टीतल्या प्रत्येक जीवाला कात टाकायला लावणारा हा मोसम.

मी म्हणतोय तो पाऊस डाबरी रस्त्यावर

पडत नाही. तो गढूळ पाण्याने गटारे तुंबवीत नाही.

तो फुटक्या कौलातून, गळक्या छपरातून कुणाच्या संसारावर पाणी ओतीत नाही तो नदीच्या पोटात गुराढोरासह माणसही लोटत नाही.

असा आक्रमक जो येतो तो पाऊस नव्हेच. ते असतं वादळ, एक क्रंदन. त्यात सरीची हळुवारता नसते, झिमझिम नाद नसतो. निर्मळ खळाळ नसतो.

रोमांचित करणारा, थरंगळत जाणारा ओला स्पर्श नसतो यातलं काहीच नसतं.

मी अनुभवतो तो पाऊस.

उघड्या माळावरचा. दूर डोंगराच्या रांगाना झाकोळत ढग स्वप्नासारखे पुढे सरकत असतात अल्लद. त्यांच्या आगमनाची वार्ता घेऊन येणारा वारा लहान मुलासारखा अंगाला येऊन झोंबतो. मनासकट सर्वांग सैरभैर करून टाकतो क्षणातच मोरपीस अंगावरून फिरावं तसा एक एक थेंब अंगावर एक थेंब, दोन थेंब, तीन, चार थेंब .. सर... आणखी एक सर. सरीवर सरी... बरसत राहतात शरीरावर... शरीराआत... आत अगदी आत मनाचा डोह भरत जातो. पालवी फुटावी तसं शरीर तरारून जात. सारे क्लेष, दुःख अहंकार, मान, सन्मान, अपमान निथळून जातात .. उघड्या आभाळाखाली एकटा जीव नगण्य होऊन जातो निसर्गाचाच एक भाग होऊन मनोमन स्वतःला अर्पण करून टाकतो.

असा पाऊस माझ्या मनात घर करून आहे. अधाशून यावं तसा तो मनात ठमठसलाय.

तो माळरान सोडून उघड्या गच्चीत यायला तयार नाही. बंद गॅलऱ्यासमोर रुक्ष-पणे नळ वाहत रहावा तसही काही त्याला नकोय. आच्छादित वस्तु, माणसं, घर, जमिनी याच्यावर आपटून परत फिरण्याची त्याची इच्छा नाही.

नको असलेल्या 'पाहुण्यासारखं' स्वागत, आदरातिथ्य त्याला नकोसं झालंय.

त्यामुळं तो अगतिक होऊन मनाच्या कोपऱ्यातच बरसत राहतो.

ही खिन्न बरसात गाते जुदाईगीत.

मानव आणि निसर्गाचे.

अशी अनेक जुदाईगीतं माझ्या मनात साचत चाललीत. मनुष्यप्राणीच निसर्गापासून किती दूर दूर चाललाय. तावडच्या पाऊल-वाटेवर काळाच्या ओघात डाबर ओतल गेलं. तरी बाजूच्या झाडापेरानी सर्वच खुणा पुसू दिल्या नाहीत; पण रस्ता शहराचा झाला आणि झाडावेही हजार हात कापले गेले. पायाखालची हिरवळ तर गेलीच होती, डोक्यावरचीही गेली. थंडगार सावलीसाठी काचबंद घरं झाली आणि झाडाच्या संकरित जाती कुंड्यांच्या परिघातच विश्व मोजू लागली.

अशा परिस्थितीत तो झिंग आणणारा पाऊस काय करणार ? कुणासाठी कोसळणार तो ? डांबरी रस्त्यावर काच फुटावी तसा तडतडून पाऊस फुटून जातो.

सिमेंट-कॉंक्रीटच्या ठोकळ्यावर आपटून, काचबंद केबिनच्या काचेवरून आसवासारखा निखळत जातो

असं हे एक निसर्गचक्र आणि त्याला आपल्या बाजूने फिरवू पहाणारे—मानवी चक्र.

या दोन्ही चक्राशी प्रामाणिक रहाताना मनाची प्रचंड कुतरओढ होते.

आर्ट स्कूलमध्ये असल्याने ती किमान कमी झाली. आऊटडोअरच्या निमित्तानं अनेकदा हे नैसर्गिक अस्तित्व त्यात वजा करता आलं ..

शहरी संस्कृतीपासून दूर जाऊन मोकळे-पणानं पाऊस अंगावर घेता आला...ग्रीन शेडस्नी परस्पराला मॅच होत गेलेल्या झाडा-डोंगराचा पट्टा ..उंचावरून हिंदकळत येणारे झरे ..या सगळ्या गोष्टी नव्या चक्रात केवळ चित्रात. समाधानासाठी कॅनव्हासचे आकार लहान-मोठे करायचे

पण जेव्हा जेव्हा निसर्गाकडे गेलो, तेव्हा त्याचे आकर्षण वाढतच गेलं आणि उघड्या माळावर पावसात न्हालो तेव्हापासून शह-रातला पाऊस परका वाटू लागला एखादा पाण्याचा प्रचंड पाइप फुटावा तसा कृत्रिम पाऊस. त्यात कसलीच ओढ नाही, सरीची मुक्त पखरण नाही आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे लहान पोरं-बाळं सोडली तर या मुक्तगानात सामील व्हायची कुणाची तयारी नाही... गळाबंद इस्त्रीच्या कपड्यात हसावं किती याचं प्रमाण ठरलेलं असतं तसच शह-राच्या रस्त्यावरल्या मुक्त पावसालाही आम्ही वेधशाळेच्या मापनपट्टीत बंदिस्त करून टाकतो.

. हल्ली पाऊस सुरू झाला की, गच्चीत का होईना पण मी मुक्तपणे तो अंगावर घेतो किंवा जवळपासच्या डोंगर दऱ्यांत जातो .. आणि पाऊस अनुभवतो.

प्रियेसारखा तिष्ठत ठेवणारा , आणि आल्यावर अंगांगाला बिलगणारा पाऊस...

आकाश आणि जमिनीच्या मैथुनातल वीर्यसूक्त . गर्भार बाईसारखी फुलून निघा-लेली हिरवीकंच जमीन आणि मीलनाचा सुगंध कस्तुरीसारखा ओटीपोटीत ओतप्रोत भरलेला जो शहराच्या डांबरी रस्त्यालाही दडवता आला नाही...

हे सारच लोभसवाणं असत.

आपला देहही हिरवागार होऊन जावा. आपले हातपण फांद्यासारखे पसरत जावे .. - पानावर दवासारखे थेंब गोळा व्हावेत आणि भुसभुशीत मातीतून 'नवा कोंब' फुटावा या निर्मितीच्या प्रवेशात आपली प्रमुख भूमिका असावी असं वाटण्याइतकी लाघवी बरसात मी डोळ्यात साठवून घेतो. कागदावर चित्रबद्ध करतो

...११×१५च्या कागदात डोंगर-दऱ्या . हिरवळ आणखी काय काय त्या साठवलेल्या दृश्याकडे एक नजर टाकतो मी आणि ब्रशने एखादा बिंदू टाकावा तसं माझं अस्तित्व टेकवतो त्यावर आणि मनाशी म्हणतो,

कितीही छोट्या डबीत हा ठेवा बंद केला तरी त्यात आपण पुनः तितकेच लहान असू ...असंख्य सरीतला एक थेंब ! □


मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र
**हंसा वाडकर**
**सांगत्ये ऐका**
चौथी आवृत्ती प्रसिद्ध झाली.
मूल्य : १४ रुपये
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, पुणे ३०

मुंबई वार्ता

# निनावी मद्यपी

साहित्यातल्या एका नव्या प्रवाहाप्रमाणे मानवाच्या विचारशक्तीपेक्षा त्याच्या भावना, उपजत प्रवृत्ती या अधिक प्रबल ठरतात सदसद्विवेक बुद्धीपेक्षा त्याच्या उद्रेकी भावना अधिक निर्णायक ठरतात. म्हणजे जगातल्या घटनाचा, आजूबाजूच्या निसर्गातल्या नियमांचा अभ्यास करून, माणसाने जे ज्ञान प्राप्त करून घेतले आहे, त्या ज्ञानावर हे सर्व ज्ञान होण्यापूर्वी ज्या रानटी किंवा आदिम अवस्थेत तो होता, त्या वेळचेच क्षोभ-प्रक्षोभ, भावनांचे कल्लोळ, मात करतात त्यामुळेच माणूस आणि पशू याच्यामध्ये फारसा फरक नाही – अशा प्रकारच तत्त्व साहित्यातल्या या प्रकारात बरच लोकप्रिय दिसत मानवी जीवनात भावनाना विचाराइतकच महत्त्व आहे, या बाबतीत दुमत नाही; परंतु विचाराना पशूच्या जीवनात जस स्थान नसत, तस ते माणसाच्याही जीवनात नाही, तो केवळ क्षुद्र भावनाचा बळी ठरतो, अस म्हणणं म्हणजे प्रगत माणसाच्या अस्तित्वाच्या उण्यापुऱ्या पाच-दहा हजार वर्षांच्या इतिहासाकडे डोळे-झाक करण्यासारखं आहे

ज्या अमेरिकेनं ज्या क्षणी चद्रावर पाऊल टाकल होतं, त्याच वेळी लाखो अमेरिकन अमली द्रव्य आणि दारू याच्या नशेखाली होते, पण हेही तितकच खर आहे की, हो व्यसन पादाक्रान्त करण्याकरता अमेरिका लाखो डॉलर्स खर्च करते आहे म्हणजेच आपल्या प्रबळ ठरणाऱ्या भावना काबूत आणण्याकरता विचाराचा, ज्ञानाचा उपयोग करते आहे

हा सारा विचाराचा व्यूह मनात गर्दी करण्याच कारण म्हणजे अल्कोहोलिक अॅनानिमस (निनावी मद्यपी) याच्या बैठकीत – अनौपचारिक बैठकीत–जे पहायला, ऐकायला मिळालं ते !

मुळात अमेरिकेतच सुरू झालेल्या या संघटनेच्या मुंबईत पन्नास–साठ ठिकाणी सभा होतात. अशाच एका सभेचे हे अनुभव.

सभेच वातावरण मोकळ. सगळे एकमेकाना 'भाऊ' म्हणूनच हाक मारतात तेही नावानं, पहिल्या नावान. इथे कोणाचीही आडनाव माहीत नसतात आणि कोणी ती सांगतही नाही आडनावावरची ही बंदी जगन्नाथ मिश्रानीही घातली आहे, पण ती राजकीय स्टटबाजी झाली ! इथं मात्र आडनाव न सागणं हे विशेष अर्थान महत्त्वाच आहे कारण इथ माणसाना आपली अॅनानिमिटी–निनावीपण टिकवायच आहे.

बैठकीच जुजबी सचालन एक भाऊ करतात. सुरुवात त्याच्याच कर्मकथेन होते. हे आपल्या पापाच आणि चुकाच जाहीर 'कन्फेशन' – जाहीर कबुलीच पहिली कबुली – मी एक दारुड्या आहे मुळात ही कबुली द्यायला मी अनेक वर्षं फुकट घालवली. मुळात मी दारू पितो आणि दारूवरचा माझा ताबा सुटलेला आहे, हे मी स्वत शीसुद्धा मान्य केलेलं नव्हत. मला नेहमीच वाटायचं, आपल्या इच्छाशक्तीन आपण या सवयीवर ताबा मिळवू शकतो माझी समाजात अतिशय अप्रतिष्ठा झाली. एकदा रविवारच्या दिवशी घरात मुलाच्या वह्याच्या पुरतेच पैसे शिल्लक होते आणि मला दारू हवी होती. बायकोशी भाडून मी फक्त एक पेग पिण्याकरता खाली उतरलो नतर माझ्या मुलाची वर्षाची फीसुद्धा घालवून बसलो ! आमच्या घरातल्या कार्यक्रमाना – माझ्या आई-वडिलाकडच्या सत्यनारायणालासुद्धा मला कोणी बोलावत नसे मुलं मला अतिशय घाबरून असायची बायको नशिबाला बोल लावत दिवस काढत होती. अशा वेळी केवळ माझ सुदैव म्हणून ए ए च्या एका बैठकीला मी आलो

आतापर्यंत मला माझ्या मित्राकडून, भावाबहिणीकडून हेटाळणी सोडून काही मिळालेल नव्हत आणि त्याबद्दल मी त्याना आता दोषही देत नाही; पण 'ए ए'च्या बैठकीमध्ये मला पहिल्यादाच काही मान्यता मिळाली. म्हणजे मी जसा होतो तसच मला स्वीकारलं गेलं. मी स्वत:ला दोष देऊ शकत होतो; पण दुसऱ्यान कोणी अशी दूषण मला दिली, तर ते मात्र मला सहन होत नसे. इतरानी, 'ए ए' मधल्या इतर 'भाऊनी' मला सांगितलं की, तू दारुड्या आहेस; पण वाईट माणूस नाहीस दारू पिण्याचा रोग तुला जडलेला आहे आणि या रोगाचा तुझ्यावर संपूर्ण ताबा आहे. तुझी इच्छाशक्ती दारूच्या प्रबळ हव्यासापुढं हतबल ठरली आहे तू दारूचा गुलाम झाला आहेस!

पण अजून आशा सपलेली नाही. कारण दारू आणि तुझी इच्छाशक्ती या दोहोंपेक्षाही प्रबल अशी ईश्वरी शक्ती आहे. या शक्तीला तू शरण जा. तिच्याजवळ कबुली दे की, मी दारुड्या आहे आणि मला त्या ईश्वरी शक्तीच्या सहाय्यान दारू सोडायची आहे. या दारू सोडण्याच्या प्रक्रियेतली पहिली पायरी म्हणून मी आज दारू पिणार नाही.

भाऊ पुढे म्हणाला, आतापर्यंत मी दारू सोडायची ठरवत असे, तेव्हा आजचा शेवटचा दिवस. उद्यापासून बद असे स्वत:शीच वायदे करत असे. दारू सोडायचा क्षण नेहमीच उद्यासाठी राखून ठेवलेला आणि हा उद्या, आज रोख, उद्या उधारमधल्या उद्यासारखा कधीच उगवत नसे, पण मला 'ए ए' न सांगितलं, आता कशाला उद्याची बात ? उद्याचा भरवसा कोणी द्यावा ? दारू सोडायची असेल, तर उत्तम वेळ म्हणजे आज, तेही आत्ता, इथ! देवाजवळ रोज हीच प्रार्थना कर की, मी फक्त आज दारू पिणार नाही. आयुष्याचे वायदे कराच कशाला ?

आणि मी खरोखरच असं ठरवल कारण अस ठरवलेली माणस मला प्रत्यक्षात भेटली. कोणी पाच वर्षं, कोणी दहा वर्षं दारू पीत होता आणि त्यान दारू सोडली, तो दारू सोडू शकला मला वाटल, माझ्या भावाना जे जमल, ते मला का जमू नये ? आणि गेली अडीच वर्षं मी दारूच्या थेंबाला स्पर्शही केलेला नाही। ''ए ए' च्या नव्वद सभाना उपस्थित राहिलो ईश्वरी शक्तीला शरण गेलो म्हणूनच आजचा हा दिवस मला दिसतोय !

### १ ला प्रयोग

––टाळयाचा माफक कडकडाट होतो आणि दुसरे भाऊ उठतात. पहिल वाक्य तेच. मी एक दारुड्या आहे. हे भाऊ अविवाहित. मित्राच्या नादान व्यसन लागल. दारूशिवाय मनात अन्य कोणताही विषय नाही. दारू पिऊन अनेकदा फूटपाथवर, रेल्वेच्या जिन्यावर लोळंगट्टी केली! कारखान्यातली भरदार

पगाराची नोकरी सुटायला आली या सर्व हालात मी अतिशय एकटा होतो. एकटेपणाच्या भयावह जाणिवेला दडपून टाकण्यासाठी अधिकाधिकच दारू पीत गेलो. घड्याळ गेल, सोन्याची साखळी गेली. माझ्या दारुबाज मित्रानी मला वरवरची सहानुभूती देखील दाखवली नाही; पण 'ए ए' च्या बैठकीना आलो आणि मला जाणवल, मी एकटा नाही ! माझे खूप भाऊ मला आधार द्यायला तयार आहेत. माझ्यावर कोणीही विश्वास टाकत नव्हत 'ए ए' नी माझ्यावर विश्वास टाकला. मला जाणवल की, हा विश्वासच मला हवा होता आणि आज नाही, अस रोज ठरवण्याच्या नियमानं दारू सुटली; पण माझी खात्री आहे की, मी पुन्हा घसरू शकेन. म्हणूनच माझी इच्छाशक्ती टिकवण्याकरता मी 'ए ए' च्या बैठकाना नियमितपणे येतो.

सभा अत्यंत चैतन्यपूर्ण झाली. बैठकीला नव्यानं आलेले अन्य निनावी मद्यपी, या भावांच्या उद्गारानं प्रभावित होत होते. उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते. आणखीही एक–दोन भावानी आपापले अनुभव सांगितले. मग शका-निरसनाचा कार्यक्रम झाला.

सगळ्या भावाच्या बोलण्यातून जाणवलं ते हे की, या माणसांनी स्वत कडे वस्तुनिष्ठपणे पहायला सुरुवात केली आहे. आपल्या मर्यादा त्याना चांगल्या प्रकारे उमजलेल्या आहेत. त्यांच्या बोलण्यात, कबुलीमध्ये अपराधीपणाची भावना जरूर आहे, पण त्यात हळवेपणा नाही, स्वत चंच दु ख गोंजारत बसण्याचा नाटकी स्वार्थीपणा नाही. त्याना आपल्या चुकाची योग्य जाणीव झाली आहे आणि त्यामुळे ते अधिक शहाणे झाले आहेत.

'ए ए' च्या सभासदत्वाला वार्षिक नाही, मासिक नाही, कसलीच वर्गणी नाही तुम्ही दारुडे आहात की नाही हे तुमचं तुम्हाला ठरवायच असेल, तर त्याकरता वीस प्रश्नाची यादी ते देतात. त्याची प्रामाणिक उत्तरं दिली की, तुमचं तुम्हालाच कळेल

'ए ए' च्या सभासदत्वाला जात–पात–धर्म कसलीच अट नाही. त्याची प्रार्थना ईश्वराकडे असते. खरं म्हणजे ही प्रार्थना बुद्धिवादाची आहे त्यामध्ये असं म्हटल आहे की, जी परिस्थिती मी बदलू शकणार नाही, ती परिस्थिती स्वीकारण्याची प्रसन्नता मला मिळू दे. जी परिस्थिती मी बदलू शकतो, ती बदलण्याचं धैर्य दे आणि या दोन्ही परिस्थितीतला भेद जाणण्याची सदसद्विवेकबुद्धी परमेश्वरा, मला दे !

दारू पिणारी माणसं ही नेहमीच एक सामाजिक प्रश्नचिन्ह असतात. म्हणजे असं की, खरोखरच तीव्र शारीरिक, मानसिक कमतरतामुळं त्याना मद्यपानाकडे वळाव लागतं की, प्रत्यक्षात मनोरुग्ण असतात आणि त्याना इतराच्या दयेची, सहानुभूतीची आणि आधाराची गरज असते ? की ती मुळात बेजबाबदार, उथळ वृत्तीची माणसं असतात, की जी आपल्या निकटवर्तीयांचा विचार न करता अवघड परिस्थितीतून पळ काढतात आणि कठोर वागणूक आणि शिक्षा हीच त्याची लायकी आहे ? की या दोन्हीचंही मिश्रण प्रत्येक मद्यपी माणसामध्ये असतं ?

या प्रश्नाची समाधानकारक आणि एकेरी निर्णायक उत्तरं मिळणं कठिण आहे; पण एवढं मात्र म्हणता येईल की, हा एक नवीन प्रयोग आहे आणि तो अतिशय आशावादी, माणसाकडे माणूस म्हणून पहाणारा प्रयोग आहे. दारुड्यावर कोणी भरवसा टाकत नाही. त्याचा आत्मविश्वास, आत्मगौरव खालावतो, हे दु ख बुडवायला तो अधिक दारू पितो आणि इतराच्या अधिकाधिक हेटाळणीला बळी पडतो. अस एक दुष्टचक्रच चालू रहातं. झपाट्यानं फिरणाऱ्या दुनियेत कोण हे दुष्टचक्र थांबवणार? आणि अशा दारुड्याला जवळ करून त्याला समजून घेण्याची सवड आणि गरज कुणाला आहे ?

पण क्रूरातल्या क्रूर अशा दरोडेखोराना शरणागती पत्करता येते, नरभक्षक खुन्यावर दया दाखवता येते, तर मग दारुड्यामाही अस माणूस म्हणून वागण्याची संधी का मिळू नये ? आणि 'ए ए' च्या बैठकीला आलेली माणसं पाहिली, तर जाणवतं की, या 'माणूस' पणाच्या संधीचा ती पुरेपूर फायदा घेताहेत. दारूनं बोथट झालेल्या त्याच्या मानवीभावना जाग्या होताहेत. 'ए ए' त येणारी माणसं मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय आहेत आणि कामगारांपासून ते डॉक्टर–इंजिनिवर-न्यायाधिशापर्यंत सर्व जण त्यात आहेत ही माणस ठरल्या वेळी आपली सर्व कामं बाजूला ठेवून या सभाना येतात. गर्भवती स्त्रिया अँटेनेटल क्लिनिकमध्ये जाव्यात त्या आस्थेनं, निकडीनं येतात ! त्याच्यातल्या पुसत चाललेल्या माणूसपणाला, भावनांना, बुद्धीला इथ आवाहन केलं जातं, त्याच्या भावनाशीलतेलाच वळण लावायचं आवाहन केलं जातं आणि ते बऱ्याचदा यशस्वीही ठरत

'ए. ए.' च्या बैठकीला जाऊन आल्यावर मला वाटल, गांधीजीच्या सत्याच्या प्रयोगाचा निराळ्या संदर्भातला पण तितकाच व्यवहारी नमुनाच आपण पाहिला !

—ललिता बर्वे

ह्या ना त्या निमित्ताने...

# हे वैद्य कोण हो ?

फिरोज रानडे

'का हो, आजचा म. टा. आहे का ?' श्यामने दार उघडताच कर्वे दारातच विचारते झाले. 'या, या आधी आत तर या !' श्याम त्याना मोठ्या अगत्याने म्हणाला.

कर्वे फक्त टाइम्स ऑफ इंडिया घेत. श्याम टाइम्स व महाराष्ट्र–टाइम्स दोन्ही घेत असे. त्यामुळे खास काही मराठी बातमी वाचावयाची असली म्हणजे कर्वे श्यामकडे येत.

बैठकीच्या खोलीकडे जाता जाता श्याम ओरडून म्हणाला, 'राधा, अग कर्वेसाहेब आले आहेत, जरा चहा तर टाक !'

श्यामने फार वेळा चहा घेणे राधाला आवडत नसे. त्याबद्दल आपली नाराजी वेगवेगळ्या मार्गांनी दाखवत असे; पण कोणी बाहेरचे आल्यावर काही न बोलता चहा करणे भागच होते. कर्व्यांना श्याम अगत्याने 'या, या' म्हणाला होता त्याच्यामागे हे चहा–कारणही होतेच.

कर्व्यांनी सोफ्यावर बसून म. टा. मधले हवे ते पान काढून वाचायला सुरुवात केली. श्यामला काही करण्यासारखे नव्हते म्हणून तो त्याच्या चेहऱ्याकडे पहात राहिला.

जे काही हवे होते ते वाचून झाले तरी

कर्व्यांच्या तोंडावर म्हणावा तेव्हढा संतोष दिसला नाही. ही काय भानगड आहे बुवा ? असा त्याला प्रश्न पडला, पण तसे विचारणार तरी कसे ? म्हणून तो शांत राहिला.

मग कर्व्यांनीच बर्फ फोडला, 'का हो, हे वैद्य कोण आहेत हो ?'

कर्वे कोणत्या वैद्याविषयी बोलताहेत, हे श्यामच्या एका झटक्यात लक्षात् आले श्री. वैद्य ह्याची पुढील सेना–प्रमुख म्हणून नेमणूक केल्याची सरकारी घोषणा सगळ्या वर्तमानपत्रात आज आली होती. श्री वैद्य ह्याच्या कामगिरीबद्दल, त्याच्या अनुभवाबाबत पण छापून आले होते एवढेच नव्हे नेमणुकीसबंधी उलटया–सुलटया टीका–टिप्पणी पण छापून आल्या होत्या

हे सगळे एवढे असताना कर्व्यांनी हे वैद्य कोण हो म्हणून चौकशी करावी ह्याचा श्यामला अचंबा वाटला

'हे वैद्य कोण आहेत हो ?' परत कर्वे

सेनेच्या दृष्टीने भारताचे चार विभाग म्हणजे कमाड्स केल्या आहेत त्याचा एक–एक प्रमुख असतो त्या चौघाचाही प्रमुख म्हणजे हा सेना–प्रमुख व त्या जागी श्री. वैद्य ह्याची नेमणूक झाली आहे वगैरे श्यामने त्याना समजावून सांगितले

'नाही, ते ठीक आहे हो; पण हे वैद्य आहेत तरी कोण ?'

'अहो, असे काय करता ? भारताच्या स्थल–सेनेचे मुख्य होणार आहेत हे वैद्य !'

'ते सगळे असेल हो; पण मी विचारतो स्वत हे वैद्य कोण आहेत ?'

आता मात्र श्याम कातावला. सेना–प्रमुख वगैरे सगळे सांगून झाले तरी, कापूस-कोड्याच्या गोष्टीसारखे हे वैद्य कोण ? हा कर्वे–प्रश्न काही संपत नव्हता

'हे वैद्य म्हणजे सेना-प्रमुख, जसा हवाई दलाचा मुख्य असतो, नौ–दलाचा असतो तसे हे स्थल–सेनेचे मुख्य. He is chief of Army–staff He is final authority on all Army matters ! इंग्रजीत सांगितले म्हणजे तरी कर्व्यांना कळेल म्हणून श्यामने अगदी इंग्रजीत सांगितले

तेवढ्यात राधाने चहा आणला. श्यामने चहाबरोबर राग प्यायला सुरुवात केली कर्व्यांनी भराभरा चहा संपवला व उत्साहात विचारते झाले,

'नाही श्यामराव, मी विचारत होतो की, हे वैद्य 'आपल्या' पैकीच का ?'

आता कोठे श्यामला कर्व्यांच्या कापूस-कोड्या प्रश्नामागची भावना समजली. जनरल श्री. नागेशनंतर म्हणजे जवळजवळ १५–२० वर्षांनी कोणी मराठी माणूस सेना-प्रमुख झाला होता; पण तो मराठीच होता की नाही याची कर्व्यांना खात्री करून घ्यावयाची होती.

जोशी, दीक्षित, प्रधान वगैरे नावे उत्तर प्रदेशीयात, पंजाबात, बंगाल्यात आहेत तसे वैद्य पण आहेत काय ? असा कर्व्यांना प्रश्न पडला असावा श्याम महाराष्ट्राबाहेर बरेच वर्षे राहिल्यामुळे तो ह्यावर काही प्रकाश टाकेल म्हणून ते परत परत श्यामला हे वैद्य कोण हो म्हणून विचारत आहेत असे श्यामला वाटले

आम्ही लोक कितीही मोठे झालो तरी शेवटी त्या प्रान्ताचेच रहातो. व्ही शांताराम मराठी. राजकमल पंजाबी. रे बंगाली, पण दिलीपकुमार मात्र कोणत्या प्रांताचा नाही राव मद्रासी, वैद्य मराठी पण लतिफ कोण ?

टाइम्स ऑफ इंडियात श्री वैद्य ह्याच्या नावाची फक्त आद्याक्षरे आली होती त्यावरून ते पंजाबी, मराठी की बंगाली कळले नाही म्हणून तर कर्वे म. टा. बघायला आले होते वैद्य हे मराठी गृहस्थ आहेत हे म टा. मध्ये स्पष्टपणे आले असता कर्वे 'हे वैद्य कोण ?' म्हणून परत परत का विचारतात हे श्यामला कळेना !

'अहो, पक्के मराठी, आपल्या कोकणातले मोठा काबील माणूस !' श्यामने टा. व म टा मधली वाचून लक्षात राहिलेली सगळी माहिती आपल्या शब्दात सांगितली व वर म्हणाला, 'मोठी अभिमानाची गोष्ट आहे नाही ? खर म्हणजे आपण पोलिसाचे फौजदार होणारी व त्यात आनंद व अभिमान बाळगणारी माणसे वा फारच छान !'

पण तो छानपणा कर्व्यांच्या चेहऱ्यावर दिसेना. 'तसे छान आणि अभिमानाचे आहे हो पण ..'

कोणी ले. जनरल सिन्हा नावाचा अधिकारी ह्या प्रकरणात डावलला गेला होता असे वर्तमानपत्रात होते कर्व्यांचा चेहरा छान झाला नाही हे बघून ह्याचा कोणी नातेवाईक तर डावलला गेला नाही ना ? असा प्रश्न श्यामच्या मनात आला.

'तुमचा कोणी मावसभाऊ वा चुलतभाऊ तर त्या सिन्हासारखा डावलला गेला नाही ना ?' अर्थात हा प्रश्न उगाचच होता तसे असते तर कर्व्यांनी आत्तापर्यंत आकांत केला असता.

कर्वे श्यामच्या प्रश्नाला उत्तर न देता स्वत शीच बोलतात तसे म्हणाले,

'हे वैद्य नाव मोठ अडाणी आहे बघा, त्यापासून काही बोध होत नाही! ..'

'कसला बोध ?' श्यामला त्यांच्याच बोलण्याचा बोध झाला नाही.

'काही आडनावं कशी स्पष्ट असतात म्हणजे दामले, गोखले म्हणजे बुवा आपल्यातले, जोशी थोडा घोळ घालणारे म्हणजे देशस्थ व आपल्यातले; पण हे वैद्य जास्तच घोळ घालणारे, म्हणजे आपल्यात, देशस्थात व त्या कायस्थात पण . तेव्हा ..'

अच्छा, अशी गोष्ट आहे तर श्यामच्या मनात आले वैद्य हे मराठी आहेत, ह्या आनंदापेक्षा ते कोणते 'स्थ' आहेत, आपल्या पैकी आहेत की परक्यापैकी आहेत, ह्याची शहानिशा कर्व्यांना करावयाची होती तर... व ती टा वाचून वा म. टा वाचूनही झाली नव्हती, त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. दुर्दैवाने श्यामकडला प्रकाश संपला होता. तो वैद्य कोण हे सांगू शकला नव्हता .

'चला, कचेरीला जायचंय' म्हणून कर्वे उठले श्यामलाही दाढी, आंघोळीच्या मागे लागणे भाग होते

आता कर्वे हा स्थ' प्रश्न कसा सोडवणार असा प्रश्न श्यामलाच पडला.

□

त्यानतर चार-पाच दिवसानंतरची गोष्ट. श्याम सध्याकाळी आपल्या सज्जात उभा होता तेव्हढ्यात कर्वे पण लागूनच्या त्याच्या सज्जात आले व म्हणाले,

'श्यामराव, ते वैद्य आपल्यातले नाहीत, देशस्थही नाहीत, चक्क कायस्थ आहेत !'

'म्हणजे तुम्ही चार दिवस त्याच्याच मागे होतात की काय ? व इतकी पक्की माहिती आर्मी हेड क्वार्टर्सकडून मिळाली की काय ?' श्यामने विचारले वैद्य आपल्यातले आहेत की नाही हे कळून घेण्याकरता कर्वे काय वाटेल ते करतील ह्याची श्यामला खात्री होती

'आर्मी हेडक्वार्टरकडे कशाला ? त्याच्यापेक्षा खात्रीचा पुरावा आहे ना ?'

'आर्मी हेड-क्वार्टरपेक्षा खात्रीचा ? तो कोणता ?'

'गेले दोन चार दिवसातले वैद्यावरचे कौतुकाचे लेख वाचा सगळे. कोणी रणदिवे, कर्णिक वगैरे लोकानी लिहिलेले ! तेव्हा ते कायस्थच असणार नाही तर ह्या लोकानी त्याच्यावर कशाला लिहिले असते ? आपल्यातले असते तर आपल्या लोकानी लिहिले असते.

हे मात्र खरे. कौतुक व्हायचे वा सहानूभुती मिळवायची ती शेवटी फक्त आपल्या जातवाल्याकडूनच !

□

## अकाली आंदोलन

# केंद्र सरकारने कणखरपणा, खंबीरपणा दाखवायला हवा !

अभय गोखले

पंजाबमध्ये काही दिवसातच अकाली आदोलनाला वेगळे वळण लागून शीख व हिंदू याच्यात सघर्ष होण्याचा धोका निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे एकत्र खेळीमेळीने रहाणाऱ्या हिंदू व शीख बांधवांत कटुता निर्माण होण्याचे प्रसग उद्‌भवत आहेत. हिंदुमदिरावर निशाणसाहेबचा झेंडा लावण्याच्या प्रश्नावरून अतिरेकी दलखालसा व हिंदुसंघटना याच्यात जोरदार जुपली आहे हिंदुसंघटनेने निशाणसाहेब हलवण्यास सागितले आहे तर दलखालसाने मंदिर खाली करण्याची धमकी दिली आहे अकाली व निरंकारी याचा नेहमीचा संघर्ष सर्वश्रुत आहेच. निरंकारीपथाचे प्रमुख बाबा गुरुबचनसिगांच्या खुनानतर अर्धा डझन निरकाऱ्यांचे दिवसा-ढवळ्या खून पाडण्यात आले; पण खुनी सापडले नाहीत. तसा गभीर प्रयत्नही झाला नाही. बहुतेक वेळा काही गुडानी मोटर-सायकलवरून निरंकाऱ्यावर गोळ्या झाडल्या व ते पळून गेले, पण पोलीस त्याना पकडू शकले नाहीत. डांसावजी अटवाल याच्या खुनानतर आणखी एका पोलीस-अधिकाऱ्याचा खून झाला; पण खुनी सापडले नाहीत. पंजाबकेसरीच्या लाला जगतनारायण यांचा खुनी अजून सापडला नाही. ही सर्व खुनांची मालिका चालू आहे आणि सरकार व पोलीस त्याकडे असहायपणे पहात आहेत. बाँब फेकण्याचे, घातपाताचे प्रकार रोज सर्रास घडत आहेत. ज्या सुवर्णमंदिरात खुनी लपून बसलेत असा सरकारला संशय आहे तेथे पोलीस घुसवण्याची सरकारला हिंमत होत नाहीये. लाला जगतनारायण याच्या खुनाविषयी सशयित असलेले भिंद्रनवाले मजेत आपले वास्तव्य सुवर्णमदिरात करत आहेत. तेथून भिंद्रनवाले अकाली नेत्याना चिथावण्याचे काम चोखपणे बजावत आहेत. मध्यतरी आठ दिवसांच्या आत सुवर्णमदिरात लपलेल्या गुन्हेगाराना सरकारच्या स्वाधीन करावे नाही तर तेथे पोलीस घुसवण्यात येतील अशी तवी सरकारतर्फे देण्यात आली; पण कारवाई करण्यात आली नाही.

आसाम-आंदोलकाप्रमाणे अकालीना चर्चेच्या भोवऱ्यात फिरवण्याचे काम सरकार चोख बजावत आहे. हिंदूचा पाठिंबा गमावण्याच्या भीतीने अकाल्याच्या धार्मिक मागण्या सोडल्या तर राजकीय मागण्या मान्य करण्यास सरकार चालढकल करत आहे. आकाशवाणीवरून रोज गुरुवाणी ठराविक वेळी प्रसारित करणे, सुवर्णमंदिराचा परिसरच नव्हे तर सपूर्ण अमृतसर शहर पवित्र शहर म्हणून घोषित करणे इत्यादी अकालीच्या मागण्या सरकारने ताबडतोब अंशत: मान्य करून समंजस अकालीना अतिरेक्यांपासून अलग पाडण्याचा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला असे वाटत नाही. सुवर्णमदिराच्या परिसरात सिगारेट व दारू विकण्यास मागेच बदी घालण्यात आली आहे. अकालीच्या राजकीय मागण्या म्हणजे राज्याना स्वायत्तता ( केंद्र व राज्यसबंधांचा पुनर्विचार ) चदिगड पजाबच्या ताब्यात देणे, रावी, बियास, सतलज या नद्याचे पाणी संपूर्णपणे पजाबलाच वापरू देणे अशा आहेत. यापैकी केंद्र-राज्यसबंधाचा नव्याने विचार करण्यासाठी केंद्र सरकारने सरकारीरीत्या कमिशनची नियुक्ती केली आहे चदिगड पजाबला देण्याच्या मोबदल्यात अबोहर व फाजिल्का हा परिसर पंजाबने हरयाणाला द्यावा असे अकालीना सुचवले आहे, ते अकालीना मान्य नाही त्याच्या मते चदिगड ताबडतोब पंजाबच्या स्वाधीन करावा व फाजिल्का, अबोहरच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी ट्रिब्यूनलची स्थापना करावी. रावी, बियास, सतलज या नद्याच्या पाण्यावर आपला पूर्णपणे हक्क असल्याचा दावा करताना त्यातील काही पाणी अकाली हरयाणास देण्यास तयार आहेत. कारण हरयाणा पूर्वी पंजाबचाच एक भाग होता; पण राजस्थानला पाण्याचा एक थेंबही देण्यास अकाली तयार नाहीत. याबाबतीत राजस्थान व हरयाणामधील सर्व थरातील लोकाच्या तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेता केंद्र सरकार अकालीपुढे नमणे शक्य वाटत नाही. पंजाबात अकाली आदोलनात अगोदरच इदिरा काँग्रेस पक्ष बदनाम झालाय त्यातच राजस्थान व हरयाणातील हिंदूना दुखावले तर सपूर्ण उत्तर भारतावरील आपली पकड सुटेल हे न कळण्याइतके केंद्र सरकार दुधखुळे नाही. तेव्हा पंजाबमधील व शेजारच्या राज्यातील हिंदूना चुचकारत अकालीना झुलवत ठेवणे हाच एक पर्याय इदिरा काँग्रेस पक्षासमोर आहे व त्याची अंमलबजावणी चालू आहे. हिमाचलप्रदेश, राजस्थान व हरयाणातील पंजाबी भाषिक प्रदेशावर हक्क सागण्याची अकालीची भाषा आततायी आहे.

### हिंदू-अकाली असंतोष धोक्याचा !

स्वत. इदिरा गाधी प्रत्यक्षपणे लोंगोवाल, तोहरा, बादल या अकाली नेत्याची भेट घेण्याचे टाळत आहेत. यावरून त्या अकाली आदोलनाला कितपत किंमत देतात हे सिद्ध होतेच. एन. टी. रामाराव, फरुक अब्दुल्ला, बहुगुणा, चद्रशेखर, जगजीवनराम इत्यादी विरोधीपक्षीय नेत्यांनी अकाली नेत्यांबरोबर बसून ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला; परंतु चंदिगड पंजाबला देण्याचा प्रश्न सोडल्यास बाकी समस्यांबाबत त्याना प्रगती करता आली नाही आणि विरोधी पक्षीयांकडून तरी यापेक्षा जास्त अपेक्षा काय करणार ? शेवटी

मताचे राजकारण त्यानाही करावे लागणारच. इंदिरा काँग्रेसप्रमाणेच हिंदूना जास्त दुखावणे त्याना परवडणारे नाही. शिवाय अकाली नेत्यामध्ये बादल, बर्नाला यासारख्या समजस नेत्याना साथ कुठे मिळतेय ? तोहरा, तळवडी, लोंगोवाल भिंद्रनवाल्याच्या सल्ल्याने वागत आहेत. त्यांच्याकडून जास्त अपेक्षा ठेवता येणार नाहीत लाला जगतनारायण याच्या खुनानंतर संशयित म्हणून पकडलेल्या भिंद्रनवाल्याना सोडून देण्याची चूक सरकारला भोवत आहे. भिंद्रनवाल्याच्या चिथावणीने कित्येक अकाल्याचे बळी गेले. चौक मेहता येथे सतराजण बळी पडले. भिंद्रनवाले खलिस्तानचा उघडउघड प्रचार करतात सुवर्णमदिर हा खुनी व गुन्हेगाराचा अड्डा बनला आहे, त्याला भिंद्रनवालेच जबाबदार आहेत. बाबा गुरुवचनसिंग व लाला जगतनारायण याचा ज्यांनी खून केला त्याच्याबद्दल आपल्याला अभिमान वाटतो असे भिंद्रनवाले खाजगीत बोलतात. एवढेच नव्हे तर अकाल तख्तातर्फे त्याना सर्वोच्च बहुमान अर्पण करून त्याची सुवर्णतुला करावी असे त्याना वाटते. हिंदूबद्दल त्याना द्वेष वाटतो. त्याच्या मते सरकार हिंदू व शिखाच्यात भेदभाव करते. शिखाचा पर्सनल लॉ मुसलमानाप्रमाणे वेगळा असावा असे त्याना वाटते

भिंद्रनवाल्याप्रमाणेच दुसरे जहाल शीखनेते संधू हे गुरुनानकनिवासातच तळ ठोकून आहेत संधूच्या मते शिखानी भारतापासून फुटून निघण्याची वेळ आता आली आहे लोंगोवाल यानी एक लाख अकालीचे सरक्षक दल उभारले आहेच. तेव्हा प्रश्न वाटतो तेवढा सोपा नाही. चार एप्रिलला रास्ता रोको आदोलनात पोलिसाना प्रतिकार करून आपण कोणत्या थरापर्यंत जाऊ शकतो याची चुणुक अकालीनी दाखवली आहेच या पोलीस–अकाली सघर्षात वीसजणाचा बळी पडला सात एप्रिल रोजी पजाबमधील फिरोझपूर येथील गृहरक्षकदलाच्या शस्त्रागारातून स्टेनगन्स आणि रायफली पळवण्यात आल्या, ही बाब साधी नाही ही गोष्ट संगनमताशिवाय होणे शक्य नाही. पजाब हे भारताच्या सरहद्दीवरील राज्य असल्याने तेथे असंतोष फार काळ धुमसू देणे धोक्याचे आहे मे महिन्यात अकाली दलाने रास्ता रोको आदोलनाच्या धर्तीवरच रेल्वे रोको आदोलनाची घोषणा केली. सरकारने त्या दिवशी पंजाबमधील रेल्वेची सर्व वाहतूकच स्थगित करून रेल रोको आदोलनाचा फज्जा उडवला हे चागले केले. एक तर त्यामुळे हिंसाचार वाचला व सार्वजनिक सपत्तीची हानी झाली नाही.


पजाबमध्ये हिंदूची सख्या सत्तेचाळीस टक्के आहे. अकालीचे आदोलन हे सर्व शिखाचे आदोलन आहे, हा अकालीचा दावाही फसवा आहे शीख हे फक्त अकालीदलातच नसून इदिरा काँग्रेस, जनता, कम्युनिस्ट व इतर पक्षात विखुरलेले आहेत. गुरुवाणी, अमृतसर–शहर हे पवित्र शहर इत्यादी अकालीच्या मागण्याबद्दल पंजाबमधील हिंदूना सोयरसुतक असण्याचे कारण नाही. तेव्हा अकालीच्या धार्मिक मागण्या या पंजाबच्या मागण्या नाहीत. शिवाय अकालीदल हे आतापर्यंत दोनदा पजाबात सत्तेवर होते तेव्हा त्यानी याबाबतीत काय केले ? अकाली आंदोलनात निरनिराळे बद पाळण्यात आले तेव्हा हिंदू व्यापाऱ्यावर दुकाने बद करण्याची सक्ती करण्यात आली. अर्थात याचे परिणाम भारतात इतरत्र होतीलच व ते तसे व्हायला लागलेही आहेत. पजाबजवळच्या हरयाणात नुकत्याच एका हिंदू सघटनेने पुकारलेल्या बंदमध्ये काही अकालीना त्रास देण्यात आला पजाबमध्ये हिंदूना ज्या कठीण प्रसंगाला तोड द्यावे लागत आहे त्याच्या निषेधार्थ हा बद हरयाणात पुकारण्यात आला होता आज हा प्रकार हरयाणापुरताच मर्यादित आहे; पण काही दिवसानी तो भारतभर पसरावयास वेळ लागणार नाही, याची जाणीव अकालीदलांनी ठेवलेली बरी. त्याचप्रमाणे शिखाचे सैन्यातील व पोलीसदलातील सख्याबळ लक्षात घेता हा प्रश्न जास्त चिघळवणे अत्यंत धोक्याचे आहे. सध्या अकालीबद्दल बहुसख्य शिखाना सहानुभूती असेलच असे नाही; पण जर आंदोलनाने उग्ररूप धारण केले व त्यात बऱ्याच अकालीचा बळी पडला तर ते बहुसंख्य शिखाची सहानुभूती मिळवू शकतील, या गोष्टीकडे कानाडोळा करता येणार नाही. शिखाच्या राजकीय मागण्याबाबत अकाली जेवढे टोकाला जात आहेत तेवढे हिंदू जातीलच असे नाही शिवाय अकाली आदोलनात काही निरपराध हिंदूना विनाकारण त्रास झाल्याने व त्याच्या मदिराच्या बाबतीत काही झगडे निर्माण झाल्याने अकालीदल पजाबातील हिंदूची सहानुभूती घालवून बसले आहे आणि केंद्रसरकारला तर हेच हवे आहे जर अकाली–हिंदू असा संघर्ष झाला तर अकालीच्या मागण्या ह्या पजाबच्या मागण्या नसून फक्त मूठभर शिखाच्या मागण्या आहेत असे म्हणून केंद्रसरकार त्याना वाटाण्याच्या अक्षता लावू शकेल अकालीदलाचे नेते अजून तरी याबाबतीत समजूतदारपणे वागत असून हिंदू–अकाली असा सघर्ष उद्‌भवणार नाही याची दक्षता घेत आहेत; परंतु भिंद्रनवाले, सधू, दलखालसा याना मात्र अकालीनी आवरायला हवे

## मतांचे राजकारण नको !

दिवसाढवळ्या पजाबात निरंकारीचे खून पडत आहेत आणि राज्यसरकार, केंद्रसरकार, पोलीस या बाबतीत काहीच करू शकत नाहीत या गोष्टी चीड आणणाऱ्या आहेत आजवर डझनभर तरी निरकारीचे खून पडले त्यातील किती खुनी पकडण्यात पोलिसाना यश आले ? अशीच परिस्थिती कायम राहिली तर पंजाब–हरयाणात निरकारीना सुरक्षित रहाणे अशक्यप्राय होऊन बसेल. सरकार दरवेळेस सुवर्णमदिरात खुनी व गुन्हेगार लपून बसल्याचा संशय व्यक्त करते मग तेथे पोलीस घुसवण्याचे धाडस का करीत नाही ? अजून किती निरपराध लोकाचा बळी पडल्यावर सरकार या खुन्याना ताब्यात घेणार आहे ? विरोधी पक्षीयानीही सरकारला या बाबतीत सहाय्य करून सुवर्णमदिरात पोलीस घुसवण्याबाबत सरकारला पाठिंबा द्यावयास हवा या बाबतीत मताचे राजकारण न करता विरोधी पक्षीय नेत्यानी अकाली नेत्याचे मन या बाबतीत वळवायला हवे आहे. सुदैवाने बहुतेक विरोधी पक्षानी अकालीच्या काही बाबतीतील आततायी भूमिकेचा निषेध केला आहे

निधर्मीपणाच्या गोष्टी बोलणारे केंद्रसरकार तसे वागत नाही. सुवर्णमदिरात गुन्हेगाराचा अड्डा आहे अशी खात्री असेल तर तिथे पोलीस घुसवण्यात शिखाच्या भावना दुखावण्याचा प्रश्न येतोच कुठे ? हीच बाब जर एखाद्या मदिराच्या बाबतीत घडती तर सरकार

पृष्ठ २४ वर



# दि इस्लामिक बॉंब

लेखक : स्टीव्ह वेसमन
हर्बर्ट क्रोस्ने
रूपांतर : मो. ग. तपस्वी
दिल्ली
लेखांक : दुसरा

## कुणाला हवाय अणुबॉंब ? तो तयार कसा करणार ?

पश्चिम आशिया म्हणजे नेमके काय ? कोणकोणते देश येतात त्यात ?

मोरोक्कोच्या सुंदर माराकेशपासून गजबजलेल्या कायरोपर्यंत, तेलावर तरंगणाऱ्या अरबस्तानपासून थेट पाकिस्तानपर्यंतचा भूभाग पश्चिम आशयात मोडतो. जगातला कदाचित हा सर्वात जटिल आणि कमालीचा विभक्त असा भूभाग आहे. त्यातील विविधतेला तोड नाही. त्याच्यासारखा समृद्ध इतिहास कुणाचा नाही आणि त्याच्याइतका डोक्यात राख घातलेला प्रदेश दुसरा नाही. केव्हा कशावरून रक्तपात होईल आणि वेडेपणाचे युद्ध सुरू होईल याचा काहीही नेम नाही. अणुयुद्धाचा धोका नव्हता तेव्हाही या भागातील देशांच्या आसपास क्षुल्लक कारणावरून लढाया होतच होत्या आणि आजही होतच आहेत. इराक–इराण यांचे हाडवैर तर हजारो वर्षांपासून चालू आहे. त्यांच्यात युद्धे हा आता आश्चर्याचा विषयच असू नये. पाकिस्तानने तरी भारताबाबत कोणते धोरण स्वीकारले आहे ? त्यात युद्धे आहेतच. १९६५ आणि १९७१ मध्ये पाकिस्तान भारताशी लढलाच. त्यात त्याचे तुकडे झाले; पण अजूनही युद्धाची खुमखुमी काही जात नाही.

पाकिस्तान आणि इस्रायलसारखे देश फाळणीतून जन्माला आले आहेत. कुणाचेही या फाळण्यांनी समाधान झालेले नाही. साम्राज्यवादी देशांच्या सणकीखातर इराकसारखे देश जन्माला आले आहेत. परस्परविरोधी धर्मांचे, संप्रदायांचे आणि इतिहासाचे लोक एका सरहद्दीत बांधून त्यांची राष्ट्रे उभारण्यात आली आहेत. दुसऱ्यावर वरचष्मा राखण्यासाठी किंवा आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी किंवा निव्वळ जगण्यासाठी कुठल्या ना कुठल्या निमित्ताने ही राष्ट्रे सतत लढाया करीतच असतात. कुर्द आणि अरब, शिया आणि

काही वर्षांपूर्वी लढाऊ विमानांचे एखादे स्क्वाड्रन विकत घेणेही आम्हाला मोठे कठीण होते. उद्या, आम्ही एखादा अणुबॉब आणि त्याचे सर्व सुटे भाग विकत घेऊ शकणार आहोत. अणुबॉबची मक्तेदारी आता कोणत्याही क्षणाला संपणार आहे.

—कर्नल मुआम्मर गदाफी
—ली पॉइट, २० जाने. ७५

सुन्नी मुसलमान, लेबेनीज ख्रिश्चन आणि लेबेनीज मुसलमान, असे हेवेदावे अखड चालूच आहेत हिंसा भडकते आहे, रक्त सांडते आहे, युद्धे सुरू आहेत.

पण अशा या भूभागात सर्वांना सांधणारी एक प्रबळ गोष्ट आहे, इस्लाम. उत्तर आफ्रिकेपासून पाकिस्तानपर्यंत, इतकेच नव्हे तर भारतातीलही काही भागात इस्लामची भावना प्रबळ आहे तसे पाहिले तर पूर्वेकडे इस्लाम तसा इंडोनेशिया आणि फिलिपिन्सपासून दक्षिणेकडे अगदी कृष्णखंड आफ्रिकेपर्यंत पसरला आहे; पण तेथे त्याचे अस्तित्व स्पर्शिल्याशिवाय जाणवत नाही; परतु पश्चिम आशियामध्ये मात्र निरर्थक भौगोलिक फाफटपसाऱ्याला बांधून ठेवले आहे ते मात्र इस्लामने, त्यात प्राण ओतले आहेत ते फक्त इस्लामने, हे पावलोपावली जाणवते. इस्लाम ही निव्वळ पूजापद्धती राहिलेली नाही. ती आता एक जीवनपद्धतीच झालेली आहे आणि त्यात भक्ती आणि राजनीती यांची अस्वस्थ करणारी गुंफण विणलेली आहे. म्हणूनच इस्लाममध्ये आपल्याला आयातुल्ला खोमेनीचा इराण, मुआम्मर गदाफीचा लिबिया आणि सौदी राजाचा अरबस्तान पहायला मिळतात.

पण चिंतनाच्या मोहकतेमुळे, समृद्ध परपरेमुळे, महान ससिद्धीमुळे जगाच्या इतिहासाला वळण लावणारी एक जबरदस्त शक्ती म्हणूनच आपल्याला आजवर ज्ञात असलेल्या या इस्लामी भावनेची जडण-घडण आता बदलू लागली आहे. पुन्हा एकदा देशाच्या सरहद्दी ओलांडून इस्लामी संस्कृतीत नवचैतन्य आले आहे हे नवचैतन्य पैगंबराच्या शिकवणीचा जो वारसा इस्लामला लाभला आहे त्यातून नव्हे तर, भूगर्भतेलाचे विशाल साठे या इस्लामी भूभागात गवसले आहेत, त्यातून आकाराला आलेले आहे. एकट्या सौदी-अरबस्तानातच ३०० अब्ज बॅरल्स तेल सापडू शकते असा तज्ज्ञाचा दावा असला तरी १८० अब्ज बॅरल्स तेल म्हणजेच जगाच्या एकूण तेलसाठ्याच्या २५ टक्के तेल तेथे असल्याचे सिद्ध झाले आहे. या तेलामुळे या इस्लामी देशाना गर्भश्रीमती आणून दिली आहे. लोकाचे रहाणीमानच नव्हे तर एकूणच जीवनपद्धतीत मोठा बदल घडवून आणला आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की, या तेलाने जगातील सत्तासमतोलदेखील बदलून टाकला आहे. तेलसमृद्धीने इस्लामी सामर्थ्याने नवेच आयाम धारण केले आहेत.

आजकालच्या इस्लामी राष्ट्रामध्ये आणखीही एक भावना बळावते आहे. दुर्दैवाने तिच्याकडे जगाचे जायला हवे तितके लक्ष गलेले दिसत नाही. आपल्या तेलसंपत्तीच्या बळावर आपण जगातले काय हवे ते खरेदू शकतो अशी भावना या देशात फोफावली आहे आणि या 'काय हवे ते' मध्ये आता अणुबॉबचाही समावेश झाला आहे. मुख्यत: लिबिया, इराक आणि पाकिस्तान यानी तर अणुबॉबचा ध्यासच घतलेला आहे 'आमच्या हातात परमाण्वस्त्रे आली की, आम्हाला जगात ताठ मानेने चालता येणार आहे' एका माजी पाकिस्तानी अधिकाऱ्याने आम्हाला स्पष्टच सांगितले होते. तो म्हणाला होता, 'अण्वस्त्रामुळे महाशक्तीच्या मांडीला मांडी लावून आम्ही बसू शकणार आहोत. आमच्या भूभागात, अरब किंवा इस्लामी नसलेल्या दोन समाजाच्या बरोबरीने येणार आहेत. हे दोन समाज आहेत इस्रायली आणि भारतीय अरब किंवा इस्लामी नसूनही या दोन देशाजवळ एक तर आजच अण्वस्त्रे आहेत किंवा त्यांची निर्मिती करू शकण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे'

तेव्हा या इस्लामी देशानी अणुबॉबचा ध्यास का घेतला आहे ते यावरून स्पष्ट होते. वास्तविक इस्लामी आणि अरबनेते काय बोलत आहेत ते नीट लक्ष देऊन ऐकणाऱ्या कुणालाही त्याचा हा हेतू सहज लक्षात यायला हवा आहे; परंतु या नेत्याना जे हवे आहे ते साध्य करण्यासाठी इस्लामी देशामध्ये अणुविज्ञानाचे तंत्र आणि मंत्र असायला हवे आहे ते फक्त औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या पाश्चात्य देशाकडूनच त्याना मिळू शकते.

दुसऱ्या महायुद्ध–काळात जगातला पहिला अणुबॉब अमेरिकेतील मॅनहाटन परियोजनेत तयार करण्यात आला. तेव्हापासून पुढच्या सर्व अणुबॉबनिर्मात्यानी दोन वेगवेगळी अणु–विस्फोटके वापरली आहेत. एक आहे समृद्ध युरेनियम आणि दुसरे आहे प्लुटोनियम. दोन्ही विस्फोटकाची सुरुवात नैसर्गिक युरेनियमपासून होते. जगाच्या निरनिराळ्या भागात असलेल्या खाणीतून नैसर्गिक युरेनियम काढावे लागते. यातून दोन निरनिराळ्या प्रकारचे बॉब तयार करता येतात. त्यासाठी बॉबनिर्मात्याना दोन सर्वस्वी भिन्न आणि अत्यत जटिल अशा अणु-तंत्रप्रणालीपैकी एकीचा वापर करीत युरेनियम राबवावे लागते. यातून सुटका नाही. अमेरिकनानी तेच केले आणि रशियानेही तेच केले. नव्याने अण्वस्त्रधारी झालेल्या देशानादेखील या प्रणालीपैकी एकीचा वापर करावाच लागलेला आहे आणि आता इराक किंवा पाकिस्तान, भारत अथवा इस्रायल असे जे कुणी देश अण्वस्त्रधारी व्हायला निघतील त्यानाही तेच करावे लागणार आहे.

पहिल्या प्रणालीत बॉबनिर्मात्याना युरेनियमच्या दोन भिन्न अवस्थांची–यानाच वैज्ञानिक आयसोटोप्स म्हणतात–दखल घ्यावी लागणार आहे. पहिल्या प्रकारच्या आयसोटोप्सना युरेनियम–२३८

म्हणतात. खाणीतून काढलेल्या खनिजातून या प्रणालीने जवळजवळ ९९ ३ टक्के युरेनियम उपलब्ध होते आणि ते तसेच चांगले सौम्य प्रकृतीचे असते दुसऱ्या आयसोटोप्सना युरेनियम–२३५ म्हणतात आणि त्यातून उरलेले ० ७ टक्के युरेनियम उपलब्ध होते. हे युरेनियम–२३५ त्या मानाने बरेच हलके असते आणि म्हणूनच त्यातील अणु लवकर विघटित होऊ शकतात अणुविघटनाच्या या प्रक्रियेलाच फिजन म्हणतात आणि त्यातूनच तो महाभयकर विस्फोट होतो,

यातील कौशल्य आहे या दोन सर्वथा भिन्न प्रकारच्या आयसोटोप्सना परस्परापासून अक्षरश· वेगळे करण्याचे आणि त्यानंतर दुर्मिळ आणि अत्यंत विस्फोटक अशा युरेनियमच्या प्राप्तीचे प्रमाण चागले ९३ टक्क्यापर्यन्त वाढवीत नेण्याचे अणुतत्रविज्ञानाच्या क्षेत्रात हे कौशल्य आत्मसात् करणे अत्यत कठिण मानले जाते. या प्रक्रियेलाच ‘युरेनियमला परिष्कृत करणे’ असे म्हणतात. जगातील औद्योगिकदृष्ट्या अत्यंत प्रगत राष्ट्रांपैकी अगदी मोजक्याच देशांनी ही अत्यंत जटिल अशी प्रक्रिया कौशल्याने आत्मसात् केलेली आहे, हे आपण पुढे पाहणारच आहोत. निदान आजपर्यन्त तरी ही अवस्था आहे, उद्याचे कुणी सागावे ?

अणुबॉब तयार करण्यासाठी या अत्यंत परिष्कृत युरेनियमचा पुरेसा साठा मिळवणे हीच मुख्य अडचण आहे. एका वेळी एका बॉबसाठी असा ‘सक्षम साठा’ पदरी असणे अतिशय कठिण आहे. असू शकते. युरेनियम आणि तथाकथित ‘विघटनक्षम’ द्रव्ये परमाणु–प्रक्रियेतून निघतात त्याच्यातच मिसळून ते अत्यंत किरणोत्सर्गी स्वरूपात भट्टीतून बाहेर येत असते. मग ते झाळून–गाळून कसे काढणार ?

या प्रक्रियेलाच शास्त्रज्ञ पुनर्प्रक्रिया असे म्हणतात आणि ती ते अत्यंत दक्षतापूर्वक संरक्षित ‘उष्ण–दालनात’ किंवा त्यासाठीच खास उभारण्यात आलेल्या प्युटोनियम पुनर्प्रक्रिया कारखान्यातच हाती घेत असतात. सोप्या भाषेत सागायचे म्हणजे इंधन-काड्यांच्या स्वरूपातच सामान्यपणे बाहेर पडणारे, किरणोत्सर्जनाने प्रकाशमान झालेले द्रव्य घ्यायचे, ते थड होऊ द्यायचे. मग त्याचे तुकडे तुकडे करून आम्लात ते विरघळवायचे आणि मग मूलभूत रसायनशास्त्रातील सिद्धातानुसार त्याला उरलेल्या युरेनियम आणि अन्य विघटनक्षम पदार्थांपासून वेगळे करायचे, अशी ही प्रक्रिया आहे.

आता अण्वस्त्र नेमके कशा प्रकारचे आणि किती गुतागुतीचे हवे आहे त्याप्रमाणे कमी–जास्त प्रमाण होणार असले तरी, अमेरिकेने नागासाकी या आपल्या दुसऱ्या लक्ष्यावर १९४५ साली जो अणुबॉब टाकला त्या धर्तीचा बॉब तयार करण्यासाठी सामान्यपणे पाच ते आठ किलो प्लुटोनियमची गरज लागेल.

अर्थातच, एवढ्याने थोडेच भागणार आहे ? कोणत्याही नवशिक्या बॉबनिर्मात्याला आपला अणुबॉब कशा आणि कोणत्य

## ....प्रत्यक्षात अणुबॉंब तयार करण्याचेच काय ते भारताने बाकी ठेवले, पण

१९४५ च्या ऑगस्टमध्ये अमेरिकेने हिरोशिमा या जपानी नगरावर जो अणुबॉब टाकला होता त्यात असे परिष्कृत युरेनियम जवळजवळ २० किलो किंवा ४४ पौंड वजनाचे होते. नंतरच्या सुधारलेल्या बॉबमध्ये अमेरिकेने सात–आठ किलो परिष्कृत युरेनियम वापरायला सुरुवात केली आहे.

अणुबॉब तयार करण्याची दुसरी पद्धत नैसर्गिक युरेनियमनेच सुरू होते; पण युरेनियमला परिष्कृत करीत बसण्याच्या भानगडीत या पद्धतीतील शास्त्रज्ञ पडत नाहीत. त्याऐवजी ते खाणीतून काढलेले युरेनियम (याला गार्डन–व्हरायटी) एका परमाणु–भट्टीत घालतात. त्याचे स्वरूप सामान्य वीजभट्टीतील इंधन-काड्यासारखे असते किंवा त्या मानाने शक्तिमान असलेल्या परमाणु–भट्टीतील गाभ्याभोवती घातलेल्या आवरणासारखे असते. यामुळे गाभ्यात होणारी साखळी–परमाणु–प्रक्रिया लक्षावधी न्यूट्रॉन–कण उधळू लागते. हे न्यूट्रॉन-कण सामान्यत. सौम्य प्रकृतीच्या असलेल्या युरेनियम–२३८ च्या कणावर जाऊन कोसळतात आणि त्यातून एक नवे मानवनिर्मित द्रव्य तयार होते. याला प्लुटोनियम म्हणतात. याचा उपयोग नवे परमाणु–इंधन तयार करण्यासाठी किंवा अण्वस्त्राना लागणारी विस्फोट–सामग्री तयार करण्यासाठी करण्यात येतो.

परंतु या पद्धतीने प्लुटोनियम तयार करणे म्हणजे अणुबॉबनिर्मितीची फक्त निम्मीच मजल पार करण्यासारखे आहे. उरलेली निम्मी मजल भट्टीत वापरल्यामुळे जळून गेलेल्या इंधनातून ते प्लुटोनियम झाळून काढणे ही असते. खुद्द प्लुटोनियम अतिशय विषारी आकार–प्रकाराचा असावा हे स्वत: ठरवावे लागणार आहे. म्हणजेच अत्यंत परिष्कृत केलेल्या युरेनियमचा किंवा प्लुटोनियमचा अण्वस्त्रात वापर कसा करायचा हे त्याचे त्यालाच ठरवावे लागणार आहे आणि हा काही पोरखेळ नव्हे. अणुबॉबनिर्मितीबाबत गेल्या कित्येक वर्षांत पुष्कळ लिखाण झालेले असले, रेडिओ आणि टेलिव्हिजन या माध्यमातूनही त्यावर बरेच कार्यक्रम झालेले असले, तरीही ते वाचून वा पाहून एखाद्या कुशाग्र बुद्धीच्या तरुण भौतिकी–पदवीधराने किंवा दहशतवादी सोम्यागोम्या गुडपुडाच्या एखाद्या टोळक्याने लगेच अणुबॉब तयार करायला निघावे इतके काही ते सोपे काम नाही. तरीही अत्यंत गुतागुतीची जटिल अणुभट्टी चालवण्याचे शास्त्रीय ज्ञान असलेला कोणताही देश त्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य प्रयत्नांती प्राप्त करू शकेल आणि मग अणुबॉब तयार करण्याकरता लागणारी बाकी गणिते खुल्या शास्त्रीय साहित्यातून त्याला सहजी उपलब्ध असतील.

परिष्कृत युरेनियम किंवा पुनर्प्रक्रिया केलेले प्लुटोनियम सर्वसाधारण समाजाच्या परमाणु–कार्यक्रमाचे भागच आहेत. त्याचे आवश्यक ते तंत्रविज्ञान विकत घेण्याइतके धन गाठी असलेले कोणतेही राष्ट्र ही दोन्ही द्रव्ये खरेदी करू शकेल आणि तेही चक्क खुल्या बाजारात आणि परमाणु–ऊर्जा नियमनाच्या आतरराष्ट्रीय एजन्सीच्या अनुज्ञेने. अशा प्रकारे उघड उघड खरेदी केलेले परिष्कृत युरेनियम किंवा प्लुटोनियम अणुबॉब तयार करण्यासाठी वापरता येणे शक्य आहे. पश्चिम आशियातील मूठभर राष्ट्रे आज नेमके हेच

करीत आहेत. भारत, इस्रायल, पाकिस्तान आणि इराक ही पश्चिम आशियातील किंवा त्याच्या लगतची चार राष्ट्रे अण्वस्त्रधारी होण्याच्या मार्गावर अग्रेसर झालेली आहेत हे आम्ही पुढे दाखवून देणारच आहोत. पाचवे राष्ट्र आहे लिबिया आणि तेही स्वत.साठी अणुबाँब खरेदी करायला, उसना घ्यायला किंवा चक्क चोरी करायला तयार झालेले आहे कर्नल गदाफी त्याच्या या प्रयत्नाचे नेतृत्व करीत आहेत.

सर्वाआधी भारताने हा प्रयत्न आरंभिला कॅनडाने पुरविलेल्या संशोधनपट्टीचा वापर करून त्याने प्लुटोनियम उघड-उघडपणे झाळून गाळून घेतले. त्यातूनच मे १९७४ मध्ये भारताने 'शांततामय परमाणु-उपकरण' बनवून त्याचा चाचणी-स्फोट केला. भारताने दाखवून दिले की, राजकीय वज्रसंकल्प असला तर एक गरीब आणि चारी बाजूनी दडपणाखाली असलेला देशदेखील अण्वस्त्र तयार करू शकतो. इतर तत्सम देशानी असाच प्रयत्न करण्याचा मार्गच जणु भारताने प्रशस्त करून दिला.

पाश्चात्य सूत्राकडून आम्हाला समजले की, प्रत्यक्षात अणुबाँब तयार करण्याचेच काय ते भारताने बाकी ठेवले; पण मनात आणू तेव्हा तेही उत्पादन आम्ही करू शकण्याच्या स्थितीत आहोत हेच भारताने आपल्या चाचणीस्फोटाने जगाला दाखवून दिले; पण आता पाकिस्तान आणि त्याच्या परमाणु-आकांक्षा लक्षात घेता भारताने

भारतीयाप्रमाणेच इस्रायलनेही फ्रान्सने पुरविलेल्या संशोधन-भट्टीचा वापर करून आवश्यक ते प्लुटोनियम तयार केले आहे. सी. आय. ए. चा याबाबतचा १९७४ चा जो अहवाल नजरचुकीने १९७८ मध्ये प्रसिद्ध झाला त्यात स्पष्टच म्हटले आहे की, पेन्सिल्व्हानियातील एका लहानशा परमाणु-प्रतिष्ठानातून काढलेल्या परिष्कृत युरेनियमने इस्रायलने अण्वस्त्रे बनविली आहेत.

हे सर्व करताना इस्रायलने कधीही आपल्या चाचणी-स्फोटाबाबत चकार शब्द काढलेला नाही आणि वृत्तपत्रातील याबाबतच्या बातम्या तर इस्रायलपाशी १२ ते २० अणुबाँब नक्कीच तयार आहेत असे सांगत आहेत इस्रायल यालाच 'क्षमता' म्हणत असतो. आज तरी पश्चिम आशियात इस्रायल हेच एकमेव खरेखुरे अण्वस्त्रधारी राष्ट्र आहे.

पश्चिम आशियात इराक हे अण्वस्त्रप्राप्तीच्या मागे लागलेले दुसरे राष्ट्र. त्याची ओसिराक येथील परमाणु-भट्टी इस्रायलने उध्वस्त केल्यानंतर राष्ट्रपती सद्दाम हुसेन यानी सरळ सरळ अण्वस्त्रधारी बनण्याचे जाहीर आवाहन केले. त्यानी म्हटले-'आता शांतताप्रिय देशानी अरबाना अण्वस्त्रे मिळवून देण्यासाठी मदत केली पाहिजे, म्हणजे इस्रायलजवळ ती असल्यामुळे निर्माण झालेला असमतोल सावरता येईल '

सावधपणाचा आविष्कार म्हणून सद्दाम हुसेन नंतर वेळोवेळी

## मनात आणू तेव्हा तेही उत्पादन करू शकणाऱ्या परिस्थितीत भारत आहे.

तारापूर येथील आपली अणुभट्टी स्वसामर्थ्यावर सुरू करण्याचा इरादा जाहीर केला आहे तारापूरला पुनर्प्रक्रिया संयंत्र आहे आणि ते पुन्हा सुरू झाले तर तेथे भारत वापरलेल्या अणु-इंधनाच्या काडयाचे रूपांतर अण्वस्त्रासाठी वापरावयाच्या इंधनात करू शकतो. भारतीय समरव्यूहविशेषज्ञ के. के. सुब्रह्मण्यम् हे नवी दिल्लीच्या संरक्षण, अध्ययन आणि विश्लेषण संस्थेचे संचालक तर भारताने आता उघड उघड अण्वस्त्रनिर्मिती हाती घेतली पाहिजे असे जाहीरपणे म्हणू लागले आहेत.

इस्रायलचे वक्ते-प्रवक्ते एखाद्या आन्हिकातल्या मंत्रासारखे सतत म्हणत आहेत की, प्रत्यक्षात अण्वस्त्रनिर्मिती आम्ही सुरू केलेली नाही, इस्रायलमध्ये ती 'क्षमता' कधीचीच आलेली आहे. इस्रायलचे माजी परराष्ट्रमंत्री मोशे दयान यानी, इस्रायलने इराकच्या ओसिराक अणुभट्टीवर हल्ला चढवल्यानंतर इटालियन टीव्हीवर सांगितले होते, 'अण्वस्त्रे निर्मिण्याची क्षमता इस्रायलपाशी अवश्य आहे आणि अरबाना जर पश्चिम आशियात अण्वस्त्राचा शिरकाव करायचाच असेल तर मग प्रत्यक्ष अण्वस्त्रे तयार करायला इस्रायललाही फार वेळ लागणार नाही.'

अण्वस्त्रे निर्मिण्याची क्षमता असणे आणि प्रत्यक्षात ती बनवणे यातील नेमका फरक हा अमेरिकेच्या सी. आय. ए. ला आणि फ्रान्सला प्रसंगी बुचकळ्यात टाकीत आला असला तरी या दोघांना खात्रीलायकपणे वाटत आहे की, इस्रायलजवळ प्रत्यक्षात अणुबाँब आहे!

म्हणाले आहेत की, इराकला बाँब हवा आहे असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाही; पण जर ज्यू इस्रायल तो बनवू शकतो तर अरबाना तो बनविता का येऊ नये आणि मोठी राष्ट्रे जर हा खेळ खेळू शकतात तर मग तथाकथित तृतीय विश्वाच्या नवोदित राष्ट्रांनाही तो का खेळता येऊ नये, ही खंत त्याच्या त्या इन्कारातूनही प्रकट होतेच. परिष्कृत युरेनियम आणि पुनर्प्रक्रिया केलेले प्लुटोनियम अशी दोन्ही प्रकारची सामग्री वापरून दोन प्रकारचे अणुबाँब तयार करण्याचे काम ओसिराक-भट्टीत व्हायचे होते; पण ती भट्टीच इस्रायली बाँबहल्ल्यात उध्वस्त झाल्यामुळे इराकला आता पुनश्च हरि ओम्पासून सुरुवात करावी लागणार होती सद्दाम हुसेन यानी तीच तयारी चालवली आणि तोवर त्याचा उभा दावेदार राहिलेला सौदी अरबस्तान त्यासाठी येणारा सर्व खर्च द्यायला तयार झाला.

इस्लामी दुनियेत पाकिस्तानचा परमाणु-कार्यक्रम अत्यंत प्रगत आहे. त्यासाठी पाकिस्तान अरबांशी उत्तरोत्तर वाढती सलगी राखून आहे. त्याने नुसते लष्करी सल्लागारच नव्हे तर सौदी अरबस्तानसारख्या देशाला आणि आखाती देश अबूधाबीला सैन्यपुरवठाही केला आहे. जॉर्डन आणि लिबिया यानाही पाकिस्तानने अशी मदत केली आहे. प्रतिसाद म्हणून पाकिस्तानला तेलसंपन्न राष्ट्रांचा पैसा मिळाला आहे आणि कर्नल गदाफीने तर पाकिस्तानच्या अणुबाँबनिर्मिति योजनेला-सुरुवाती-सुरुवातीला सरळ पैसा पुरवला आहे.

आपल्या अणुबाँब-योजनेसाठी पाकिस्तानने हॉलंडमधल्या अल्मेलो येथील ब्रिटिश-डच-जर्मन याच्या संयुक्त उपक्रमाकडून परिष्कृत

युरेनियम मिळवले असून त्यानीच पुरवलेल्या प्रक्रियेनुसार अणुइंधन तयार केले आहे हा प्रकार यूरेन्को या नावाने ओळखला जातो. पाकिस्तानातून बाहेर पडलेल्या धातुशास्त्रज्ञ डॉ. अब्दुल कादिर खान यानी यूरेन्को-प्रक्रिया प्राप्त केली आहे. पाकिस्तानने आपला अणुबॉंब बनविण्यासाठी प्लुटोनियम-प्रतिक्रियाही विकत घेतली आहे ती त्याला विकली आहे फ्रान्स आणि बेल्जियम यांनी. या दोन्ही प्रक्रिया परमाणुतंत्रविज्ञानातील पाश्चात्य जगातल्या सर्वोत्तम प्रक्रिया मानल्या जातात. त्यासाठी लागणारी सर्व उपकरणे आणि साधन-सामग्री पाकिस्तानने आन्तर्राष्ट्रीय बाजारातून विकत घेतली आहे. यापैकी प्रत्येक प्रक्रिया पाकिस्तानला आणि त्याच्या इस्लामी दोस्ताना एक नव्हे, दोन, तीन, अनेक अणुबॉंब देण्यास समर्थ आहे.

अमेरिकेच्या गुप्त माहितीसूत्रांकडून आम्हाला समजले आहे की, तसे पाहिल्यास आपल्या अण्वस्त्राचा पहिला चाचणी-स्फोट १९८२ च्या सुरुवातीलाच पाकिस्तान करू शकत होता; पण पाकिस्तानच्या परमाणु-कार्यक्रमावर ज्यांची अत्यंत बारीक नजर आहे असे अमेरिकन सरकारातील लोक आम्हाला सांगत गेले आहेत की, पाकिस्तान चाचणी-स्फोट करण्याच्या भानगडीतच पडायचा नाही. चाचणी स्पोटाची गरजच न पडता अण्वस्त्र तयार करू शकण्याइतका आत्मविश्वास इस्रायली शास्त्रज्ञाप्रमाणेच पाकिस्तानी वैज्ञानिकानीही मिळवला असावा. रीगल-प्रशासनाने पाच वर्षांच्या कालावधीत पाकिस्तानला ३० अब्ज रुपयांची लष्करी आणि आर्थिक मदत देण्याचे अभिवचन दिलेले असताना चाचणी स्फोट करून वॉशिंग्टनची उगाच पंचाईत कशाला करा, असा विचार पाकिस्तानने केला असावा.

अशा प्रकारे भारत, इस्रायल, इराक आणि पाकिस्तान अशी जबरदस्त अण्वस्त्रस्पर्धा आकार घेत आहे. तिच्यामुळे या संपूर्ण भूभागातीलच नव्हे, तर त्याच्याही पलीकडल्या जनतेढुढे न भूतो न भविष्यति असा भयंकर धोका आ वासून उभा राहिला आहे. या भागात इराक आणि पाकिस्तान या दोन्ही इस्लामी राष्ट्रात दडपशाही चालवणारी अस्थिर सरकारे आहेत. दोघेही इस्रायलचे कट्टर शत्रू आहेत आणि विशाल जनसहाराचे कोणतेही अस्त्र याच्या हाती आले तर त्या लहानशा ज्यू-राष्ट्राचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते.

इस्रायलपुरते बोलायचे तर, आपण दमास्कस आणि बगदादवर अणुबॉंब टाकू शकतो या वास्तवावरच त्याची शिस्त आणि भरंवसा आहे. या भागातील अण्वस्त्रधारी असण्याची आपली मक्तेदारी संपुष्टात येण्याचा धोका दिसताच इस्रायल ओसिराकावर केला तसा अवचित अणुबॉंब-हल्ला अरब शत्रूवर करू शकतो. इस्रायलचे समरव्यूहतज्ज्ञ आपल्या देशाच्या अस्तित्वासाठी अरबदेशांचा विध्वंस करण्याचे आणि त्यासाठी अणुबॉंब वापरण्याचे धोरण आखू शकतात.

अरब-इस्रायली युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराकला प्रादेशिक महाशक्ती बनण्याची ओढ लागली आहे. या अतिशय मोक्याच्या आणि सामरिक महत्त्वाच्या भागात अत्यंत सुपीक चन्द्रकोराकृती देशमालिकेत, तेलसमृद्ध अरब देशामध्ये, तो थेट अगदी हिंदमहासागरापर्यंतच्या भूभागात अण्वस्त्रधारी असल्यास, इराक ही एक महाशक्ती म्हणून ओळखली जाऊ शकते. इराणसारख्या आपल्या हाडवैरी देशाला आणि कुवेत आणि परवापर्यंत शत्रूच असलेल्या सौदीअरबस्तानसारख्या देशांना नमविण्याचाही तोच एक मार्ग आहे असे इराकला वाटू लागले आहे. कारण ही आखाती राष्ट्रे इराकऐवजी पाकिस्तानालाच इस्लामी अणुबॉंब बनविण्यासाठी सर्व ती मदत करू लागलेली आहेत. पाकिस्तानला यापूर्वीच अणुशक्तिसंपन्न झालेल्या भारताचे उट्टे काढायचे आहे आणि भारतात महत्त्वाची माणसे अणुबॉंब तयार करण्याचा उघड पुरस्कारच नव्हे तर कैवारही घेऊ लागली आहेत, तसा सल्लाही देऊ लागली आहेत.

ओसिराकवरील बॉंबहल्ल्याने सिद्ध केले आहे की, या अण्वस्त्रस्पर्धेच्या भवितव्याच्या नुसत्या कल्पनेनेच हिंसाचारात भलतीच वाढ झाली आहे. त्याचबरोबर प्रत्येक देशातील अंतर्गत आणि आपापसातील तणावही वाढलेले आहेत. इराक हा सध्या दारूचे कोठारच बनला आहे आणि त्याची सत्ता एका लहानशा गटाच्या हातात केंद्रित झालेली आहे. कुर्दिश बडखोरांना दाबून टाकण्यासाठी हा सत्ताधारी गट शस्त्र आणि दहशतीचा वापर करीत आहे. इराकमध्ये शिया मुसलमानांची बहुसख्या आहे आणि या बहुसख्येचा सत्ताधारी गटाला विरोध वाढतो आहे. या शिया समाजाचे इराणच्या आयातुल्ला खोमेनीशी जवळचे नाते आहे. उद्याच्या युद्धात जर इराकच्या आजच्या सत्ताधाऱ्याचा पराभव होण्याची लक्षणे दिसू लागली, तर ते आपल्या जवळच्या अणुबॉंबचा वापर कसा करतील ? आणि तो बॉंब समजा त्याआधी विरोधी शिया मुसलमानाच्या किंवा सरहद्दीपलीकडील इराणमधील त्याच्या धर्मबांधवाच्या हाती पडला तर काय होईल ?

पाकिस्तानात जनरल मोहंमद झिया उल-हक्क याची राजवट म्हणजे अस्थिर लष्करी हुकुमशाहीचे मूर्तिमंत उदाहरणच आहे. अण्वस्त्रधारी बनण्याचा कार्यक्रम हा देशांतर्गत अत्यंत भावुकपणाचा विषय बनला आहे. झियांना पदच्युत करण्याचा प्रयत्न करणारा कोणताही गट देखील अगदी कावल्यासारखा होऊन इस्लामी बॉंब हस्तगत करण्याची शक्यता आहे. झिया-उल- हक याच्या विरोधकांचे नेतृत्व अणुबॉंब-कल्पनेचे जनक माजी पंतप्रधान भुत्तो याचीच मुलं पत्नी आणि कन्या करीत आहेत हे लक्षात घेतले म्हणजे तर ही शक्यता जास्तच बळावते.

या तिघापैकी फक्त इस्रायलमध्येच यथार्थाने लोकशाही पद्धतीचे आणि स्थिर सरकार आहे; पण या यहुदी राष्ट्राचे अस्तित्वच समाप्त करू इच्छिणाऱ्या अरब शत्रुदेशानी त्याला चारीकडून घेरलेले आहे या भागात कमालीची अस्थिर परिस्थिती त्यातूनच निर्माण होते. इस्रायलला भयकर नरसहाराची चागली आठवण आहे. जर का कधी काळी इस्रायली लोकांना आपले अस्तित्वच आता धोक्यात आले आहे असे वाटले तर तोदेखील असेही मरायचे, तसेही मरायचे असा विचार करून आपल्या ठेवणीतले ते सहारास्त्र वापरण्यास तयार होऊ शकतो.

परिणामी एक नवेच परमाणु-युद्ध उभे राहू शकते. हे युद्ध आजच्या अण्वस्त्रधारी महाशक्ती अमेरिका आणि रशिया यांच्यातील अण्वस्त्रभयाचा जो समतोल आहे, त्याच्यापेक्षाही किती तरी घातक ठरू शकते. सतत बदलत जाणाऱ्या सख्य, मैत्री, धर्माचा अभिनिवेश आणि या भूखडात मुळातच असलेले अस्थैर्य याच्या समस्त बारकाव्यामुळे अमेरिका आणि रशिया यांच्यातील संभाव्य परमाणु–युद्धाबाबत

पाश्चात्य समरव्यूहतज्ज्ञ जे जे तर्क, अनुमाने आणि भाकिते वर्तवीत असतात त्या सर्वांची अतिशय क्रूर अशी थट्टा होऊन बसू शकते. कोणतेही तर्कसंगत निष्कर्ष या भूखडातील अण्वस्त्र–स्पर्धेबाबत काढताच येत नाहीत. दोन्ही महाशक्तींना या भूखडात आपापले स्वार्थ आणि मैत्री–करार जपायचे आहेत. या भागात कोणताही परमाणु–संघर्ष उद्‌भवला तर त्यात या दोन्ही महाशक्ती आपोआपच ओढल्या जाणार आहेत आणि त्यातूनच चुकीने किंवा चुकीच्या हिशोबामुळे अण्वस्त्राचा महाप्रलय निर्माण होऊन त्याचे पर्यवसान अखेरीस तिसऱ्या महायुद्धात होऊ शकते.

अमेरिकेच्या परमाणु–ऊर्जा एजन्सीच्या आतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे संचालक आणि आता पॅरिसमधील अमेरिकी वकिलातीत शास्त्रीय अटॅची असलेले डॉ. अब्राहम फ्रेडमन म्हणाले होते– 'रशिया आणि अमेरिका हे एकाच माळेचे मणी आहेत; पण पश्चिम आशियात सारा प्रकारच वेगळा आहे. तिथे या खेळाचे नियमच नव्याने तयार होत आहेत.

□

# कर्नल गदाफींचा अणुबॉंब

काही वर्षांपूर्वी लढाऊ विमानाचे एखादे स्क्वाड्रन विकत घेणेही आम्हाला मोठे कठीण होते. उद्या आम्ही एखादा अणुबॉम्ब आणि त्याचे सर्व सुटे भाग विकत घेऊ शकणार आहोत. अणुबॉंबची मक्तेदारी आता कोणत्याही क्षणाला संपणार आहे !

—कर्नल मुआम्मर गदाफी
ली पॉइंट, २० जाने. ७५

पाकिस्तानसारख्या दरिद्री देशाजवळ अण्वस्त्रे निर्मिण्यासाठी पैसा कुठून येणार ? पण भुत्तोजवळ या प्रश्नाचे अगदी सरळसोट उत्तर होते. मुलतान येथील ती ऐतिहासिक बैठक संपल्याबरोबर पाकिस्तानचा हा नेता पश्चिम आशियातील इस्लामी देशांच्या राजधान्यांना भेट द्यायला निघाला. आपल्या झंझावाती दौऱ्यात ते तृतीय विश्वाच्या अन्य राजधान्यातही थांबले. चीनलाही गेले आणि तेथे त्यांनी चीनचे राष्ट्रपती माओ–त्से–तुंग यांच्याशीही बोलणी केली.

या दौऱ्यात ते इराण, सौदीअरबस्तान, संयुक्त अरब अमीराती, तुर्कस्थान, सीरिया, मोरोक्को, इजिप्त, अल्जेरिया, ट्युनिशिया, आणि लिबिया येथेही गेले. या सर्व दौऱ्यात जवळजवळ प्रत्येक ठिकाणीच भुत्तो यांनी आपल्या पाश्चात्य दोस्त राष्ट्रांवर, विशेषत: अमेरिका आणि ब्रिटन यांच्यावर घणाघाती टीका केली. वास्तविक हे दोन देश पाकिस्तानला लष्करी साजसामान पुरवणारे सर्वांत मोठे देश आणि पाकिस्तानशी त्यांचे दोस्तसंबंध सर्वांत चांगले; पण भुत्तो यांनी या दौऱ्यात त्यांना विश्वासघातकी म्हटले. या दोस्ताशी संलग्न असलेल्या कित्येक लष्करी प्रादेशिक संघटनांचा पाकिस्तान सभासद होता आणि तरीही पाकिस्तानची दुर्दशा काही हे देश थांबवू शकले नाहीत हीच त्यांची मुख्य तक्रार होती. ब्रिटिश राष्ट्रकुलातून पाकिस्तान बाहेर पडेल असेही त्यांनी सूचित केले.

माजी ब्रिटिश वसाहतीतील अनेक नेत्यांप्रमाणे भुत्तोही ऑक्स्फोर्डमध्ये शिकलेले होते आणि सहाजिकच आता त्यांचा आपल्या त्या 'मातृदेशावर' खूपच राग होता. आईनेच गळा कापलेल्या मुलासारखी वैतागाची भावना त्यांच्या शब्दातूनच तापून व्यक्त होत होती ते पर्याय शोधीत होते आणि तसा पर्याय इस्लामी जगतातच त्यांना दिसू लागला होता.

'बांगलादेशाच्या निर्मितीनंतर पाकिस्तानची सारी ख्याती धुळीस मिळाली होती. आम्ही म्हणजे खुनी, बलात्कारी, नरसंहारक, हरामखोर लोक आहोत असेच लोक मानू लागले होते पाकिस्तानची ही प्रक्रिया पुसून काढण्याचा प्रयत्न भुत्तो करीत होते. ते जगाला सांगू चाहत होते की, मित्रांनो, झाले–गेले विसरून जा. आम्हालाही त्या भूतकाळाच्या जोखडातून मुक्त होण्याची संधी तर द्या ना...!' खलीद हसन आम्हाला सांगत होता.

भुत्तो यांच्या या झंझावाती दौऱ्याचे बाह्य रूप हेच होते. त्यांना आपल्या देशाची आजवरची भूमिका बघायची होती पश्चिमेच्या कच्छपी लागलेला देश हे रूप बदलायचे होते; पण भुत्तोंच्या या दौऱ्याबाबत भरपूर लिखाण करणाऱ्यांनी त्यांच्या दौऱ्याचा आणखी एक वरकरणी न दिसणारा पैलू मात्र लक्षात घेतला नाही. या दौऱ्यात मुलतान–बैठकीत आपल्या शास्त्रज्ञांना भुत्तो यांनी जे आश्वासन दिले होते ते पूर्ण करण्यासाठी जगातल्या पहिल्या इस्लामी अणुबॉंबकरता लागणारा पैसा कुठे मिळेल याचाही भुत्तो शोध घेत होते. त्यामुळेच त्यांची लिबियाचे क्रांतिकारी नेते कर्नल गदाफी यांनी जी भेट घेतली ती आता विचार करता खूपच महत्त्वाची वाटते

ही भेट तशी फक्त दीडच दिवसाची झाली; पण तीतच या दोघा नेत्यांच्या आणि त्यांच्या देशाच्या मैत्रीची सुरुवातही झाली. दुरून बघायला तसे भुत्तो आणि गदाफी यांच्यात कोणतेही साम्य नव्हते. एक अतिशय उच्चभ्रू, काहीसा झकपकीत आणि इहलोकीच्या व्यवहारात खूपच मुरलेला होता त्याचे शिक्षण पाश्चात्य वळणाचे आणि वातावरण सरंजामशाहीचे; परंतु त्याचे विचार मात्र जगाला स्पर्श करणारे होते. दुसरा नेता हा वाळवंटातला माणूस होता. एका भटक्या अरब जमातीतून आलेला रांगडा शिपाईगडी होता. सरळसोट, करड्या नजरेचा, पाश्चात्यांबाबतची घृणा रोमारोमात भिनवून घेतलेला नेता म्हणून त्याची ख्याती होती. हा आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा एक दुर्दम्य जंगली नेता आहे, तसा मायेफिरू आणि महामूर्खच आहे, असा त्याच्याबद्दलचा समज कितीही पसरलेला असला तरी त्याची फिकीर न करता तो वागत असे. या दोघात तसे काय साम्य होते ? गदाफीच्या एका विश्वस्ताने आम्हाला सांगितले होते– 'भुत्तो आणि गदाफी यांची तुलना होऊच कशी शकते ? दोन वेगवेगळ्या ग्रहावरून आलेल्या माणसांची का कधी तुलना करतात ?' हल्ली कायरोमध्ये लिबियन विरोधकांचा नेता असूनही निनावीच राहू इच्छिणाऱ्या आणखी एकाने तर आमच्या या

प्रश्नाची संभावना करताना म्हटले होते, 'भुत्तो आणि गदाफी याची तुलना करणे म्हणजे फ्रेंच राष्ट्रपती जिस्कार्द देएतेंग याची सुदानच्या शेख सैयदशी तुलना करण्यासारखे आहे.'

भुत्तो यानी पाकिस्तान अणुशक्तिमंडळाच्या अध्यक्षपदावरून उचलबांगडी केलेले डॉ. इशरात उस्मानी याना, आम्ही, त्याच्या संयुक्त राष्ट्रातील कचेरीत गाठले तेव्हा तेही जवळजवळ असेच म्हणाले, 'भुत्तो स्वत:चाच बडेजाव मिरविण्यात अग्रणी होते. त्यानी पाकिस्तानात जे काही केले त्यापैकी एकावरही माझा विश्वास नाही.' कडवटपणा व्यक्त करीत उस्मानी पुढे म्हणाले, 'परंतु तरीही भुत्तो याच्या या बडेजाव मिरवण्याच्या हौसेलाही काही मर्यादा होत्या, गदाफीच्या बाबतीत तसे नव्हते.'

हे सर्व उघड उघड दिसणारे फरक आणि तफावती असूनही भुत्तो आणि गदाफी याचा आपसात एक करार झाला हे मात्र निर्विवाद. इस्लामी अणुबॉंब तयार करण्याबाबतचा हा करारच पुढे फार मोठी कामगिरी करणार होता.

पण या दोघा नेत्यात एक विलक्षण साम्यही होते. परस्पर सर्वस्वी भिऊन असले तरी दोघा नेत्याचे व्यक्तिमत्त्व तसे लोभसच होते. दोघेही इस्लामी राष्ट्राचे नेते होते. दोघेही आपल्याला आणि परस्परानाही समाजवादी, राष्ट्रवादी, क्रांतिकारी मानत होते. भुत्तोनी बदनाम झालेल्या लष्करशहाकडून नुकतीच सत्ता हाती घेतली होती आणि पश्चिमेशी असलेल्या दोस्तीच्या जोखडातून ते आपल्या देशाची सुटका करून घेत होते. गदाफीनी नुकतीच अमेरिकनांची आणि ब्रिटिशाची, लिबियातील त्यांच्या लष्करी तळावरून गाशा गुडाळून, त्यांची हकालपट्टी केलेली होती आणि तेल–निर्यात देशाच्या संघटनेवरील पाश्चात्याची मिरासदारी संपुष्टात आणायला ते निघाले होते. सत्ता आणि संपत्ती याचा आपल्या काळातील समतोल नव्या दिशेने वळवण्याची बहुधा ही ऐतिहासिक कामगिरीच होती. शिवाय, या दोन्ही नेत्याच्या उरात स्वत:च्या आणि आपल्या देशाच्या भवितव्याबाबत एक स्वप्न होते. ग्रामीण रांगडे गदाफी आणि शहरी उच्चभ्रू भुत्तो या दोघाच्याही त्या स्वप्नात अणुबॉंब अर्थातच होता.

१९७५ मध्ये गदाफीनी लेबेनिझ वृत्तपत्र 'अन नहार'ला दिलेल्या एका मुलाखतीत म्हटले होते, 'आज लोक या देशाजवळ ५० तर त्या देशाजवळ १०० विमाने आहेत असे म्हणत असतात; पण लवकरच एक वेळ अशी येणार आहे की, लोक म्हणतील, या देशाजवळ तीन अणुबॉंब आहेत तर त्या देशाजवळ दहा आणि अशा देशामध्ये लिबिया नक्कीच असणार आहे हे लक्षात घ्या!' अण्वस्त्रासाठी गदाफी जगभर हिंडत असल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून, विशेषत: पश्चिम युरोपच्या वृत्तपत्रातून नेहमीच इतक्या येत असतात की, आता त्यात कोणतीही नवलाईची गोष्ट राहिलेली नाही.

या संबंधात जेवढे म्हणून लिहिले गेले आहे, त्या सर्वांत विश्वसनीय वृत्तांत आहे इजिप्तचे निमसरकारी वर्तमानपत्र 'अल अहराम' चे माजी संपादक मोहंमद हैकल याचा. हैकल गदाफीचे दाट मित्र होते. त्याना गदाफी आवडतही असत. १९७६ मध्ये त्यांनी लिहिलेल्या 'द रोड टु रामादान' या पुस्तकात हैकल यांनी ही सारी कहाणी सविस्तरपणे लिहिली आहे. गदाफी आणि गमाल नासार यांच्या पहिल्या भेटीतच गदाफी यानी अणुबॉंबचा विषय कसा काढला याबद्दल हैकलने लिहिले आहे: नासर हे लहानपणापासूनच गदाफीचे आदर्श वीरपुरुष होते. त्यानी नासर यांना कळकळीची विनंती केली की, 'इस्रायलचा संपूर्ण नायनाट करण्यासाठी आपण दोघे हातात हात घालून काम करू या!' नासर म्हणाले– 'आंतरराष्ट्रीय परिस्थिती आपल्याला तसे करू देणार नाही. अणु–युद्ध सुरू होईल अशी कोणतीही परिस्थिती अमेरिका किंवा रशिया, कोणीही निर्माण होऊ देणार नाहीत.'

'इस्रायलजवळ अणुबॉंब आहे का?' गदाफीनी विचारले

'मला वाटते होय आहे.' नासर म्हणाले.

'आपल्याजवळ आहे?'

'अर्थातच नाही.' ही गोष्ट ११६८ ची आहे नासरना वाटले हा मुद्दा येथेच संपेल; पण २–३ महिन्यानी गदाफीनी आपला विश्वासू सहकारी आणि मित्र मेजर अब्दुल सलाम जालोद याना अचानक भेटीसाठी इजिप्तला पाठवले. आपली भेट गुप्त रहावी असे जालोदने म्हटले होते. आपण फक्त राष्ट्रपती नासरना भेटायला आलो आहोत असे त्याने कळवले.

## आंतरराष्ट्रीय परिस्थिती आपल्याला तसे करू देणार नाही. अणु-युद्ध सुरू होईल

'कशाबद्दल?' नासरनी विचारले.

जालोदने अगदी साधे सरळ उत्तर दिले, 'आम्ही एक अणुबॉंब विकत घेणार आहोत.' जालोदला चांगले माहीत होते अमेरिका किंवा रशिया कोणीही अणुबॉंब विकणार नाहीत; पण चीनकडे चौकशी केल्यास कसे? कदाचित चीन लिबियाला एखादा अणुबॉंब विकू शकेल. नासरना मात्र याबद्दल शंकाच होती. अणुबॉंब ही काही विकायची वस्तू नव्हे हे ते जाणत होते.

हैकलने लिहिले आहे की, यावर जालोद म्हणाले– 'आम्हाला काही अजस्र अणुबॉंब नकोय, फक्त व्यूहाखातर एखादा मिळाल्यास हवा आहे. आम्ही चीनशी संपर्क साधलाही आहे आणि चीनला भेट द्यायला आमच्यापैकी कुणी तरी येऊ इच्छितो असे कळवले आहे. त्यावर चीनने उत्तर दिले की, या, तुमचे स्वागतच करू आणि म्हणून मी चीनला जातोय.'

हैकल म्हणतात, चीनला दिलेली ही भेट अत्यंत गुप्त राखण्यात आली. जालोद नाव बदलून इजिप्तच्या पासपोर्टवर चीनला गेले. जाताना ते पाकिस्तान आणि भारतमार्गे गेले. जालोद नेमके कशासाठी आले आहेत ते चिन्याना अजूनही ठाऊक नव्हते; पण जालोदनेच ते त्याना सांगितले.

जालोद म्हणाले– चीन समस्त आशियाई देशाचा मानबिंदू आहे. मागास देशांना तुमच्याकडून खूपच मदत मिळालेली आहे. तुम्ही जगाला दाखवून दिले आहे की, तुम्ही पश्चिमेच्या तोडीचे आहात.

म्हणून आम्ही लिबियावाले तुमच्याकडे मदत मागायला आलो आहोत. अर्थातच तुमच्यावर बोजा टाकायची आमची इच्छा नाही. कारण आम्हाला जे हवे आहे ते फार खर्चाचे आहे हे आम्ही जाणतो; पण आम्ही ते विकत घेऊ चाहतो– अणुबाँब !'

या सवादाच्या वेळी हैकल स्वत. पेकिंगमध्ये नव्हते आणि बहुधा जालोद याच्याकडूनच किंवा नतर नासर याच्याकडनच त्याना ही माहिती मिळाली असली पाहिजे. म्हणूनच त्यानी फक्त एवढेच लिहिले की,चीनचे पंतप्रधान चौ–एन–लाय यानी या सूचनेला चीनच्या अत्यत शालीन शिष्टाचाराने सौजन्यपूर्ण प्रतिसाद दिला. नासर याच्याप्रमाणेच, चौ म्हणाले, सामान्यत: अणुबाँब विकायचे नसतात. तेव्हा आम्हाला याबाबत जास्तीत जास्त काही करता येणे शक्य आहे ते एवढेच की, लिबियावासियांना आपल्या अणुसशोधनकार्यात शक्य ती मदत देणे. त्यातून अण्वस्त्राचा विकास करायचा असेल तर तो लिबियाने स्वत:च केला पाहिजे.

पण जालोद हिंमत हरले नाहीत. ते ऑगस्ट १९७० मध्ये पुन्हा चीनला गेले. आता त्यांनी सामान्य परमाणु आणि प्रक्षेपणतंत्रज्ञानाची मागणी केली; पण चीनने त्यांची ही दुसरी विनंतीही फेटाळली. सत्तेवर आल्याच्या अगदी पहिल्याच दिवसापासून कर्नल गदाफी अण्वस्त्रे मिळवण्याच्या खटपटीना कसे लागले होते याची सारी इत्थभूत कहाणी भयचकित हैकल यानी आपल्या पुस्तकात लिहिली मागितली. कालांतराने पाकिस्तानला अण्वस्त्रधारी बनविण्याच्या मार्गावर अग्रेसर होण्यास सढळपणे मदत करणाऱ्या फ्रान्सच्या या मडळाने लिबियाला मात्र धुडकावून लावले. त्या मंडळाचे अधिकृत प्रवक्ते एलेन वारनू यानी आम्हाला सागितले की, 'अण्वस्त्राचा प्रसार होण्याचा धोका लिबियाच्या मागणीतून स्पष्टच दिसत असल्यानेच फ्रान्सने ती फेटाळली. कारण सुसंस्कृत आणि उच्चभ्रू भुत्तो व त्याचे कार्यक्षम पथक कुठे आणि कसेही करून अणुबाँब मिळवायची दुर्दम्य परंतु उघड आकाक्षा घेऊन निघालेला हा वाळवंटातला रागडा कुठे ?'

तसे पाहिले तर लिबिया मागत होता ते 'इलेक्ट्रो–मॅग्नेटिक परिष्करण तंत्र' एव्हाना जुनाट झालेले होते. अमेरिकनांनी दुसऱ्या महायुद्धात मानहाटन परियोजनेत तेच तंत्र वापरले; पण लगेचच त्यांनी त्याचा परित्याग केला. तेव्हा फ्रान्सने लिबियाला ते तंत्रज्ञान समजा दिलेही असते तरी त्यातून प्रत्यक्षात अणुबाँबसाठी लागणाऱ्या प्रतीचे परिष्कृत युरेनियम तयार करण्यासाठी लिबियाला प्रदीर्घ आणि कठीण काळ काढावा लागला असता. लिबियाला हे तंत्रज्ञानच का हवे होते ते आजही स्पष्ट झालेले नाही; पण ते अडाणी होते, अणुतंत्रविज्ञान फ्रान्ससारख्या देशाकडून कसे प्राप्त करायचे हे तर त्याना कळत नव्हतेच; पण आपल्याला नेमके काय मिळवायला हवे आहे याचेही त्याना ज्ञान नव्हते, ही गोष्ट मात्र यातून स्पष्ट झाली.

## अशी कोणतीही परिस्थिती अमेरिका किंवा रशिया निर्माण करणार नाही.

आहे. ते म्हणतात, 'आधुनिक जगात असले व्यवहार कसे केले जात असतात याबाबत घोर अडाणी असलेले कर्नल गदाफी ही खटपट करीत होते; परतु ते आपल्या अडाणीपणाचेच अरब विश्वातल्या इतर दोस्ताना मार्ग दाखवीत होते. त्याच्यासारखा रागडा अडाणीपणा त्याच्या दोस्ताच्या ठायी नसल्यामुळे ते कदाचित यात यशस्वी होतील अशी गदाफीची समजूत होती. अरब–इस्रायल युद्धाच्या काळात ही गोष्ट अगदी स्पष्टही होऊन गेली. हैकल यानी त्या वेळी स्वत च 'अल अहराम 'मध्ये लिहिले की, 'इस्रायलच्या अण्वस्त्रागाराला जरब बसविण्यासाठी अरबविश्वाने अण्वस्त्रधारी झालेच पाहिजे, मग ती अस्त्रे त्यांनी कशीही मिळवावीत– विकत घ्यावीत, स्वत: निर्माण करावीत नाही तर उसनी घ्यावीत !'

नासरजवळ अणुबाँब नव्हता. चीनने दोनदा केलेल्या मागण्या फेटाळल्या होत्या. तरीही लिबिया निराश झाला नाही. त्याने आपले प्रयत्न चालूच ठेवले. आता तो फ्रान्सकडे वळला. शस्त्रे आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणनिर्माते थॉम्सन–सी. एस. एफ. या कंपनीशीही त्याने संपर्क जोडला. लिबियाचे अणुशक्तिमडळाचे अध्यक्ष टुर्की या वाटाघाटी चालवीत होते. ते मुळात ट्युनिशियाचे. प्रत्यक्षात अणुबाँब मिळत नसला तरी आता ते तो निर्मिण्याचे तंत्रज्ञान मिळवण्याच्या खटपटीत होते.

लिबियाला हवी होती वीस इलेक्ट्रो–मॅग्नेटिक युनिट्स. त्याच्या मदतीने परिष्कृत युरेनियम निर्माण करण्याचा त्याचा बेत होता. थॉम्सन कंपनीने यासाठी फ्रेंच परमाणु शक्ती मंडळाची परवानगी

तरीही लिबियाचे प्रयत्न थकले नाहीत. परमाणुक्षेत्रातील विविध तत्रे आणि तत्रज्ञ विकत घेण्यासाठी मेजर जालोद कॅनडा, पश्चिम जर्मनी, इटाली, अमेरिका व पुन्हा एकदा फ्रान्स या देशाना भेट देऊन आले. प्रत्येक ठिकाणी त्यांना नन्नाचाच पाढा ऐकायला मिळाला. १९७८ अखेरीस जालोद नवी दिल्लीलाही पोहोचले. भारताकडून त्यानी परमाणु–तंत्रविज्ञान मिळवण्यासाठी आकर्षक किंमत आणि स्वस्त दराने खनिज तेल देऊ केले. भारतानेही नकार दिला. परिणामी लिबियाने भारताला पाठवावयाच्या खनिजतेलाची निर्यात बंदच करून टाकली. याबाबतच्या बातम्या येतच आहेत; पण लिबियाने तरीही आपला प्रयत्न सोडला नाही. अखेरीस त्याला रशियाकडून त्या मानाने निरुपद्रवी सशोधन–भट्टी आणि संलग्न प्रयोगशाळा मिळवण्यात यश आले.

पण त्यातही रशियाने त्याच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे आग्रह धरला की, वापरलेले इंधन रशियाला परत केले पाहिजे आणि लिबियाने अण्वस्त्रप्रसाराला आळा घालणाऱ्या करारावर सही केली पाहिजे. या करारात आपण अण्वस्त्रप्राप्तीच्या भानगडीत पडणार नाही अशी हमी द्यायची असते. लिबियाने या करारावर १९७५ मध्ये सही केली; पण त्यावर सरकारी शिक्कामोर्तब मात्र १९८१ मध्ये केले. परमाणुतंत्रविज्ञान खुल्या किंवा काळ्या बाजारात मिळवण्याच्या कामी कर्नल गदाफीना यश आले नाही हेच त्यानी या करारावर सही केली त्यावरून दिसून आले

मोहमद हैकल आणि इतराचे म्हणणे तसे आहे की, कर्नल

गदाफींना अणुबाँब खूप हवा असला तरी कोणीही त्यांना त्याच्या वाऱ्यालाही फटकू दिले नाही. अपवाद फक्त एकच आणि तो म्हणजे भुत्तो याचा. १९७२ मध्ये भुत्तो त्रिपोलीला भेट देऊन गेल्यानतर काही महिन्यांच्या आतच कर्नल गदाफींनी पाकिस्तानच्या परमाणु-कार्यक्रमाशी नाते जोडणारा करार केला. या करारान्वये लिबिया काही काळापुरता तरी पाकिस्तानी कार्यक्रमाचा सर्वांत मोठा सावकार बनला.

पण लिबिया आणि पाकिस्तानचे हे सख्य किती आहे, कसे आहे, बाँबसाठी किती सहयोग आहे, सहकार आहे हे आम्हाला शोधायचे होते. हे आव्हान फार जबर होते. अफवा, कंड्या, पेरलेल्या बातम्या याची मुळीच ददात नव्हती; परतु १९८० च्या सुरुवाती-सुरुवातीपर्यंत तरी याबाबत कुणाजवळही भरीव असा एकही पुरावा नव्हता. अमेरिकन राष्ट्रपती जिमी कार्टर याचे अण्वस्त्र-प्रसार प्रतिबंध विभागाचे माजी प्रमुख डॉ. जोसेफ एस. नाये, ज्युनियर यांच्यासकट काही जास्त जबाबदार लोकांनी आम्हाला सांगितले की, इस्लामी अणुबाँबनिर्मितीत कर्नल गदाफी यांचा हात असेल याबद्दल आम्हाला शंकाच आहे.

आमचा शोध सुरूच होता. पाकिस्तानातल्या ज्या लोकाना या सर्व प्रकरणाची चांगली माहिती होती त्याच्यापैकीही बऱ्याच लोकांशी आम्ही बोललो. अर्थातच लिबिया पैसा पुरवतो आहे एवढेच ते म्हणत; पण यापलीकडे सागण्यासारखे भक्कम असे कुणाजवळही काही निघतच नव्हते. ही सर्व नुसती पतंगबाजी आहे आणि कुणालाही प्रत्यक्ष अशी काडीचीही माहिती नाही असेच आमचे मत बनत चालले होते. आम्ही आशा सोडून देण्याच्या बेतात आलो होतो. तोच अचानकपणे आमच्या एका पाकिस्तानी सूत्राने त्याच्या एका माजी सहकाऱ्याला भेटा, कदाचित तो तुम्हाला काही सांगू शकेल, असे सुचवले. तो माणूस जगाच्या एका दूरच्या कोपऱ्यात रहात होता. आम्ही तिथे पोहोचलो आणि एका स्थानिक हॉटेलात त्याच्याशी भेट पक्की केली हे हॉटेल वॉशिंग्टन, पॅरिस किंवा कराची कुठेही सापडेल अशाच हुबेहुब नमुन्याचे होते. त्याचे नाव 'हॉटेल इन्टरप्लास्टिक'. जास्त फोड करून सागणे आम्हाला शक्य नाही. कारण उघड आहे.

इतका हादरलेला माणूस आम्ही क्वचितच पाहिला असेल!

'बारमध्ये बसू या का?' सार्वजनिक ठिकाणी बसून बोलणे कदाचित त्याला जास्त आवडेल या कल्पनेने आम्ही विचारले.

'नको.' तो म्हणाला, 'आपण एखाद्या खाजगी निवात जागेत जाऊ या. तुमचीच खोली चालेल, कसे?'

त्याचे नाव-गाव-ठाव दूरान्वयानेदेखील ध्वनित करू नका अशी त्याने आम्हाला अटच घातली. 'माझ्या देशातली माणसे जनावरासारखे वागू शकतात. तुम्हाला हुडकून काढण्याचे अनेक मार्ग त्याच्यापाशी आहेत. त्यांची इच्छा असेल तर ते तुम्हाला वाटेल ती अद्दल घडवू शकतात.' तो घाबरलेला होता हे उघडच दिसत होते; पण तरीही कित्येक वर्षे स्वतःपाशीच गुपित म्हणून जतन केलेल्या माहितीचा बोजा एकदा मन मोकळे करून हलका करण्याचीही त्याची इच्छा होती. ती कहाणी याच्या आधी त्याने कुणालाही सांगितलेली नव्हती. अगदी आमच्या त्या समान मित्रालादेखील नाही. त्या भयस्वप्नाचे परिणाम त्याचा तोच एकटा भोगीत होता. आपणच अपराधी आहोत याची जाणीव त्याला खात होती. विश्वसंहाराच्या महापापात तो सहभागी झाला होता असे आता त्याला वाटत होते.

आम्ही त्याला पाकिस्तानच्या परमाणु-कार्यक्रमाबद्दल आणि त्याच्याशी लीबियाच्या असलेल्या संभाव्य संबंधाबाबत विचारत होतो. आधी तो मोघम आणि टाळाटाळीची उत्तरे देत होता. तरीही आपले मन हलके करण्याची त्याला इच्छा होतीच. एक तास असा मांजरा-उदराचा खेळ चालल्यानंतर तोच आमच्याकडे वळला. सरळ आमच्या नजरेला नजर देत म्हणाला-

'तुम्हा पत्रकारांना किती कमी माहिती असते, याचेच मला आश्चर्य वाटते. खरे पाहिले तर तुम्हा सर्वच पत्रकाराना काहीच माहीत नाही.'

'जरा स्पष्ट बोला ना, आम्हाला काय माहीत असायला हवे असे तुम्हाला म्हणायचय?'

'हे काय विचारणे झाले? अरे, इतक्या जागतिक गुप्तचर संघटना, इतके तुम्ही सारे पत्रकार, वर्षानुवर्षे या कार्यक्रमाच्या मागावर आहात आणि तरीही तुम्हाला त्यातले काहीही कळू नये, फक्त अंधुकशी बाह्यरेखाच तेवढी दिसावी? त्यानेच आम्हाला उलट प्रश्न केला; पण त्याच्या स्वरात उद्धटपणा मात्र अजिबात नव्हता

'असेच जर होते, तर मग तुम्हीच का नाही एखाद्या पाश्चात्य माध्यमाशी बोललात आतापर्यंत?' आम्ही प्रतिप्रश्न विचारला. 'त्याना सांगण्यासारखे तुमच्याजवळ काही तरी आहे. तुम्ही सागायला तयार झालात तर ते तुमचे मोठ्या आनदाने स्वागत करतील.'

'मला आता शातपणे गायचे आहे मला कोणत्याही गुप्तचर माध्यमाच्या भानगडीत पडायचेच नाही आहे.' तो म्हणाला.

आमची मुलाखत त्यानंतर चांगली दोन तास चालली; पण त्याने आम्हाला जे काही सांगितले, त्यापेक्षाही अनुत्तरित असेच पुष्कळ राहिले. आमच्या गप्पा-गोष्टींचा कळस झाला, आम्ही त्याला लिबियाचा या प्रकरणाशी नेमका काय आणि किती संबंध आहे ते विचारले तेव्हा.

'अर्थातच लिबिया यात सहभागी आहेच.' तो म्हणाला. आता त्याच्या कपाळावर घाम डवरून आला होता.

'हे तुम्ही कशावरून म्हणता?' आम्ही विचारले.

'मला ते माहीत आहे.' तो म्हणाला आणि त्याने आम्हाला ती हकीकत सांगितली.

या पाकिस्तान्याला आपण इथून पुढे 'क' म्हणू या. तर या श्रीयुत 'क' याने आम्हाला सांगितलेली कहाणी तशी अगदी सरळ साधी होती; पण ती त्याच्या प्रत्यक्ष माहितीवर आधारलेली होती. ती ऐकल्यावर आम्ही या माणसाचा इतिहास आणि त्याची विश्वसनीयता इतर सूत्राकडून पडताळून घेतली आहे. त्याच्या माहितीतील महत्वाचा भाग बरोबर असल्याची आम्ही खात्री करून घेतली आहे त्याने सांगितलेल्या हकिगतीचा काही भाग आम्हीच मुद्दाम राखून ठेवला आहे. कारण तो भाग असा आहे की, त्यातून हा 'क' कोण आहे ते उघड होण्याची शक्यता आहे.

श्रीयुत 'क' ने सागितले ते असे की, भुत्तो लिबियाला भेट देऊन गेल्यानतर दोन्ही देशाच्या संबंधित अधिकाऱ्याच्या अनेक बैठकी

झाल्या सोयीखातर या बैठकी पॅरिसमध्ये होत असत त्यातल्या बऱ्याच बैठकी १९७६ मध्ये झाल्या आणि त्याना या दोन देशाचे सरकारी प्रतिनिधी हजर होते. त्याच्याबरोबरच सौदीअरबस्तान आणि आखाती देशाचे प्रतिनिधी आणि बहुधा इराणही या बैठकांमध्ये भाग घेत असे. चालू परमाणु-कार्यक्रमाचे तात्रिक आणि आर्थिक सहकार्य कसे करावे याचाच या बैठकात खल होत असे.

तो काळ असा होता की, इस्लामी आणि तृतीय विश्वातील इतर नेत्याना ज्या ज्या म्हणून गोष्टींचे आकर्षण वाटत होते त्या त्या सर्व गोष्टी-लढाऊ विमाने, रणगाडे, हेलीकॉप्टर्स-अव्वावधी फ्रँक किंमतीच्या सौद्याने विकायला फ्रान्स तयार होता. त्याही दृष्टीने पॅरिसमध्ये अशा बैठकी जास्त सोयीच्या होत्या फ्रान्सच्या मिराज जेट लढाऊ विमानाची ख्याती खूपच पसरली होती. विपरीत योगायोग असा की, १९६७ च्या सहा दिवसाच्या अरब-इस्रायली युद्धात इस्रायलच्या पदरी असलेल्या मिराज विमानानी अरब-विश्वात जो हाहा.कार उडवून दिला होता त्यामुळे त्याची ख्याती अरब जगतातही पसरली होती. त्या युद्धाने लढाऊ सामग्रीच्या बाबतीत फ्रान्स आणि अमेरिका यांच्यात चुरस लावून दिली होती. इस्रायली मिराज विमानानी हाणून पाडलेल्या प्रत्येक रशियन मिग विमानाचे फ्रान्स यथेच्छ भांडवल करून घेत होता. परिणाम असा झाला की, लिबिया आणि पाकिस्तान दोघानीही फ्रान्समध्ये लष्करी खरेदी करण्यासाठी खेपा सुरू केल्या.

या सर्व बैठका इतक्या गोपनीय असत की, लिबिया आणि पाकिस्तानच्या पॅरिसमधल्या वकिलातीतील बहुतेक कूटनीतिज्ञानाही त्याबाबत अंधारात ठेवण्यात येत असे. पाकिस्तानात लष्करी सामान खरीदण्यासाठी आलेल्या प्रतिनिधीनाही याची काहीही माहिती नसे. अशा बैठका होत आहेत याची माहिती ज्या पाकिस्तान्याना आहे अशाची एकूण संख्या दहाच्या घरातही जात नसे.

पाकिस्तानी प्रतिनिधी सरळ भुत्तो याच्याच आदेशाबरहुकूम काम करीत असत. त्यांच्या खालोखाल मुनीर अहमद खान याचा अधिकार चालत असे. त्यांना डॉ. उस्मानी याच्या जागी पाकिस्तानी अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष नेमण्यात आलेले होते.त्या वेळी पाकिस्तानचे फ्रान्स मधील राजदूत याकूब अली खान हे होते. पुढे त्याची बदली मॉस्कोला करण्यात आली. या याकूब अली खान यानी आणि त्याच्या जागी पॅरिसमध्ये आलेल्या महमूद शिकफात यानीही या बैठकामध्ये खूपच पुढाकार घेतला होता.

श्रीयुत ' क ' यानी सांगितले की, या बैठकातून लिबियाने या कार्यक्रमासाठी किती मदत द्यायची ते ठरत होते. त्याचप्रमाणे या मदतीच्या मोबदल्यात लिबियाला काय मिळेल तेही निश्चित होत होते. कर्नल गदाफी याना अर्थातच त्याच्या पैशाने पाकिस्तान मिळवणार असलेल्या सर्व परमाणु-तंत्रविज्ञानाची दारे स्वत:साठीही खुली असायला हवी होती. ' उष्ण दालन ' प्रक्रियेत पाकिस्तानने

## ' किती पैसा देऊ केला ? '-' प्रचंड रक्कम – चांगले ५० कोटी डॉलर्स ! ' ' क ' म्हणाले.

विश्वाची सतत भ्रमती करीत असलेले लिबियाचे मेजर जालौद नंतर त्या देशाचे पंतप्रधान झाले आणि ते त्रिपोली ते पॅरिस अशा खेपा फ्रान्सकडून लष्करी सामग्री विकत घेण्यासाठी सारख्या करू लागले. लिबियाच्या विमानदलासाठी त्याना फ्रान्सकडून कित्येक डझन मिराज विमाने घ्यावयाची होती आणि १९७४ च्या सुरुवातीस कर्नल गदाफी जातीने पॅरिसला सरकारी भेट देणार होते, त्या भेटीची तयारीही करायची होती

पाकिस्तानचे भुत्तोही फ्रान्सकडून भरपूर सामग्री घेत होते. त्यांना पाकिस्तान यापुढे ब्रिटिशांवर अवलंबून राहायला नको होता आणि लष्करी सामग्रीसाठी सर्वस्वी अमेरिकेवर विसंबून रहाणे नको असा त्यांचा निर्धार झाला होता २५ जुलै १९७३ रोजी भुत्तोनी पॅरिसला भेट दिली त्या वेळी राष्ट्रपती जॉर्ज पॉम्पीदू यांनी त्याचे एलीसी प्रासादात स्वागत केले. तोवर पाकिस्तानच्या लष्कराने पॅरिसमध्ये आपली ' नील-स्रोत ' खरेदीची कामगिरी केलेली होती आणि पाकिस्तानच्या अत्यंत निष्णात् विमानदलात फ्रेंच मिराज विमानाची योजना करणे चालू होते.

या खेपामुळे सहाजिकच पॅरिस हे या मंडळीच्या भेटीचे केंद्र बनले. हा उद्योग फ्रान्सच्या पहिल्या प्रतीच्या मानल्या जाणाऱ्या गुप्तचर सेवेच्या देखत चालू होते. या सेवेचे नाव डी. एस. टी. (डायरेक्शन-द-ला सर्व्हेलन्स दु टेरिटरी ) ही संस्था टेहळणी करीत असतानाच लिबिया आणि पाकिस्तान याच्या सरकारी प्रतिनिधीची पहिली परमाणु-बैठक झाली.

लिबियाच्या शास्त्रज्ञाना प्रशिक्षित करावे अशी विनंतीही गदाफीनी भुत्तोंना केली होती याच प्रक्रियेने लिबियाला भट्टीत वापरलेल्या इंधनावर पुन्हा प्रक्रिया करून स्वत:ची अण्वस्त्रे तयार करण्यासाठी लागणारे प्लुटोनियम त्यातून काढायचे होते. याबरोबरच न्युट्रॉनिक्स आणि परमाणु कचरा कसा हाताळायचा याबाबतही गदाफीना पाकिस्तानची मदत हवी होती.

' क ' यानी सांगितले की, याखेरीज अण्वस्त्रनिर्मितीच्या संपूर्ण क्षमतेचीही सर्व ठिकाणे आपल्यासाठी खुली हवीत अशीही गदाफीची इच्छा होती अशा सर्व हमी मागण्यात गदाफीचा रास्त हेतू हा होता की, याच मुद्द्यावरून पुढे आपसात तणाव किंवा घर्षण निर्माण होण्याची शक्यता आहे, ती राहू नये. गदाफीना अशी शंकाही येऊ लागली होती-आणि ती नंतर खरी असल्याचेही दिसून आले-की, पाकिस्तान आपल्याला नुसत्या भूलथापा देऊन झुलवतो आहे आणि प्रत्यक्षात जे काही आपल्याला देण्यास तो बांधला आहे ते देण्यासही अळमटळम करतो आहे

या बैठकाना उपस्थित असणाऱ्या इतर देशानीही-विशेषत: सौदी अरबस्तान आणि आखाती देशानी या कामासाठी पैसा देऊ केला, असे ' क यानी सांगितले, तेव्हा आम्ही सहाजिकच विचारले-' किती पैसा देऊ केला ? '

' प्रचंड रक्कम ' चांगली ५० कोटी डॉलर्स ! ' पण तो आकडा ऐकताच लष्करातील पाकिस्तान्याना-काहीही झाले तरी ते अरबाचे भावसभाऊच-वाटू लागले की, अखेरीस हा आकडा आणखी मोठा

होऊ शकतो, अगदी अब्जावधी डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो. पण . . .
'क' लगबगीने म्हणाला, 'तेवढ्या रकमेची प्रत्यक्षात गरजही नव्हती आणि ती देण्यातही आली नाही.'

पण ही झाली पाकिस्तानी दृष्टिकोनातून अरबांची बाजू. लिबियाला याबाबत काय वाटत होते ? ते पाहून काढण्यासाठी आम्ही एके काळी गदाफीच्या क्रांतिकारी साथींकडे आणि त्यातल्याही जे लोक आता गदाफीच्या विरोधात उभे राहिल होते त्यांच्याकडे वळलो. आम्ही दोघांना गाठले. एक होते ओमार एल–मेहैशी आणि दुसरे होते अब्दुल मोनहम एल–हुनी. एल–मेहैशी गदाफीच्या क्रांतिकारी आधिपत्य परिषदेचा माजी सभासद आणि नोव्हेंबर १९७४ मध्ये विज्ञान आणि तंत्रशास्त्र खात्याचा मंत्री होता. रशियाशी लिबियाच्या परमाणु-तंत्रविज्ञानाबाबत ज्या वाटाघाटी झाल्या त्या एल मेहैशीनेच केलेल्या होत्या आणि संभवतः पाकिस्तानशी झालेल्या वाटाघाटीतही तो असावा असा आमचा कयास होता. एल–हुनी हा लिबियाच्या हेरखात्याचा माजी प्रमुख, गृहमंत्री आणि परराष्ट्रमंत्रीही राहिलेला. तो आणि त्याचे निकटचे सहकारी हल्ली इजिप्तमध्ये आहेत असे आम्हाला समजले.

आमच्यासमोर एक अडचण होती. कर्नल गदाफी आपल्या विरोधकांचे शिरकाण करण्याकरता घडक पथके पाठवीत होते. खुद्द ओमार एल–मेहैशीवरही असा हल्ला नुकताच झाला होता. त्यामुळे विरोधकांची सर्व चळवळच थंडावली होती. त्यांचा कोणताही नेता अरबांच्या आणि इस्लामी देशांच्या अणुबाँबबद्दल तोंड उघडायला अर्थातच तयार नव्हता.




तरीही आम्ही इजिप्तमध्ये एल–हुनीच्या गोटांशी संपर्क जोडण्यात यशस्वी झालो आणि कायरोमध्ये त्यांच्या एका अत्यंत ज्येष्ठ सहकाऱ्याशी मनमोकळे असे आम्हाला बोलता आले. त्यांचे ते बोलणे प्रसिद्धीसाठी वापरायचे नाही असा शब्द आम्ही त्यांनी दिला. श्रीयुत 'क' यांनी आम्हाला जे काही सांगितले ते खरे असल्याची ग्वाही या महाशयांनीही दिली की, पाकिस्तानच्या परमाणु-कार्यक्रमासाठी लागणारा पैसा पुरविण्याचे लिबियाने मान्य केले; परंतु यासंबंधात सध्याचे विरोधी नेते एल-मेहैशी किंवा एल–हुनी यांनी कोणतीही कामगिरी बजावली नाही असे त्यांनी निक्षून सांगितले.

या महाशयांनी मेजर जालौदवरही कडवट हल्ला चढविला. ते म्हणाले, 'गदाफींनी पाकिस्तानला मदत करण्यासाठी अमाप पैसा ओतला; परंतु लिबियाच्या जनतेला त्यातले काहीही कळू दिले नाही. गदाफींच्या मंत्रिमंडळालाही याची गंधवार्ताही नव्हती; पण त्या जालौदला होती. हा जालौद म्हणजे गदाफीचा टॉवेलच की. (अरबांमध्ये बाथरूममध्येच हात पुसायला टॉवेलही ठेवण्याची प्रथा आहे.) टॉवेलशिवाय बाथरूम नाही, तसेच गदाफी या बाथरूमचा जालौद हा टॉवेल आहे, हात पुसून पुसून घाणेरडा झालेला. गदाफी म्हणेल ते ते हा डोळे मिटून करेल. अर्थातच त्यात गदाफींची अण्वस्त्रांची भूकही आलीच याची या गृहस्थांनी आम्हाला खात्री दिली.

या बैठकीनंतर फेब्रुवारी १९७४ मध्ये पाकिस्तान आणि लिबिया यांच्यात रीतसर करार झाला. गदाफी आणि भुत्तो यांनी सही-समारंभानंतर हस्तांदोलन केले. तो काळ लक्षात घेण्यासारखा आहे. या कराराच्या काही महिनेच आधी इस्रायलशी झालेल्या ऑक्टोबर-युद्धात अरबांनी आपल्या नवीन सामर्थ्याची चुणूक दाखवली होती. अरब तेल–उत्पादक देशांनी पाश्चात्य राष्ट्रांवर तेल–बहिष्कार घातला होता. तथाकथित तेलास्त्राचा हा पहिला खराखुरा प्रयोग होता. गदाफींच्या नेतृत्वाखाली अरब तेलनिर्यातक देशांचा खजिना कल्पनेबाहेर फुगत चालला होता. अशा या उन्माद निर्माण करणाऱ्या वातावरणातच लाहोर येथे ३७ इस्लामी राष्ट्रप्रमुखांची शिखर परिषद बोलावण्यात आली होती. भुत्तो या परिषदेचे अध्यक्ष होते. सुवेझ कालव्याचा पश्चिमतट, गाझापट्टी आणि यरुसलेमचे पवित्र शहर यावर इस्रायलने चालूच ठेवलेला कब्जा हा या परिषदेचा वरकरणी उद्देश होता; पण वास्तविक या परिषदेचा अंतस्थ हेतू काय होता, ते भुत्तो यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी लावलेला सूर स्पष्टच सांगत होता.

भुत्तो यांच्या बरोबरीचे लोक त्यांना इस्लामी सत्ताधाऱ्यांमध्ये सर्वात जास्त तल्लख बुद्धीचा नेता मानीत होते. या भाषणाद्वारे भुत्तो यांनी जणू एका नव्या अत्यंत सामर्थ्यशाली गटाच्या नेतृत्वावर आपला दावाच मांडला असे या लोकांना वाटत होते. हा नवा सामर्थ्यशाली गट होता तेलसमृद्ध अरबदेशांचा. त्यांच्या त्या मानाने कमी भाग्यशाली इस्लामिक आणि तृतीय विश्वातील बांधवांचा. म्हणून भुत्तोंनी आपल्या भाषणात सुरुवातीचा मुद्दा फिलिस्तानी कार्याचा घेतला आणि लष्करवादाने माथेफिरू बनलेल्या व तंत्रविज्ञानाने बेफाम झालेल्या यहुदी लोकांविरुद्ध सातत्याने लढा देण्याचा संकल्प जाहीर केला.

भुत्तो आपल्या त्या भाषणात म्हणाले– 'पश्चिमी जगताच्या सहानुभूतीमुळे इस्रायल शेफारून गेला आहे. हिंसाचारावर पोसलेल्या या देशाने आता आपला विस्तार करण्यासाठी आक्रमणाचा मार्ग पत्करला आहे; परंतु *आता नव्या तेलास्त्रामुळे सारा शक्तिसमतोलच* बदलतो आहे. इतिहासाला आता नवे वळणच या तेलास्त्रामुळे लागणार आहे. अरब-विश्व, इस्लामी दुनिया, तृतीय जगत पहिल्यादाच स्वत:च्या आर्थिक विकासासाठी लागणारा पैसा आपसातच उभा करू शकणार आहेत. गरज आहे ती फक्त एकच की, तेलामुळे नवसमृद्ध झालेल्यानी तेवढी श्रीमंती नसलेल्याबरोबर सहकार्याने आपले सामर्थ्य एकटवले पाहिजे...

'जवळजवळ ५०० वर्षांच्या ऱ्हासानंतर आता आपण पुन्हा भरभराटीला येत आहोत. इस्लामी एकतेच्या भावना प्रत्यक्ष सहकार्य आणि परस्पर हिताच्या गोष्टी करून आता व्यवहारात आणण्याची वेळ येऊन ठेपली आहे.' भुत्तो ओजस्वीपणे म्हणाले. (त्याचे हे संपूर्ण भाषण '*झुल्फिकार अली भुत्तो* ' *न्यू डायरेक्शन्स* ' या पुस्तकात ७४ ते ९२ पानात छापलेले आहे. हे पुस्तक लडनच्या नामारा पब्लिकेशन्सने १९८० मध्ये प्रकाशित केलेले आहे.'

दीर्घक बुद्धीनेच पहायचे झाले, तर असे म्हणता येईल की, भुत्तो यांनी कर्जबाजारी झालेल्या पाकिस्तानवरील आर्थिक बोजा उतरवण्यासाठी आपल्या तेल-समृद्ध अरब शेजारी राष्ट्राना खूष करण्यासाठी याची माहिती जालानी यानी दिली. भुत्तो याच्या नव्या इस्लामी मित्राबद्दल तर पाकिस्तानातील लोकाना फारच आकर्षण वाटत होते. जालानी म्हणाले की, 'माझ्या पहारेकऱ्याना कर्नल गदाफी म्हणजे *साक्षात पैगंबरच वाटत होता.'*

याचे कारणही तसेच जबर होते. पाकिस्तानात नुकताच भयंकर भूकंप येऊन फारच वाताहात झाली होती. गदाफीच्या भेटीमुळे मोठीच आशा बळावली होती. लिबियाच्या प्रत्येक तेलविहिरीतून उसळून येणारे तेल लवकरच पाकिस्तानच्या सेवेस रुजू होईल आणि लिबिया आपल्या इस्लामी भावड–देशाला हात आखडता न घेता भरघोस मदत देईल, लिबियाचा पैसा पाकिस्तानात महापुरासारखा येऊ लागेल आणि प्रत्येक पाकिस्तानी घरात कोंबडी जरी शिजली नाही तरी निदान पातेलेभर भात नक्कीच दिमू लागेल, असे लोकाना वाटू लागले होते. हे जालानी यांनीच केलेले वर्णन आहे.

गदाफीनी पाकिस्तानच्या गोरगरिबासाठी पैसा दिला; पण भुत्तो *यांना कोंबडी व भात यापेक्षा किती तरी जास्त असे काही हवे* होते. त्याची महत्त्वाकांक्षा अण्वस्त्रधारी होण्याची होती. गदाफी याचीही तीच होती. म्हणूनच भुत्तो कराची येथे नव्यानेच उभारलेली परमाणुभट्टी दाखवायला गदाफीना घेऊन गेले होते. कॅनडातून आणलेल्या या भट्टीची माहिती गदाफीना देण्यासाठी या भेटीत पाकिस्तान अणुशक्ति मंडळाचे नवे अध्यक्ष मुनीर खान जातीने हजर होते. हेच

## आपल्या सेनादलात असंतोष आणि उठाव होईल या शंकेमुळे भुत्तो चिंतेत असत.

इस्लामिक एकतेची मोठी मोहक भाषा वापरली आणि प्रत्यक्षात मात्र त्याच्यापुढे भिकेची झोळीच फिरवली. विशेषत: त्याचे नवे क्रांतिकारी मित्र कर्नल गदाफी याच्या बाबतीत तरी हे खरेच होते.

या शिखरपरिषदेच्या काळातच भुत्तोनी लाहोरच्या नव्या फुटबॉल स्टेडियमला त्या लिबियन नेत्याचे नाव दिले. पाकिस्तानी विकासाच्या स्पृहणीय स्थळाना भेट देण्याचा एक दौरा आखून ते आपल्याबरोबर गदाफीना घेऊन गेले. या दौऱ्यात त्यानी गदाफीना *वाह येथील शस्त्रोद्योग दाखवला. सोमनियानी येथील* एअरोस्पेस तळही दाखवून आणले. पाकिस्तानी विमानदलाजवळ असलेली उत्तमोत्तम विमाने फ्रेंच मिराज, चिनी मिग आणि जुनी अमेरिकी एफ–८६ विमाने डोक्यावरून जात असताना त्यांची ओळख करून दिली गदाफी जिथे गेले तिथे तिथे त्यांचे वीरोचित स्वागत करण्यात आले.

पाकिस्तानच्या लष्करातील एक माजी अधिकारी जनरल ए. डी. जालानी आता अमेरिकेत स्थायिक झाले आहेत... भुत्तोंनी या जालानींना प्रशासकीय स्थानबद्धतेत टाकले होते. आपल्या सेनादलात असंतोष आणि उठाव होण्याच्या शक्यतेमुळे भुत्तो चिंतेत असत. विशेषत: बलुची लोकांना पाकिस्तान सरकारात कोणतीही सत्ता न मिळाल्यामुळे ते आपल्याविरुद्ध उठाव करतील की काय अशी धास्ती भुत्तोना नेहमीच वाटत असे, म्हणूनच जालानींना स्थानबद्धतेत टाकले असावे. *या जालानींना आम्ही भेटलो.* गदाफी पाकिस्तानात आले तेव्हा लोकांच्या आशा किती चाळवल्या आणि चेतवल्या होत्या

मुनीर खान इस्लामी अणुबॉंबनिर्मितीचे सर्वोच्च अधिकारी होते. अणुभट्टीस भेट हा तर जाहीर कार्यक्रमाचा भाग झाला; पण याला दुसरी एक गुप्त बाजूही होती. लाहोर शिखरपरिषद चांगली आठवडाभर चालली आणि याच परिषदेच्या अखेरीस गदाफी यानी पाकिस्तानाला इस्लामिक अणुबॉंब तयार करण्यासाठी लागणारा पैसा पुरवण्याची प्रतिज्ञा केली

या वस्तुस्थितीला पाकिस्तानच्या एका जबाबदार माणसाने दुजोरा दिला. *या माणसाला भुत्तो यानीच* नेमले होते. बी. बी. सी. च्या पॅनोरमा फिलममध्ये हा माणूस कॅमेऱ्याकडे पाठ राखून पडद्यावर आला होता. इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या मदतीने त्याच्या आवाजातही बदल करण्यात आला होता आता हा इसम हयात नाही. बराच काळ आजार काढल्यानतर तो मरण पावला आहे. त्यामुळे तो खरा कोण होता हे आता सागायला हरकत नाही. तो होता— पाकिस्तानी पत्रकार, एके काळचा कूटनीतिज्ञ आणि पाकिस्तान इन्टरनॅशनल एअरलाइन्सचा युरोपातील संचालक, श्रीयुत मोहंमद बेग.

मरणापूर्वी बेगने आम्हाला अनेकदा मुलाखती दिल्या. एअरलाइन्सचे हे पद भुत्तोने मुद्दामच आपल्या या पत्रकारमित्राला घ्यायला लावले होते. *बेगच्या मुलाखतीचे सार असे आहे : लाहोरच्या* इस्लामी शिखरपरिषदेचा खर्च सौदीअरबस्तानचे राजे फैजल यांनी केला होता. त्या परिषदेतच कर्नल गदाफीनी भुत्तो याना आश्वासन दिले होते की, तुम्ही अणुबॉंब बनवा, लागेल तो पैसा मी

देईन. डिसेंबर १९७५ मध्ये एक आणि १९७६ च्या उन्हाळ्यात दुसरी अशा दोन खास विमान–खेपा त्रिपोलीहून कराचीपर्यंत कडक सुरक्षा बंदोबस्तात आणण्याची व्यवस्था करायला भुत्तोनीच बेग याना सांगितले होते. अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीसाठी असल्याच्या भासविण्यात आलेल्या या विमान–खेपातून गदाफीचा खास दूत सूटकेसेस घेऊन कराचीला गेला होता. प्रत्येक खेपेत त्याने दहा कोटी अमेरिकन डॉलर्स या सूटकेसेसमधून नेले होते. पाकिस्तानच्या सरकारी हिशोबात हा पैसा कधीही दाखवण्यात आला नाही. त्यामुळे कर्जबाजारी पाकिस्तानला मदत देणाऱ्या पाश्चात्य राष्ट्राना त्यावर नजर ठेवता आली नाही आणि आमच्यासारख्या अतिउत्सुक पत्रकारानाही वास लागला नाही. हा पैसा सरळ भुत्तोच्या हाती जात होता आणि तो ते हवा तसा खर्च करू शकत होते गदाफीनी बदल्यात फक्त एकच इच्छा व्यक्त केली होती की, पहिला अणुबाँब त्याना मिळावा. राजे फैजल यानीही तीच इच्छा व्यक्त केली होती. परमाणु–कार्यक्रमासाठी असो नाही तर इतर सामान्य मदतीसाठी असो, सौदीराजे फैजल यांचा सर्व पैसा नेहमीच्या बँकामार्फत पाकिस्तानात आला. १९७३ च्या जुलैपासूनच इस्लामी देशातून पैशाचा लोंढाच पाकिस्तानात येऊ लागला. इराणच्या शहानी एका वर्षात ५० कोटी अमेरिकन डॉलर्स दिले असे पाकिस्तानच्या आर्थिक आढाव्यातच म्हटले होते. नंतरच्या वर्षातही इराणच्या शहांनी पाकिस्तानला भरपूर मदत दिली. कदाचित इराणच पाकिस्तानला सर्वात जास्त पैसा पुरवणारा एकटा इस्लामिक देश होता पाकिस्तानी बलुचिस्तानातील बंडखोर बलुची लोक इराणी बलुचिस्तानात शिरतील अशी धास्ती शहाना वाटत होती या बंडखोर बलुची लोकाचा बीमोड करण्यासाठीच इराणने पाकिस्तानला ही मदत दिली आहे असे नमूद करण्यात आले होते.

सर्व बेरीज केली तर भुत्तोंना त्याच्या परमाणु–कार्यक्रमासाठी अक्षरशः अब्जावधी डॉलर्स इस्लामी देशानी दिले त्या कार्यक्रमासाठी एवढा पैसा पाकिस्तान खर्चदेखील करू शकला नसता तरीही इस्लामी देशाकडून पैसा उभारण्याची भुत्तो याची ही हातोटी अविश्वसनीयपणे अचाटच होती. इस्लामिक अणुबाँब तयार करण्याचे आमिष दाखवून यातील बरीच मोठी रक्कम त्यानी उभारली यात वाद नाही.

इस्लामी देशाना अणुबाँब देऊन भुत्तोंनी ही रक्कम फेडली असती का? हा प्रश्न आता निव्वळ पुस्तकी आहे फार तर निव्वळ अटकळीचा झाला आहे. आपली अणुबाँबयोजना तडीस नेण्याच्या आतच भुत्तो पदच्युत झाले आणि फासावर चढवले गेले श्रीयुत 'क' यानी आम्हाला सांगितलेच होते की, लिबियाला याबाबत पहिल्यापासूनच कटकट करावी लागली होती नाही तरी भुत्तोसारखा अत्यंत चाणाक्ष गदाफीने पहिला अणुबाँब मागितला असला तरी, या बाँबचा उपयोग हुकुमाच्या पानासारखा करून घेतल्याशिवाय राहिला नसता. बेग आणि खलीद हसन दोघानीही आम्हाला हेच सांगितले की, भुत्तोनी पहिला बाँब पाकिस्तानच्याच हाती ठेवला असता त्याने अरब देशाशी वागताना आणि पाश्चात्याशीही संबंध ठेवताना आपल्या हाती असलेल्या बाँबचा कूटनैतिक आणि राजकीय लाभ उठवण्यासाठीच अवश्य उपयोग करून घेतला असता. नासर यांनीही मेजर जालौदला हेच सांगितले नव्हते का की, चीन असो नाही तर आणखी कुणी असो, कोणताही देश कुणालाही अणुबाँब सहजासहजी विकणार नाही.

पण भुत्तो आणि आता त्याचे उत्तराधिकारी याच्यासमोर प्रश्न हा उभा आहे की, पाकिस्तानसारख्या कमालीच्या दारिद्र्याने गांजलेल्या देशापुढे दुसरा मार्ग तरी काय आहे? भुत्तोच्या वेळी होता तसाच आताही पाकिस्तान इस्लामिक शेजाऱ्याकडून येणाऱ्या पसाभर दानावर आणि त्या देशामध्ये कामे करीत असलेल्या पाकिस्तान्यानी मायदेशी पाठवलेल्या पैशावरच संपूर्णपणे अवलंबून आहे या सर्व इस्लामी मंडळीनी संगनमत करून 'आम्हाला संपूर्ण अण्वस्त्रक्षमता' हवी अशी मागणी केली, तर बिचारा पाकिस्तान काय करू शकणार आहे? कारण पश्चिम असो नाही तर पूर्व असो नियम सारखाच आहे—तळे राखील तोच फळे चाखील !


( क्रमशः )

## अकाली आंदोलन : पृष्ठ ११ वरून

केव्हाच तेथे पोलीस घुसवून मोकळे झाले असते तेव्हा हिंदूना एक न्याय व शिखाना दुसरा न्याय ही वृत्ती चांगली नव्हे. त्यामुळे शिखाच्यात अलगतेची भावना वाढीस लागेल जी चूक आपण मागे मुसलमानाच्या बाबतीत केली तीच चूक आपण अकालीच्या बाबतीत करणार असलो तर आपण मागच्या चुकापासून धडा घेतला नाही असेच म्हणावे लागेल. आपण अल्पसंख्य असल्याने आपण म्हणू त्याप्रमाणे होईल, आपल्या भावना दुखावल्या जाणार नाहीत कारण आपल्या मताची किंमत ही भावना एखाद्या जमातीच्या मनात रुजली तर बहुसंख्याकाना भारतात रहाणे मुष्कील होऊन जाईल व या गोष्टीची जबाबदारी केंद्रसरकारवर राहील मुसलमानाप्रमाणे शीखही अलगता बाळगू लागले व त्याच्यात हिंदुद्वेष वाढीस लागला तर या देशाची अखंडता कायम कशी रहाणार?

केंद्रसरकारने अकाली आंदोलनाच्या बाबतीत वोटचेपेपणा सोडून देऊन कणखरपणा दाखवणे आता आवश्यक झाले आहे. पंजाबचा प्रश्न आसामप्रमाणे ताणून धरणे शहाणपणाचे नाही. चंदिगड पंजाबला देण्याचा प्रश्न हा तावडतोब सोडवावयास हवा. त्याचप्रमाणे चंदिगडच्या बदल्यात फाजिल्का व अबोहर हे प्रदेश कसलाही लवाद न नेमता हरयाणाला द्यायला हवेत नद्याच्या पाण्याच्या वाटपाबाबत पंजाब, हरयाणा, राजस्थान याना योग्य न्याय देऊन कोणाचेही नुकसान होणार नाही याची खबरदारी केंद्रसरकारने घ्यायला हवी. पंजाबचा गुंता केंद्रसरकारने तावडतोब सोडवायला हवा पंजाबचे मुख्यमंत्री दरबारासिंग हे काही कर्तबगार मुख्यमंत्री नव्हेत त्याच्या विरुद्ध त्याच्याच पक्षात बऱ्याच कुरबुरी चालू आहेत. या बाबतीत स्वतः इंदिरा गांधीनी लक्ष घालून योग्य निर्णय घ्यावयास हवा. पंजाब व आसाम या दोघाच्याही समस्या वेगवेगळ्या आहेत. आसामवर परदेशी नागरिकाचे, परभाषिकाचे जे आक्रमण झालेय तसा प्रकार पंजाबात नाही पंजाबात अकालीनी चालवलेल्या आंदोलनाला हिंदूचा, काही विरोधी पक्षाचा आणि सर्व शिखाचाही पाठिंबा नाही. त्यातच शिखाच्या काही धार्मिक मागण्या मान्य झाल्याने शांतताप्रिय शीख नागरिकाचा या आंदोलनाला तितकासा पाठिंबा राहिलेला नाही. तेव्हा केंद्र सरकारने आता खंबीरपणा दाखवून अकालीच्या समस्या आपल्या मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा, नाही तर भयंकर अराजकाला तोंड देण्याची तयारी ठेवावी ! □

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

**सुखी माणसाच्या सदऱ्याविषयी आपण फार जुन्या काळापासून ऐकत आलोय. सुखी स्त्रीच्या साडी-चोळीविषयी कुठे काही लिहिल्या-वाचल्याचं आठवत नाही. वास्तविक पाहता मानवी सुखदुःखांचे ठोकताळे, गणिती पद्धतीने मांडता येत नाहीत, तसे ते मांडूही नयेत. तरी सुद्धा शक्य तितक्या पूर्वग्रहविरहित दृष्टीनं स्त्रियांच्या जीवनाकडे बघताना जाणवलेल्या काही व्यक्ती आणि वृत्ती पंधरा दिवसांनी येणाऱ्या या सदरात डोकावून जातील.**

ते एक प्रातिनिधिक जोडपं आहे.

त्यांना ते जाणवलंय की नाही कोणास ठाऊक. मला त्यांच्या संवेदनक्षमतेबद्दल शंका नाहीये; पण विचार करायला त्या पुरुषापाशी वेळ नाही आणि त्या बाईचा तसा कल नाही हे मी निश्चित ओळखलंय. त्यांच्या लग्नाला झाली असतील वीसएक वर्षं किंवा कदाचित कमीही असतील; पण तिच्याकडे पाहून लग्न खूप शिळं झाल्यासारखं वाटतं खरं. त्यामानानं तो अजून पुष्कळ ताजा दिसतो. अद्ययावत राहातो. जगभर फिरत असतो, त्यामुळं कुठं काय नव्यानं चाललंय हे त्याला माहीत असतं. त्याच्या वागण्या-बोलण्यात आत्मविश्वास असतो, निर्णयक्षमता असते. स्वतंत्रपणं त्याला एकट्याला पाहिल्यावर त्याच्या बायकोविषयी, त्याच्या संसाराविषयी लोकांच्या फारच वेगळ्या कल्पना होतात आणि तिला पहिल्यांदा पाहिल्यावर झालेला अपेक्षाभंग कित्येकांना लपवताही येत नाही. 'एवढ्या चोखंदळ पुरुषाची ही असली निवड ?'

लग्नाच्या वेळी मात्र कोणीच असं म्हटलं नसतं इतकी ती दोघं अनुरूप होती. दक्षिण महाराष्ट्रातल्या, सांगली–सातारा टापूतल्या कनिष्ठ मध्यमवर्गीय घरातली दोघं मुलं ती ! नवरामुलगा म्हणून त्याचं क्वालिफिकेशन होतं होतकरूपणा हे आणि तिच्या परीक्षेत १०० पैकी ९९ मार्क गृहकृत्यदक्षतेला मिळालेले होते. त्यानं पुरेसं मिळवावं, तिनं मन लावून रांधावं एवढ्याच अपेक्षा होत्या त्यांच्या एकमेकांकडून; पण नियतीनं त्यांच्या हाती फारच झपाट्यानं, फारच मोठी मोठी दान टाकली. बदल्या... बढत्या... परदेशवारी... एका छोट्याशा कारखान्याचं का होईना पण सार्वभौमत्व... खाजगी नोकरीत यशस्वी माणसाला जे जे काही मिळू शकतं ते ते सगळं त्याच्याकडे चालत आलं. जोडीनं पैसा आणि मानमरातबही होतेच.

सुरुवातीला ती हरखून गेली. यश त्याचं असलं तरी तो आणि ती वेगळे का होते त्या काळात ? त्याचं मोठेपण तिनं महावस्त्रासारखं पांघरलं आणि ती त्याच्या मानमरातबावर शांत पहुडली तिला ते शक्य होतं. त्याच्यापाशी एवढा वेळ कुठला ? तो आता एका प्रचंड चाकाला बांधला गेला होता. अधिक जबाबदाऱ्या–अधिक ताण– अधिकाधिक यश–पैसा ! या जुगाराची त्याला जणू काही चटकच लागली. ऊर फुटेस्तोवर धावावं; पण हातभर 'अंतरावर' आलेला शर्यतीचा शेवटचा बिंदू पुढं ओढला जावा तसं त्याचं होत गेलं. सुखाची ग्लानी सरल्यावर ती धडपडून उठते तोवर तो कुठल्या कुठं गेलेला होता. वर्षातले कित्येक दिवस तो परदेशी असायचा, देशात असेल तेव्हा निम्मा-अधिक काळ परगावी असायचा, गावात असला तरी रात्रंदिवस ऑफिसच्या, कारखान्याच्या विवंचनेत असायचा. या सगळ्यातून तो फारच क्वचित् घरी असायचा आणि तिच्याजवळ तर...

प्रश्न नुसता शारीरिक अंतराचा नव्हता. तशी तर सुरुवातीला कधीकधी तीही त्याच्याबरोबर दौऱ्यावर वगैरे जायची. मुलं लहान असताना ते शक्य होतं; पण वाढतं मनामधलं अंतर सांधणं दिवसेंदिवस कठीण जायला लागलं. त्याचं जग झालंच होतं तेवढं विशाल. त्याचं व्यवसायक्षेत्र मोठं होतं, संबंधितांचं वर्तुळ वाढत होतं. त्याच्या पैशाच्या आणि सुखाच्या कल्पना तिला झेपण्याजोग्या राहिल्या नव्हत्या. निदान सुरुवातीला स्वतःची कर्तबगारी दाखवण्याच्या मिषानं का होईना, तो मुद्दाम तिला चार ठिकाणी न्यायचा. नवीन ऐकलेलं-वाचलेलं आवर्जून सांगायचा. तोवर तिलाही ऐकण्याची अपूर्वाई होती. पुढं पुढं त्याचा सांगण्याचा उत्साह संपला, तिला ऐकण्यातला वेळ वाया गेल्यासारखा वाटायला लागला. आपल्या चिमुकल्या, पिठामिठाच्या आयुष्याशी याचं नातं काय ?

नातं होतं जरूर; पण ते थोडं फुंकरीनं फुलवायला हवं होतं. परिस्थिती अनुकूल नसेल तर प्रयत्न व्हायला हवे होते. दरम्यान दोघांचीही ती बाजू कमी पडली. तो त्याचं आयुष्य जगू लागला, ती तिचं. मुलं नेहमीच चलाख असतात तशी त्यांचीही मुलं त्या त्या वेळी सोयीचं वाटेल ते पत्करायला लागली. कळत–नकळत संसाराचा पायाच सुखापेक्षा सोय हा जास्त झाला.

तिच्या मनात जपलेल्या संसारावर हा कुठे तरी हल्ला होता. त्यामुळे ती एकदम खूप सावध झाली. धोक्याच्या काळात प्राण्यानं हातपाय पोटाजवळ घ्यावेत तसं तिनं स्वतःचं उरलं–सुरलं अस्तित्व गोळा केलं. माझी मूल्यं...माझा विचार...माझी आवडनिवड असा आग्रह धरता धरता त्याच्या नव्या आयुष्यातले बदल ती धुडकवायला लागली. दारू पिणं...वाईट ! पैसे लावून पत्ते ?... अब्रह्मण्यम् ! उच्चभ्रू पार्ट्या... संमेलनं... ? मला नाही जमणार. जमणार नाही असं नव्हतं, तिला ते काही जमवायचंच नव्हतं. थोडा दुराग्रह होता, थोडी भीती होती, थोडा न्यूनगंड होता. या सर्व गोष्टी चांगल्यावाईट ठरवण्यापूर्वी त्यांना मोकळ्या मनानं सामोरं जाण्याची जी शक्ती हवी तीच तिच्यात उरली नव्हती. आपल्यात आणि त्याच्यात अंतर निर्माण करणाऱ्या गोष्टी त्या ह्याच. म्हणून ह्या दूर

सारू या, असं ठरवताना, या गोष्टी तशाच राहातील, आपल्यातलंच अतर वाढेल हे तिच्या कस बरं लक्षात आल नाही ?

तसा तो रोटरीयन झाला तेव्हा ती रोटराणी झाली, तो लायन, जायण्ट वगैरे झाला तेव्हा ती हाताला हात लावून मम म्हणाली, त्यात त्या बडया वर्तुळामध्ये कोणाला खटकण्यासारख नव्हतंच. कारण उपस्थितांमधली बहुतेक जोडपी अशीच होती. सगळया राण्या पिठामिठाच्या संदर्भात गाडलेल्या, सगळे राजे त्याच्याशी संबधच नसल्यासारखे दूर भटकणारे! म्हणून तर म्हटल, ते जोडपं प्रातिनिधिक आहे.

अशी खूप जोडपी आसपास दिसतात. ज्याना पाहून मनात लग्नसस्थेबद्दलच खूपसे प्रश्न पडायला लागतात. हा कसला सहप्रवास ? आणि यात आनद तरी कसला असणार ? पुरुषाला निदान बाहेरची शिखरं तरी असतात काबीज करायला, त्या यशाची नशा असते; पण बाईचं काय ? सकोचानं, भीतीनं किंवा अगतिकतेनंही बायका हे बोलून दाखवत नसतील. तरीही त्याच्या ओझरत्या बोलण्यात, संदर्भात मला जुन्या काळातल्या एखाद्या पुस्तकात आढळावीत तशी, 'आम्ही गुलबर्ग्याला कलेक्टर होतो तेव्हा' किंवा 'इकडून आय. सी. एस. परीक्षा द्यायचं झाल तेव्हा' अशी वाक्य चक्क ऐकायला यायला लागतात जीव एवढाएवढा होतो.

दोन तुल्यबळ खेळाडूनी खेळण्यात मजा असते. त्यातल्या हारजितेलाही मोल येत. इथं मात्र जन्मभर पुरुषानं तिला लिंबूटिंबूसारखं वागवलेलं असत. खेळात तर समाविष्ट करायच, फार अपेक्षा तर ठेवायची नाही, रुसवेफुगवे काढायचे, लुटुपुटूची हारजीत मिळवायची.. थोडक्यात म्हणजे खेळ खेळल्यासारख दाखवायच. गडद काळ्या चष्म्यातून त्याच्याकडे पाहिलं तर सगळ माप त्याच्याच शर्टात टाकाव लागेल. त्यान असं लिंबूटिंबूसारख का वागवल ? पण तिन तरी अस वागवून का घेतल ? हा प्रश्न विचारून पाहिला तर ?

जुन्या काळात अनिलानी एका कवितेत म्हटलय ते अशा वेळी पुन्हा पुन्हा आठवतं. ससारातल्या अनेक अडचणीचं वर्णन करून ते म्हणतात,

कसे निभावून गेलो.
कळत नाही, कळले नव्हते.
तसे काहीच जवळ नव्हते.
फक्त हाती हात होते !

कविराज, आपल्या हाती गुलबकावलीच्या फुलाइतकी दुर्मिळ गोष्ट लागली आहे हे तुम्हाला जाणवलं होतं का ?

□

# आनंदाचे अनुभव

## शोभा भागवत


लहानपणच्या माझ्या एका मैत्रिणीची आई अतिशय हौशी होती. ती आम्हा सातआठ छोटया मुलीना जमवून आमचे नाच बसवायची, नाटक बसवायची, आम्हाला गोष्टी सांगायची. एकदा तिने आमच्यासाठी खास बाहुलीच्या लग्नाचा बेत केला होता. तारा, मणी, मोती आणून आम्हाला बाहुलाबाहुलीसाठी दागिने करायला शिकवले होते. शिप्याकडून कापडांचे रंगीत रंगीत तुकडे आणून पोषाख शिवले होते. लग्नाच्या फराळासाठी खास छोटे छोटे लाडू-करंज्या केल्या होत्या. आम्हाला जरीच्या साडया नेसवल्या होत्या. आमच्या एका मैत्रिणीला तिची आई साडी देईना तेव्हा त्यानी स्वत ची साडी दिली. तिला नेसवली होती. (अशा कार्यक्रमात आईनं स्वत.ची साडी न देण हा फार दु खद अनुभव असतो तो मनाला लागून राहतो.) खेळायच्या छोटया मोटारीतून नवरा-नवरीची वरात पण काढली होती.

हे बाहुलीच लग्न मला अनेकदा आठवतं तेवढी खरी मोठी लग्न आठवत नाहीत. कारण मला वाटतं हे लग्न खास आमच्यासाठी होत आम्ही त्याची तयारी केली होती. आम्ही जे म्हणू ते प्रमाण होतं एरवीच्या मोठया लग्नात नवे कपडे घालून मिरवण्याशिवाय काही स्वत.ला कामच नसतं. बरं, अशा लग्नात लहान मुलाकडे फारस कुणी लक्षही देत नाहीत. मुल मुलं आपापसात खेळत असतात आपली.

असे खास मुलासाठी म्हणून आपण काही कार्यक्रम करतो का ? आपल्या घरात होणाऱ्या कार्यक्रमात मुल आपली फरफटली जातात एवढच आपल्याला जो सिनेमा पहायचा असतो तो केवळ प्रौढासाठी नसला तर मुलाना आपण बरोबर नेतो. आपल्याला कुणा मावशी-काकीकडे जायच असल की, आपल्याबरोबर मुलाना नेतो. लग्नाला नेतो, इतर समारभाना नेतो, सहलीना नेतो, गावाला नेतो ह्यात मुलं बहुधा नाही म्हणत नाहीत. थोडी मोठी असली, त्याना निवडीची परवानगी असली तर ती कधीकधी नाही पण म्हणतात त्याचा नकारही नेहमी आपल्याला पटतोच अस नाही. तो आपल्या गैरसोयीचा असला तर आपण त्याना दामटून बरोबर नेतोच. अर्थात आपल्याही काही अडचणी असतात मुल घरी राहतो म्हणाली तर त्याना पहाणार कोण हा प्रश्न असतो. पुन्हा आपण जिथे जाणार तिथे कदाचित 'हे काय ? मुलाना न घेता कसे आलात ?' हा प्रश्नही विचारला जाण्याची शक्यता असते कधी तरी आपल्याला आपल मूल मिरवायचसुद्धा असत.

जाणूनबुजून ही मुलाची फरपट आपण करतो अस नाही; पण असा एखादा निर्णय घेताना, कार्यक्रम ठरवताना मुलाचंही काही मत असत, मार्ग असतात, विरोध असतात, प्रश्नावर तोडगेसुद्धा असतात हे आपण विचारात घेत नाही.

कधीकधी काही माणसाविषयी मुलांची मत इतकी ठाम बनलेली असतात की, ती बदलणं फार कठीण जातं. अशा वेळी केवळ



# आपली मुलं

दर पंधरा दिवसांनी येणारी ही लेखमाला.
बालमानसशास्त्र आणि पालक

शिक्षणात सांगितले जाणारे काही प्रयोग घराघरापर्यंत पोचावेत हा या लेखमालेचा उद्देश आहे. स्वतःच्या अनुभवातून शिकत जाण्याची ही पद्धत आहे. तुम्ही स्वतःसुद्धा असे काही पयोग केले असतील, काही अनुभव घेतले असतील. म्हणूनच सर्व पालकांनी यात सहभागी व्हावं अशी अपेक्षा आहे. तुमचे स्वतःचे असे काही प्रयोग–काही अनुभव 'माणूस'कडे पाठवा. त्याला अवश्य प्रसिद्धी दिली जाईल.

मोठ्या माणसांना मान दिला पाहिजे, या सक्तीपायी त्या जिवाला त्या मोठ्या माणसाशी नमतं घ्यायला लावणं, त्याला मान देणं, त्याचं ऐकणं हे जमत नाही. मुलावर फार अन्याय होतो.

एकदा आमच्याकडे ओळखीच्या एक मोठ्या बाई आल्या होत्या. मुलं घरात होती. मी जवळच कुठे तरी काही कामासाठी गेले होते. ह्या बाईंनी आल्यावर मुलाला हुकूम सोडला,'जा रे,तुझ्या आईला बोलावून आण! म्हणावं अमुक अमुक आल्यात!' मुलांनी नेमका काय विचार केला मला माहीत नाही; पण त्याला कामासाठी गेलेल्या आईला केवळ ह्या बाईशी गप्पा मारण्यासाठी बोलावून आणावं हे पटलं नाही. कोण कशासाठी येतं, किती महत्त्वाचं किंवा जवळचं असतं ह्याचा मुलांना बरोबर अंदाज असतो. त्या बाई रागावल्या. मग त्या म्हणाल्या, 'इथे आता माझी नात असती तर जा म्हटल्याबरोबर गेली असती!' हे वाक्य मुलाला फारच लागलं. कारण तुलना आली. कुठे तरी त्याला वेडं ठरवलं गेलं. तो पुन्हा नाही म्हणाला. मग त्या बाई म्हणाल्या, मी सगळ्यांना सांगीन हा मुलगा ऐकत नाही सांगितलेलं. सगळ्यांना वाटतं तू शहाणा आहेस; पण असा कसा वागतोस?' झालं हा आरोप म्हणजे कळसच झाला!


मी आल्यावर ह्या बाई मला हसत हसत सांगायला लागल्या काय काय घडलं ते. मी त्यांची तात्पुरती समजूत घातली. मग त्या गेल्यावर मुलाला म्हटलं, 'काय झालं रे?' तो म्हणाला, 'त्यांनी नुसतं विचारलं असतं तर मी गेलो असतो; पण असं बोलणारी माणसं मला मुळीच आवडत नाहीत. मी अशांचं कधीच ऐकणार नाही!' त्याच्या बोलण्यात राग होता, संताप होता, अपमान होता, दुखावलेपणाचा सूर होता मला त्याची बाजू समजली; पण एवढं सगळं समजून मुलांशी बोलणारी माणसं ह्या समाजात कुठे मिळणार होती? अशाही माणसांशी जुळवून घ्यायला त्याला शिकवायला हवं!

मोठी माणसं मुलांशी अशी वागतात ती वाईट हेतूनं मुळीच नाही; पण लहान मूल म्हणजे, त्यानं आपण सांगू ते तत्परतेनं ऐकलं पाहिजे, म्हणू तिथे चटपट गेलं पाहिजे अशीच आपली अपेक्षा असते. आपल्याला त्याची जरूर नसते. तेव्हा त्यानं मुकाट्यानं एकाग्र चित्तानं अभ्यास करत बसलं पाहिजे; पण आपल्याला गरज लागली तर कोपऱ्यावरल्या दुकानात धावत जाऊन साखर आणून दिली पाहिजे. तेव्हा तो जर म्हणाला, मला अभ्यास आहे तर तो उर्मट ठरतो, न ऐकणारा ठरतो.

सगळ्या प्रकारच्या परिस्थितीशी जुळवून घ्यायला मुलानं शिकलं पाहिजे हे मान्य; पण सारखी दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणे तारेवरची कसरत कशी जमावी? एखादी खाष्ट सासू जसं सुनेला म्हणते, 'ज्यात त्यात काय विचारायचं ते? आपलं डोकं चालवून थोडं काम करायला शीक!' आणि तिनं स्वतंत्रपणे काही केलं की लगेच म्हणते, 'कधी दुसऱ्याला विचारायचं नाही सवरायचं नाही. आपल्या मनात येईल ते करत सुटायचं.' जेव्हा तुम्ही आपलं डोकं चालवून काम करायला सांगता तेव्हा ते करताना काही चुका होणारच हे गृहीतच धरायला नको का? तसंच एका विशिष्ट प्रकारचं वळण मुलाला लावताना त्याची दुसरी बाजूही लक्षात घ्यावी लागतेच. अभ्यासाला बसल्यावर उठायचं नाही म्हटलं की, मूल उठणार नाही. मग जेव्हा कामासाठी त्याला उठवायचं तेव्हा त्याला त्या आणीबाणीचं कारणही थोडक्यात सांगायला हवं; पण इतकं मुलाशी बोलत बसायला वेळ कुणाला असतो? आणि जरूर काय त्याची? 'सांगतो ते मुकाट्यानं कर. का म्हणून विचारायचं नाही!' हे सुभाषित आपणही लहानपणी अनेकदा ऐकलेलं असतं.

हे वाक्य लिहिलं आणि आठवण झाली आम्हाला पोहायला शिकवणाऱ्या सरांची. पोहणं म्हणजे पाण्याशी खेळणं आहे. कुठे तरी स्वतःच्या शरीराला पाणी उचलून कसं धरतं ते समजून घेणं आहे, पाण्याचा मुलायम स्पर्श अनुभवणं आहे. शांतपणे तरंगतांना, फ्लोटिंग करताना साऱ्या शरीराला विसावा देणं आहे, त्याचा कधी त्यांनी पत्ताच लागू दिला नाही. ते कधीकधी आम्हाला पाण्यात बुडवायचे. घाबरलं तर इतक्या जोरात ओरडायचे की, घाबरायलाही आम्ही घाबरायचो! कानात पाणी जातं





म्हटलं की खेकसून म्हणायचे, 'आमच्या नाही का जात पाणी कानात ?' काही विचारलं की म्हणायचे 'मार २०० पाय. सांगतो म्हणून. करायचं. का म्हणून विचारायचं नाही. कधी तर ते विहिरीच्या काठावरून ढकलून पण द्यायचे !'

अर्थात असं वागूनही त्यांच्याकडे बरीच मुलं पोहणं शिकली. माझ्यासारखी काही भीतीनं कधीच शिकलीच नाहीत !

ह्या पोहण्याच्या शिक्षकांचा आणि शाळेतल्या इतर काही शिक्षकांचा अनुभव पाहिला तर असं वाटतं की, मुलांना काही शिकवायचं तर ते त्यांना ओरडून, मारून, अपमान करूनच शिकवलं तर ते येतं असं काहींना वाटतं. ह्यात फक्त शिक्षकच असतात असं नाही. काही पालकांनाही असंच वाटतं.

याचं कारण बहुधा मुलांना न ओरडता, न मारता, न रागावता शिकवावं कसं, जे शिकवतो त्यामागचं तत्त्व सोप्या शब्दात स्पष्ट कसं करावं हे आपण कधी शिकलेले नसतो. कधीकधी तर केवळ पूर्वतयारी नसल्यानं आपण मुलांना वाईट अनुभव देतो.

बालवाडीत प्रथम जाण्याचा अनुभव हा असाच असतो. मोठ्या उत्साहानं नवे कपडे घालून डबा घेऊन पोर शाळेत पोचतं; पण आईला घरी जाऊ द्यायला काही तयार नसतं. रडायला लागतं. मग बाईंनी पकडून ठेवायचं, दार लावायचं, आईनं निघून जायचं. आता ही आई आपल्याला पुन्हा कधीही दिसणार नाही अशा आकांतानं पोर रडत राहतं. त्याचं पाहून इतरही शांत बसलेली मुलं सूर काढतात.

हा पहिला अनुभव जरा आनंदाचा अनुभव होणार नाही का ? एकदा एक बालवाडी–प्रवेशाची छोटीशी फिल्म पाहिलेली आठवते. त्यात आईबरोबर मूल येतं. आईचं बोट धरून शाळाभर हिंडतं. बाईंची ओळख करून घेतं. बाई मुलाच्या घरी येऊन मैत्री करतात. शाळेचा पहिला दिवस येतो. मूल येतं. बाई वर्गातल्या इतर मुलांची ओळख करून देतात. दोन–तीन मुलं पांढऱ्या उंदरांशी खेळत असतात. त्यातलं एक मूल हातातला उंदीर या नव्या मुलाला दाखवतं. नवं मूल त्याला हात लावून पाहतं. चटकन हात मागं घेऊन हसतं. सगळीच मुलं हसतात. ते मूल हळूहळू रमतं आणि आई केव्हा गेली न् केव्हा आली ते त्याला कळतही नाही.

आपल्या बालवाड्यांमध्ये पालकांनी थांबायचं म्हटलं तर जागा हा मोठा प्रश्न असतो. ह्या प्रश्नापेक्षाही मुलाच्या मनाची पूर्वतयारी नसते हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. अडीच-तीन वर्षं आईला दिवसभर चिकटून असलेलं मूल एकदम शाळेत रमेल कसं ? यासाठी घरातसुद्धा मूल खेळत असताना आईनं त्याला सांगून थोडं बाजूला जाऊन परत येणं व हा काळ हळूहळू वाढवणं हेही करायला हवं. पंधरा दिवस तरी मुलाबरोबर शाळेत थांबणं, त्याच्या बरोबरीच्या मुलांमध्ये त्याला रमवणं, खेळण्याची ओळख करून देणं हे व्हायला हवं.

पोहण्याच्या अनुभवात काय किंवा बालवाडीच्या अनुभवात काय रडणारी मुलं नंतर शिकतात, रमतात हे खरंच आहे; पण हे अनुभव थोडे अधिक आनंददायक नाही का करता येणार ?

अलीकडे खास मुलांसाठी अशी बरीच नाटकं येऊ लागलीत. काही चित्रपटही येतात. मुलांसाठी रेडिओ, टी. व्ही. वर कार्यक्रम होतात. शाळांनी आयोजित केलेल्या सहली, स्नेहसंमेलनं, स्पर्धा असतातच; पण याशिवाय पालकांनी स्वतःच्या मुलांसाठी खास वर्षातून एखाद्या वेळी तरी काही कार्यक्रम योजायला हवेतच.

मुलांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं त्याच्या मित्रमंडळींना बऱ्याच ठिकाणी बोलावलं जातं. थोड्या कळत्या वयाच्या मुलांवरच ह्या कार्यक्रमाची योजना सोपवता येते. खायला काय करावं इथपासून कोणकोणते खेळ खेळावेत, मुलांना काय द्यावं ते सगळं मुलं सुचवतात. एखादी गोष्ट आपल्या बजेटमध्ये बसत नाही म्हटलं तर पर्यायही सुचवतात. आपणच सगळा पुढाकार घेऊन करण्याची जरूर नसते. ह्या प्रसंगी खेळायच्या खेळांच्या यादीत दगडांनी विटांचं कूट करण्यापासून बाजाची पेटी वाजवण्यापर्यंत सगळ्या प्रकारच्या खेळांचा समावेश असतो.

आपण आनंदानं घेतो असे कित्येक अनुभव त्यांची माधुरी, मुलांनाही हवीशी वाटत असते. रात्रीच्या वेळी घरातले सगळे दिवे मालवून, खिडकीतून येणाऱ्या पौर्णिमेच्या चांदण्यात बसून गझल ऐकणं मुलंही तितक्याच तन्मयतेने करू शकतात.

सहलीला गेलं असताना जंगलात, काळाकुट्ट अंधारात जीव मुठीत धरून केवळ रातकिड्यांची किर्रकिर्र ऐकत वर चमकणारे उडणारे काजवे पहात मुलंही खूष होऊ शकतात.

काही आनंदाचे अनुभव असे सहजगत्या मिळू शकतात तर काही मुद्दाम निर्माण करावे लागतात.

रोज रात्री झोपायच्या वेळी दोन्हीकडून दोन मुलं आपल्याला बिलगली आहेत, गोष्ट गोष्ट असा गलका करताहेत आणि आपणही मुद्दाम मुलांसाठी वाचून ठेवलेली गोष्ट हावभाव, अभिनय, आवाजांचे चढउतार यासकट सांगतो आहोत. गोष्ट ऐकत ऐकत मुलं कुशीत झोपी जात आहेत. हा मुलांनीच काय आपल्यालासुद्धा मोठा आनंदाचा ठेवा



वाटतो आणि अशी कितीशी वर्षं वाटघाला येतात आयुष्यात ? सुख सुख म्हणतात ते याहून काय वेगळं असतं ? असं वाटायला लावणारी ही वर्षं मुलांच्या लहानपणीच अनुभवायला मिळतात.

मुलांना वेगवेगळी गावं दाखवायची, प्रेक्षणीय स्थळं दाखवायची, किल्ले दाखवायचे तशीच वेगवेगळी माणसंसुद्धा आवर्जून भेटवायला हवीत. आमचे एक चित्रकार ज्येष्ठ मित्र येतात. नवीन केलेली चित्रं दाखवतात. ती चित्रं कुठं ठेवून दाखवायची यासाठी जागा निवडण्याची त्यांची गडबडसुद्धा पहाण्याजोगी असते. मग चित्रातला मूड कसा पकडला ते ते सांगतात. त्या मूडमध्ये आपल्याला घेऊन जातात आणि एकेक चित्र पोटचं पोर असल्यासारख्या हळुवारपणे ठेवून देतात. हे सगळ मुलांना असंच पहायला मिळतं, याचं मला समाधान वाटत असतं. मुलाला बघून ते म्हणाले होते याला मोठी भिंत द्या रंगवायला. त्याच्या हालचाली कशा जोरदार आहेत, तसेच हात फेकून रंगांचे फटकारे उठले पाहिजेत. त्याला छोट्या कागदावर चित्र काढायला लावू नका !

आपल्यासुद्धा लहानपणीच्या आठवणीत निसर्गाच्या अनुभवांबरोबरच काही अस्सल माणसांना भेटल्याच्या आठवणीही कायम ताज्या राहतात.

जीवनाची ही सुदैवी बाजू बघता बघता दुर्दैवी बाजूची जाणं-येणं, माहिती असणं हेही फार महत्त्वाचं आहे. हे आनंदाचे अनुभव घेणं जितकं महत्त्वाचं, तितकेच ते इतरांना देणंही महत्त्वाचं आहे यासाठी अशा अनुभवात ज्यांना हे मिळू शकत नाही त्यांना आठवणीत सहभागी करून घेणं, सहजपणे सामील करून घेणं जमायला हवं.

अभिजात रसिकता आणि उथळ विलासीपणा, रंगढंग यातला फरक मुलांना जाणवला पाहिजे. हे अनुभव ओरबाडायचे नसतात, हावरेपणानं ओढून घ्यायचे नसतात. छान वातावरण तयार करून त्यांचं त्यात हलकेच स्वागत करायचं असतं. हे मुलं बघूनच शिकत असतात.

त्यामुळे असे आनंदाचे अनुभव सुजाणपणे घेणं आपल्याला शिकत रहायला हवं. □

## आपलं मूल आहे तरी कसं ?

आपल्या मुलांनी मोठपणी कसं असावं, काय करावं, कसं वागावं, त्याच्यात कोणते गुण असावेत, कोणते दुर्गुण नसावेत या सगळ्याबद्दल काहीकाही पुसट चित्रं आपल्या मनात असतात. ती सगळी आपल्या आजवरच्या आवडीनिवडीतून आणि अनुभवातून तयार होत असतात; पण आपलं मूल सध्या आहे तरी कसं हे समजावून घेतो का आपण ? आपण ज्याला सुंदर, देखणं मूल समजत असतो त्याला मनातून वाटत असतं, आपण दिसायला चांगले नाही. असं कसं होतं ? मुलाच्या स्वत:बद्दलच्या **या कल्पना समजून घ्यायला शिकू या, पुढील लेखात...**

# नाट्यपंढरी

## भाऊराव आले !

अण्णांचे शाकुंतल रंगभूमीवर आले नि किर्लोस्कर मंडळीची कीर्ती चहूकडे पसरली. खरे म्हणजे गंमत म्हणून फार तर एक वर्ष अधूनमधून 'शाकुंतला'चे प्रयोग करून पुणेकर प्रेक्षकांचे रंजन करावे एवढेच अण्णांच्या मनात होते. नाट्यव्यवसाय करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात कधीच नव्हती; परंतु शाकुंतल नाटक रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. मित्रांनी मुंबईला प्रयोग करण्याची गळ घातली. खेळांना उत्पन्न चांगले होऊ लागले नि सहाजिकच अण्णा नि त्यांचे सहकारी या व्यवसायात रंगले. गुळवे सावकारांनी भांडवलाची सोय केली नि 'किर्लोस्कर संगीत मंडळी' ही व्यावसायिक नाटक मंडळी झाली.

आता व्यावसायिक दृष्टीने अण्णांनी पात्रांची जमवाजमव सुरू केली. सौभद्रचे कथानक त्यांच्या डोक्यात घोळत होते; पण सुभद्रेच्या भूमिकेसाठी गाणाऱ्या स्त्रीपात्राची जरूर होती. शाकुंतल नाटकात शंकररावांनी शकुंतला सुरेख उभी केली, तरी त्यांना गाता येत नव्हते हे वैगुण्य होतेच. गाणाऱ्या पात्रांची शोधाशोध सुरू झाली.

बडोद्याच्या बापूबुवा कोल्हटकरांची दोन देखणी मुले, बुवांच्या मागे कीर्तनात साथ करतात, अशी बातमी अण्णांच्या कानांवर आली. मोठा मुलगा अप्पा नि धाकटा भाऊ. मोठ्याची गाण्याची तयारी चांगली होती. तो तबलाही उत्तम वाजवी. अण्णांनी हा मुलगा मिळविण्यासाठी मोरोबा वाघोलीकरांचा बडोद्याला रवानगी केली. मोरोबांनी हरिदासबुवांची भेट घेऊन मोठ्या मुलास कंपनीत पाठविण्याची विनंती केली. त्यांनी ती नाकारली. कारण त्याला बडोद्याला इंजिनिअर खात्यात नोकरी होती. 'बरे, निदान धाकट्याला तरी द्या' असा मोरोबांनी आग्रह धरताच, होय–नाही करीत अखेर बुवांना रोख पाचशे रुपये देऊन, ते धाकट्या मुलाला घेऊन पुण्याला आले. तेच रंगशारदा, रंगदेवता, संगीत रंगभूमीचे ब्रह्म-


कौस्तुभ—भाऊराव कोल्हटकर !

भाऊराव आले नि अण्णांचा उत्साह शतगुणित झाला. आपल्याला हवी तशी सुभद्रा सापडली म्हणून अण्णांच्या सौभद्राने वेग घेतला. भाऊरावांचे लावण्य लक्षात घेऊनच सुभद्रेची भूमिका साकार होऊ लागली. ‘सुवर्ण केतकीपरी जो दिसतो वर्ण नव्हे तो सुसरीचा’ यासारख्या भाऊरावांच्या रूपाचे वर्णन करणाऱ्या पद्यपंक्ती अण्णांच्या लेखणीतून अगदी सहज उतरल्या. आता ‘शकुंतला’ही गाऊ लागली—

शंकरराव मुजुमदारांच्या जागी भाऊराव ‘शकुंतला’ म्हणून उभे राहिले. दुधाला केशरकाडी लागली, सुवर्णाला सुगंध लाभला. अण्णांचे शिष्योत्तम देवल यांनी अण्णांच्या सांगीवरून शकुंतलेची पदे रचली. अण्णांचे एक सौभद्र सोडले, तर देवलांसारखी सरळ, सुबोध, प्रासादिक पदे आजपर्यंत कुणी केली नाहीत. (अपवाद म्हणून इथे आठव येतो तो ग. दि. मां. चा !) किर्लोस्कर—देवल युती झाली. गुरु—शिष्यांचा संगम झाला तो इथेच. शाकुंतलाच्या कोंदणात किर्लोस्कर—देवल ही गुरु—शिष्यांची जोडी चमकू लागली ! रंगभूमीवर पुढे गुरु—शिष्यांची अशीच एक अद्वितीय जोडी गाजली. ती म्हणजे कोल्हटकर—गडकरी. श्रीपाद कृष्ण नि राम गणेश !

आज शंभर वर्षं होऊन गेली, तरी देवलांची शकुंतलेची ( भाऊरावांची ) अवीट गोडीची, ‘सखे अनुसये थांब की वाई’, ‘मी तप्त जरी मदनशरे ...’, ‘मना, तळमळसी उगीच का असा हळहळसी’, ‘वृक्षवेल या दोहींची जोडी शोभते’ अशी किती तरी गाणी पुन्हा पुन्हा ऐकावीशी वाटतात. तरुण गायक—गायिकांना मनापासून म्हणावीशी वाटतात, हीच त्यांच्या ताजेपणाची नेमकी खूण नाही का ?

रसिकहो, आपल्या संगीत रंगभूमीचा भरभक्कम पाया रचला तो शाकुंतल—सौभद्राने ! नि म्हणूनच त्याची ‘बरी उभारणी’ नव्हे उत्तम उभारणी झाली ना ?



## रंगभूमी

# दोन पुनरुज्जीवनें

मुखवटे । अशी पाखरे

‘रंगयात्री’ या संस्थेतर्फे ‘मुखवटे’ हे नाटक रंगभूमीवर आले. स्वर्गीय मोहन राकेश यांच्या ‘आधे अधूरे’ या गाजलेल्या हिंदी नाटकाचे विजय तेंडुलकरांनी केलेले हे मराठी रूपांतर. याआधीचे मराठी रंगभूमीवरील या नाटकाचे पदार्पण आज विस्मृतीच्या पडद्याआड गेलेले; त्यामुळे अमोल पालेकरांच्या दिग्दर्शनाखाली नवीन संचात नवीन नाटकाप्रमाणेच मुखवटेचे आगमन झाले.

आपल्या मनातील आदर्श पुरुषाच्या शोधात असलेली सावित्री ( भारती आचरेकर ). त्यामुळे नवऱ्याबद्दल तिच्या मनात निर्माण झालेला दुरावा, तिरस्कार, द्वेषसुद्धा. सावित्रीच्या या शोधातूनच तिच्या आयुष्यात आलेले चार पुरुष— तिचा नवरा महेंद्र, तिचा ऑफिसातील बॉस सिंघानिया, लग्नानंतरच्या आयुष्यात प्रियकर बनून गेलेला मोहन आणि महेंद्रचा मित्र प्रधान ( या चारही व्यक्तिरेखा अमोल पालेकरांनी उभ्या केल्या.) पण कुणाच्याही बाबतीत तिचा शोध पूर्ण होऊ शकत नाही. चार वेगवेगळ्या रूपांच्या—मुखवट्यांच्या आड तिला एकच स्वार्थी पुरुषी चेहरा जाणवतो. कदाचित या अपुऱ्या राहिलेल्या शोधाला तिचा स्वतःचाच अपुरेपणा जबाबदार होता का ? या सगळ्या ताणांनी उध्वस्त झालेले घर आणि त्यामुळेच मनस्वी बनलेली, कुत्तरओढीत फरपटली गेलेली मुले— अशोक ( मंगेश कुलकर्णी ), बिनी (चित्रा पालेकर) आणि मिनी. घर, कुटुंब या गोष्टींनी या साऱ्यांना एका चमत्कारिक गाठोड्यात कोंडलेले असते. या गाठोड्यातून सगळे तोडून टाकून त्यांना बाहेरही पडता येत नाही आणि त्या गाठोड्यात गुदमरलेल्या अवस्थेत सुखाने जगताही येत नाही.

अगदी साध्या, ढोबळ आणि वटवटीत शब्दांमध्ये ‘मुखवटे’चे मध्यवर्ती सूत्र मी सांगितले असले तरी प्रत्यक्षात मात्र नाटकाच्या संवादाच्या एकेका वाक्यातून, अभिनयाच्या एकेका तुकड्यातून एक अतिशय भेदक आणि सुन्न करणारा अनुभव रंगमंचावर घडत असतो. नाटकाच्या संहितेत महेंद्र, सिंघानिया, मोहन आणि प्रधान यांना अनुक्रमे पुरुष १, पुरुष २, पुरुष ३, पुरुष ४ असे क्रमांक आहेत. या चारही पुरुषांमध्ये क्रमांकाव्यतिरिक्त अन्य काहीच फरक नाही. मुख्य म्हणजे ‘पुरुष’पणाचा भाग चौघांमध्ये सारखाच आहे हे सूचित करतानाच प्रत्यक्ष प्रयोगातही या चारही पुरुषांना एकाच अभिनेत्याने साकारावे अशी अप्रत्यक्ष सूचनाही जणू लेखकाने या ठिकाणीच देऊन ठेवली आहे. ( माझ्या माहितीप्रमाणे ‘आधे अधूरे’च्या आधीच्या प्रयोगांमध्येही या चारही भूमिका डॉ. श्रीराम लागू एकटेच करायचे. ) साहजिकच या चारही भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्याच्या सव्यसाचीपणावर नाटकाचा तोल अवलंबून राहतो. अमोल पालेकरांनी महेंद्र आणि सिंघानिया या भूमिका अतिशय सुंदर उभ्या केल्या. महेंद्रचे किंचितसे दबून आणि दाबून लागट बोलणे, असाहाय्य तिरस्काराचे कटाक्ष, बराच काळ थोपवून धरलेल्या रागाचा स्फोट, पत्नीबद्दलचे प्रेम आणि तिरस्कार या परस्परविरोधी टोकांमध्ये चाललेली त्याची जीवघेणी तगमग फारच प्रभावी होते. सिंघानियाचा उघड लघळपणा, सत्तेची मग्रुरी, आपल्या विद्वत्तेचे आणि चौफेरपणाचे प्रदर्शन करण्यासाठी चाललेली पण असंबद्धतेमुळे हास्यास्पद ठरणारी त्याची केविलवाणी धडपड ( तरीही त्याच्या उच्च सामाजिक दर्जामुळे हे सारे सहन करणाऱ्या सावित्री, अशोक आणि बिनीला आलेला अधिकच केविलवाणेपणा ), त्याचे मांड्या खाजवणे, फेंगडे चालणे, पान चघळत बोलणे या सगळ्या गोष्टी थोड्याशा अतिशयोक्त असूनही त्या भूमिकेला अतिशय शोभल्या. याउलट नंतर मोहन आणि प्रधान बनून येताना मात्र काहीशा overstylisation मुळे आणि काहीशा आधीच्या महेंद्र आणि सिंघानियाच्या पार्श्वभूमीमुळे अमोल पालेकर कमी पडले;

म्हणजे 'अगदी महेंद्र आणि सिंघानियाच रंगभूषा आणि वेशभूषा बदलून आल्यासारखे वाटले' असे मला म्हणायचे नाही, पण मोहन आणि प्रधान या भूमिकामधून 'अमोल पालेकर' तोचतोचपणा घेऊन डोकावताना जाणवत होते. महेंद्रच्या अतिशय सुंदर कामाला गालबोट लावणारा आणखी एक प्रकार म्हणजे पालेकराचे अत्यंत कृत्रिम खोकणे आणि उबळी !

नाटकातील दुसरी प्रमुख व्यक्तिरेखा–सावित्रीची–सादर केली आहे भारती आचरेकर यानी सावित्रीचा तिला कळत नसलेला पण प्रत्यक्षात चालू असलेला स्वत च्या अपूर्णतेचा शोध आणि तिची ही स्वस्थिती प्रधानने तिला उघड करून दाखवल्यानंतर त्या स्वत.च्या खऱ्या रूपाला नाकारण्याची तिची धडपड, या सगळ्यातून जात असतानाच नवऱ्याबद्दल, मुलाबद्दल होणारा तिचा क्षोभ, घरात पाय अडकलेले, ते सोडवून घ्यावेत तर बाहेरचे आधार सुटलेले, अशा त्रिशंकू अवस्थेतील सावित्री भारती आचरेकरांनी अत्यंत सुंदर उभी केली.

वरवर उर्मट, बेफिकीर वाटणारा; पण खरे तर घराच्या उध्वस्त अवस्थेमुळे मोडून पडलेला अशोक मंगेश कुलकर्णींनी अतिशय बारकाव्यासह साकारला.

बिनीच्या भूमिकेत चित्रा पालेकरांनी मात्र निराशा केली. ओक्साबोक्शी रडणे किंवा एकदम उसन्या उत्साहाने उड्या मारत पळणे, एकदम तत्त्वज्ञानी गंभीर डायलॉग मारणे किंवा वय वर्षे चारच्या बालकाप्रमाणे चिमखड्या बोलामध्ये बोलणे याच्या कुठे तरी मध्ये माणसाला वावरता येते, अशी जेव्हा त्यांना क्वचित जाण येई; तेव्हा त्या फारच सुसह्य होत; पण अशा सुसह्य वेळा नाटकात फार कमी वेळा आल्या. 'दूर दूर' मध्ये एक कोवळा पोरगा म्हणून चित्रा पालेकरांना स्वीकारणे जेवढे जड गेले, त्याच्याहून त्याना भारती आचरेकराची तरुण मुलगी म्हणून पाहणे जास्त ओझे उचलण्यासारखे होते.

मिनीचे काम करणाऱ्या छोट्या पोरीचे नाव मी विसरलो; पण दुसऱ्याचा संवाद ऐकू येणार नाही अशा स्वरात चीत्कारणे आणि दोन वाक्याच्या मध्येच हुंबरडा फोडून आणि गळा काढून रडणे या तिच्या गोष्टी नाटकाचा एकदम फार्सच बनवीत होत्या. एवढे वगळल्यास या पोरीनेही अनेक वेळा दाद देण्याइतके सुरेख काम केले

नाटकाची प्रकाशयोजना म्हणजे रंगमिश्रणाचा एखादा वस्तुपाठच होता.

नेपथ्यात रंगमंचाच्या एका कोपऱ्यात खिडकीला लावलेल्या सनब्रेकच्या झडपा मात्र जरा त्रास देत होत्या; कारण कोणतेही पात्र त्याच्या जरा जवळपास गेले की, त्या झडपाच्या कप्प्यांचे दोर ताक घुसळल्यासारखे मिनिट मिनिट घुसळत बसे.

'अॅक्टिव्ह थिएटर्स' या संस्थेतर्फे विजय तेंडुलकराचे 'अशी पाखरे येती' हे नाटक पुन्हा एकदा रंगभूमीवर आले आहे.

'आधे अधूरे'च्या मानाने डॉ. जब्बार पटेलाचे 'अशी पाखरे येती' अजूनही लोकाच्या मनात आहे, थोडेसे शिळे झाले असेल; पण शिल्लक आहे. अरुण सरनाईक हा एक जिप्सी आयुष्य जगणारा कलंदर. कुठल्याही पाशात स्वत ला गुतवून न घेण्याचा याचा अट्टाहास; पण वरवर अशा निर्मम, निष्पाश, बेफिकीर आयुष्याचा आव आणणारा अरुणही कुठे तरी गुतलेला होता, कुठली तरी जखम अजून जपत होता. एका बेसावध क्षणी उडालेल्या खपलीने अरुणची ती हळवी गुतवणूक चितारणारे हे नाटक. नाटकाच्या नव्या दिग्दर्शक–प्रभूच्या–श्रीकांत मोघ्यांच्या शब्दात सागायचे तर– 'जिव्हारी लागेल, अशी' ही अरुणची व्यक्तिरेखा. त्या व्यक्तिरेखेच्या प्रेमामुळेच 'अॅक्टिव्ह'च्या सहकार्याने श्रीकांत मोघ्यांनी 'अशी पाखरे येती'चे पुनरुज्जीवन मनावर घेतले.

प्रेक्षकाशी बोलणे, प्रेक्षकामधून जाणे, अंधार न करता नेपथ्य बदलणे, स्थिरदृश्ये इत्यादी अनेक कल्पना आज जरी शिळ्या आणि जुन्या वाटत असल्या तरी 'अशी पाखरे येती' प्रथम सादर झाले तेव्हा नवीनच होत्या. शिवाय या सगळ्या कल्पना नाटकातही अगदी बरोब्बर बसल्या आहेत.

'अशी पाखरे येती' हा तसा एकखाबी तंबूच. श्रीकांत मोघ्यांच्या रूपात चागला ताकदवान खाब मिळाल्याने प्रयोग झकास पेलला गेला आहे, यात शकाच नाही. अरुणची व्यक्तिरेखा श्रीकांत मोघे अतिशय आत्मीयतेने उभी करतात. 'सकेत मीलनाचा'च्या नंतर त्यांनी सादर केलेली ही दुसरी अत्यंत सुंदर भूमिका; पण केवळ ही प्रमुख व्यक्तिरेखाच नव्हे, तर नाटकातील इतर बारीक-सारीक भूमिकाही 'अॅक्टिव्ह'च्या कलाकारानी मस्त केल्या आहेत.

पुन्हा एकदा भेट देऊन पहावीत, अशीच 'मुखवटे' आणि 'अशी पाखरे येती' ही दोन्ही पुनरुज्जीवने आहेत

—डॉ. सदानंद बोरसे


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

–प्र. भा. भोसले

संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये

# इथून-तिथून

## अंटार्क्टिकावर तिसरं पथक

अंटार्क्टिकावर तिसरे भारतीय पथक येत्या डिसेंबर महिन्यात रवाना होत आहे. हे पथक तेथे वर्षभर रहाणार असून अंटार्क्टिकावर कायम स्वरूपाचे सशोधनकेंद्र उभे करणार आहे.

अंटार्क्टिकावरील दुसऱ्या यशस्वी मोहिमेचे धुरीण श्री. व्ही. के. रैना ( संचालक जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ) यानी नुकतीच ही माहिती सांगितली. तिसऱ्या पथकात वेगवेगळ्या विज्ञानशाखातील पस्तीस शास्त्रज्ञांचा समावेश असेल.

तिसरे पथक हवाईमार्गे जाऊ शकेल अशी सुयोग्य जागाही आढळली आहे असेही श्री. रैना यांनी सागितले. रुरकी येथील केंद्रीय संशोधन सस्थेने फायबर ग्लासपासून अंटार्क्टिकावर चांगला निवारा निर्माण केला आहे. पथकाचे सदस्य आणि शास्त्रीय उपकरणे यांची व्यवस्था या निवाऱ्याच्या जागेत होणार आहे. तिथे केवळ पाच ते सहा से. मी. हिम पडत असल्यामुळे या निवाऱ्याला धक्का लागणार नाही.

अंटार्क्टिकावर दुसऱ्या पथकाला सूर्यास्त पाहायला मिळाला या संस्मरणीय क्षणाचा उल्लेखही रैनासाहेबांनी या वेळी दिला.

## पर्यटनाचा विकास

अधिकाधिक परदेशी प्रवाशांना भारताकडे आकर्षून घेण्यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालय परदेशातील आपल्या पर्यटनकेंद्राची पुनर्रचना करणार आहे.

कोलंबो (सिलोन), काठमांडू (नेपाळ) आणि दुबई येथे तीन केंद्रे उघडण्यात येणार आहेत. चौथे केंद्र कुआलालपूर येथे उघडले जाणार आहे. सध्या भारताची १७ पर्यटनकेंद्रे परदेशात असून त्यातील चार अमेरिकेत आहेत. अमेरिका आणि ब्रिटनमधून दरवर्षी पर्यटकाचा पूर भारतात येत असतो.

पर्यटनामुळे १९८२ साली भारताला ७५० कोटी रुपयाचे परकी चलन मिळाले. ते आता ८०० कोटी रुपयांपर्यंत जावे असा प्रयत्न पर्यटनमंत्रालयाचा आहे.

## परतणाऱ्यांसाठी तरतूद

आखाती देशातून परत येणारे केरळीय त्या राज्याच्या दृष्टीने आर्थिक-सामाजिक प्रश्न निर्माण होणार असल्याने परत आलेल्या या केरळियांना पुनर्वसित करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

आखाती देशात काम करणाऱ्या केरळीसाठी त्यांच्याचकडून थोडासा आर्थिक वाटा उचलून राज्यात ३० नवे औद्योगिक प्रकल्प उभारले जाणार आहेत. केरळ औद्योगिक विकास महामंडळाने या प्रकल्पांना मान्यता दिली असून राज्याचे उद्योगमंत्री याबाबतीत आशावादी आहेत.

## मंडल आयोग–निर्णय अवघड

राखीव जागासबंधी मंडल आयोगाने ज्या शिफारशी सुचवल्या आहेत, त्या कशा स्वीकारावयाच्या, त्यावर निर्णय काय घ्यायचा या बाबतीत केंद्र सरकार पेचात पडले आहे.

या बाबतीत मंडल आयोगाच्या अहवालाची पाहणी आणि छाननी सचिवस्तरावरील समिती करेल असे ठरले होते. तशी समिती नेमण्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री पी. सी. सेठी यानी एप्रिल महिन्यातच केली होती आणि ही समिती तीन महिन्यात आपले मत व्यक्त करील असेही आश्वासन देण्यात आले होते. अद्यापिही तसे काही झालेले नाही.

योजना, कायदा, ग्रामीण विकास, शिक्षण या विविध खात्याचे सचिव या समितीत आहेत. या समितीला कोणताही धोरणात्मक निर्णय घ्यायचा नाही, तर वेगवेगळ्या जातीची वर्गवारी मडल आयोगापूर्वीच्या काका कालेलकर आयोगाने कशी सुचवली, आता कशी याची छाननी करायची आहे.

सुमारे ३० वर्षांपूर्वीच्या कालेलकर आयोगाने दोन हजार मागासजाती नोंदवल्या होत्या. मंडल आयोगाने मागास जाती, समाज म्हणून तीन हजार जाती नोंदवल्या आहेत. आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण हाच याचा मुख्य आधार आहे.

या सगळ्या प्रकरणात केंद्र सरकारला निर्णय घेणे अवघड झाले आहे, याचे आणखी एक कारण म्हणजे मंडल आयोगाच्या शिफारसीबाबत काही राज्याच्या मुख्यमंत्र्यानी आपला विरोध असल्याचे मत व्यक्त केले आहे पावसाळी अधिवेशनात या शिफारशी वादळ निर्माण करणार हे उघड आहे.

## अनाथ

आसाममध्ये निवडणुकीनंतर उसळलेल्या हिंसाचाराच्या प्रक्षोभात पाचशेहून अधिक मुलांना आपल्या आईवडलांचे छत्र गमवावे लागले आहे. या अनाथ मुलांच्या पालनपोषणासाठी आसाम सरकारने सव्वा दोन कोटी रुपयांची योजना आखली आहे.

## ओमर शेरीफ रंगभूमीवर

पंचवीस वर्षांच्या खंडानंतर ख्यातनाम अभिनेता ओमर शेरीफ पुन्हा रंगमंचावर येतो आहे तीन ऑगस्टला लंडन येथे चिचेस्टर महोत्सव सुरू होतोय. 'दि स्लिपिंग लेडी' या नाटकाने त्याची सुरुवात होईल. या नाटकात ओमर शेरीफ काम करीत असून डेब्बी अर्नॉल्ड त्याची नायिका आहे.

तो म्हणतो, 'गेल्या तीन वर्षात मी योग्य भूमिकेसाठी शोध केला– आणि योग्य नायिकेसाठीही !' डेब्बीच्या रूपाने त्याला हवी तशी नायिका मिळाली आहे

डेब्बी म्हणते, 'ओमरबरोबर काम करणं जितकं कष्टाचं, तितकच थरारकही !'

## मोनॅकोची नवी राणी

गेले काही महिने प्रसिद्ध अमेरिकन अभिनेत्री ब्रूक शील्डस् आणि मोनॅकोचे राजपुत्र आल्बर्ट याच्या भेटी वाढत चालल्या आहेत. त्यामुळे मोनॅकोच्या इतिहासाची या संदर्भात पुनरावृत्ती होणार असे दिसते.

आल्बर्टच्या वडिलानी अमेरिकन अभिनेत्री ग्रेस केली ( जी काही महिन्यांपूर्वीच एका अपघातात मरण पावल्याचे आपणाला स्मरत असेलच. ) हिच्याशी लग्न केले होते. आता ब्रूक शील्डस्चे राजपुत्र आल्बर्टशी लग्न झाले की ती 'प्रिन्सेस ब्रूक ऑफ मोनॅको' म्हणून ओळखली जाईल. ☐

# अणुबाँबबद्दल मुद्दाम अफवा – झिया

इस्लामाबाद : पाकिस्तान आणि भारत यांच्यात गैरसमज निर्माण करण्यासाठीच पाकिस्तान लवकरच अणुबाँब तयार करणार आहे, अशा अफवा पसरविण्यात येत आहेत, असे पाकिस्तानचे अध्यक्ष झिया-उल्-हक् यांनी म्हटले आहे. ‘असाही शिम्बून’ या जपानी दैनिकात प्रसिद्ध झालेल्या एका मुलाखतीत.

–दै. केसरी-वार्ता, १७ जुलै

# हैड्रोजन बाँब

Moscow, July 16 (UNI) : What is Pakistan after ? An atom bomb or an hydrogen bomb ? Two eminent soviet military-diplomatic experts have expressed their view that it is the hydrogen bomb.

*–Sunday Observer, July 17.*

**ही अण्वस्त्रे पाकिस्तानने कशी–कोठून–केव्हा मिळवली ?**

–माणूस लेखमाला....गेल्या अंकापासून सुरू झालेली....

मराठीत हा विषय प्रथमच मांडणारी....